**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सतिश नरसू मोरे
सिध्दार्थनगर, मु.पो.पेठ वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हातकणंगले,
तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले,
तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ११९४ / २०१० / कोल्हापूर |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सतिश नरसू मोरे
सिध्दार्थनगर, मु.पो.पेठ वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हातकणंगले, तहसील कार्यालय, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.समीर मा.शिंगटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

तीन गावांमधील काही मिळकतींचे ७/१२ उतारे व फेरफार याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.सतिश नरसू मोरे यानी मागितली होती. सन १९४५ पासूनची ही माहिती विहित मुदतीत दिली. काही फेरफार रद्द करण्याची त्यांची मागणी होती. अतिरिक्त माहिती हवी असल्यास कार्यालयीन अभिलेखावरून उपलब्ध करून देण्यात येईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.समीर मा.शिंगटे यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले.

'अतिरिक्त माहिती देण्यात येत असल्यामुळे अपील निकाली ठेवण्यात यावे, ही विनंती,'असे अपीलकर्त्यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

फेरफार रद्द करण्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य असून अतिरिक्त माहिती देण्यात येत असल्यामुळे अपील निकाली काढण्याची अपीलकर्त्याची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कांतिलाल मिलापचंद रूणवाल
११४, पाचवी गल्ली, स्टेशन रोड, पो.बॉक्स नं.७१,
मु.पो.जयसिंगपूर पाठाण, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, दि मर्चंटस असोसिएशन,
जयसिंगपूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपाध्यक्ष, दि मर्चंटस असोसिएशन,
जयसिंगपूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९५ / २०११ / कोल्हापूर |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कक्षेतील विषयांबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.कांतिलाल मिलापचंद रूणवाल यानी मागितली होती. ती न मिळाल्यामुळे आयोगाकडे अपील केले आहे. दि मर्चंटस असोसिएशन, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर या संस्थेला नाममात्र एक रूपया भाड्याने शासनाकडून भूखंड मिळालेला असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो, असे त्यांचे प्रतिपादन आहे. परंतु संस्थेला उक्त अधिनियम लागू होत नसल्याचे अध्यक्ष, दि मर्चंटस असोसिएशन, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर यानी अपीलकर्त्यास कळविले आहे. संबंधित संस्थेला कायदा लागू होतो, याबाबतचे ठोस पुरावे अपीलकर्त्यांनी सादर केलेले नाहीत. तसेच कृषि उत्पन्न बाजार समिती,

जयसिंगपूर येथील भूखंडाच्या नोंदीबाबतची त्यांची तक्रार आदी मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचे नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.लक्ष्मण गणपती सावंत
मु.चांदेवाडी, पो.आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, आजरा शेतकरी सहकारी
साखर कारखाना, गवसे, ता.आजरा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ३९२ / २०१० / कोल्हापूर |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.लक्ष्मण गणपती सावंत
मु.चांदेवाडी, पो.आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
श्री.डी.आर.घोडे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, आजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना,
गवसे, ता.आजरा, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.व्ही.के.ज्योती

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती व्यापक स्वरूपाची असल्याने, तसेच माहिती मागणीच्या कालावधीमध्ये कारखाना भाडे तत्त्वाने चालवावयास दिला असल्याने सदर कालावधीमधील माहिती वेळेत उपलब्ध करणे अडचणीचे आहे,'असे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

'माहिती मिळाली. माझी त्याबाबत कोणतीही हरकत नाही,'असे अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बापू पांडुरंग पोळ
मु.गोखळी, पो.बिजवडी, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व),
शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व),
शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ३८६ / २०१० पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व),
शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे- श्री.सदाशिव शंकरराव साळुंखे

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व),
शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे श्रीमती उज्वला संतोष घावटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

‘इंदापूर तालुक्यात आमदार फंडातून व इतर कोण कोणत्या योजनेतून सार्वजनिक बांधकाम विभाग(पूर्व), पुणे यांच्यामार्फत कोणकोणती कामे झाली,’ अशी व याच स्वरूपाची माहिती अपीलकर्ता श्री.बापू पांडुरंग पोळ यानी मागितली होती. दि.४.८.२००८ चा त्यांचा अर्ज दि.१३.८.२००८ रोजी प्राप्त झाला. मागणी केलेली माहिती मोठ्या प्रमाणात असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(९) अन्वये नेमक्या माहितीची मागणी करावी. तसेच समक्ष अभिलेखाची पडताळणी करून हवी असलेली माहिती मागावी, असे दि.९.९.२००८ च्या पत्रान्वये कळविले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही तसाच निर्णय दिला. दि.३०.१२.२००८ रोजी कार्यालयात हजर राहून त्यानी माहिती घेतली, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी
यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले असून, तपशीलवार स्वतंत्र निवेदन सादर केले आहे.

‘संदर्भिय अर्जान्वये मी दि.१४.११.२०११ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग(पूर्व), पुणे यांचे कार्यालयात समक्ष हजर राहून माहिती प्राप्त करून घेतली. त्यामुळे माझे सदरचे अपील क्र.३८६/२०१०/पुणे, दि.२०.१.२०११ रोजीचे अपील निकाली काढण्यात यावे, ही विनंती,’असे अपीलकर्त्यांनी दिलेले दि.१४.११.२०१० ही तारीख असलेले लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे श्रीमती उज्वला संतोष घावटे व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे श्री.सदाशिव शंकरराव साळुंखे यांनी आयोगास सादर केले.

जन माहिती अधिकाऱ्यानी मूळ अर्जावर दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. ‘कोणकोणत्या योजनेतून कोणकोणती कामे झाली,’अशी माहिती सरसकट व मोघम स्वरूपात असल्यामुळे देय ठरत नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बबन आप्पाजी बांगर
कुकडी कॉलनी, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पोलीस अधीक्षक कार्यालय, पाषाण रोड, चव्हाणनगर, पुणे-४११००८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग, जुन्नर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ३६२ / २०१० / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पोलीस अधीक्षक कार्यालय, पाषाण रोड, चव्हाणनगर, पुणे प्रतिनिधी श्री.आर.बी.माळवे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग, जुन्नर श्री.विनायक ढाकणे

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

आपण केलेल्या दोन तक्रारी अर्जावरील कारवाई व पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्याने आमच्याकडे पैशाची मागणी केली होती, त्याबाबतची माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.बबन आप्पाजी बांगर यानी केली होती. भावाभावामध्ये वडिलोपार्जित जमिनीबाबतचा वाद असून दिवाणी न्यायालयात दावा दाखल आहे. सर्व माहिती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.आर.बी.माळवे यानी पूरक कागदपत्रांच्या प्रतींसह सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

संबंधित कारवाईबाबतचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. परंतु ते समजून न घेता पोलिसांविरूध्द खोट्या तक्रारी, अर्ज व पत्रव्यवहार करून त्रास देण्याचा प्रयत्न अपीलकता करतात, असे जन माहिती अधिकारी यानी लेखी निवेदनातही नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. मात्र माहितीच्या अधिकारातील अर्ज व अपिलांबाबत विहित मुदतीत उत्तर व निर्णय दिला जाणे आवश्यक आहे, याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग, जुन्नर श्री.एच.के.जगदाळे व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पोलीस अधीक्षक कार्यालय, पाषाण रोड, चव्हाणनगर, पुणे श्री.रामनाथ पोकळे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शांतीलाल जुगराज कावेडिया
६६९, रविवार पेठ, पुणे-४११००२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा वरिष्ठ विधी सल्लागार, विधी सल्लागार कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विधी सल्लागार, विधी सल्लागार कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १०८५ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा वरिष्ठ विधी सल्लागार, विधी सल्लागार कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे ॲड.मंजुषा इधाटे

**जन माहिती अधिकारी** तथा विधी सल्लागार, विधी सल्लागार कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे ॲड.निशा चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका, मुंबई ॲक्ट १९४९ च्या कलमाबाबतच्या अन्वयार्थाच्या स्वरूपाची व पुणे महानगरपालिकेने काही प्रकरणात केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने अभिप्राय स्वरूपात विचारणा करणारा अर्ज अपीलकर्ता श्री.शांतीलाल जुगराज कावेडिया यानी केला होता. त्यांच्या दि.२५.४.२००९ च्या अर्जाला दि.३०.४.२००९ च्या पत्रान्वये उत्तर दिले. काही बाबींचे स्पष्टीकरण दिले. परंतु कायद्यातील तरतुदींचा अन्वयार्थ व अभिप्राय देणे माहितीच्या अधिकारात बंधनकारक नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. कायदेशीर तरतुदींचा अन्वयार्थ, अभिप्राय, स्पष्टीकरण, त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची वैधता-अवैधता याबाबतचे मत, अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम २ मधील 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गणेश गबरू पवार
आपलेघर सोसायटी, सर्व्हे नं.५६, चंदननगर, पुणे-४११०१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद,
सार्वजनिक बांधकाम(उत्तर), अहमदनगर, जि.अहमदनगर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद,
सार्वजनिक बांधकाम(उत्तर), अहमदनगर, जि.अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १८१८ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम(उत्तर), अहमदनगर, जि.अहमदनगर प्रतिनिधी श्री.संजय एस.कोकणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

<u>**विवेचन**</u>

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

उपकार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम(उत्तर), अहमदनगर, जि.अहमदनगर यांच्या नियंत्रणाखालील संपूर्ण उपविभागीय कार्यालयांना आपला अर्ज हस्तांतर करावा व सर्व अभियंत्यांच्या विरोधात नागरिकांकडून अथवा वर्तमानपत्रांमध्ये आलेल्या तक्रारींच्या प्रती, उपविभागाला मिळालेल्या निधीचा विनियोग, उपअभियंते शासकीय सेवेत हजर झाल्यापासून आजतागायतचे त्यांचे गोपनीय अहवाल, बेहिशेबी माामत्ता इ.बाबतची माहिती द्यावी अशी मागणी अपीलकर्ता श्री.गणेश गबरू पवार यानी केली होती. माहिती अत्यंत व्यापक स्वरूपाची असून ती संकलित करण्यास अतिरिक्त मनुष्यबळ  व वेळ लागेल, असे त्याना स्पष्ट केले. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या दरम्यान त्यानी आमच्या कार्यालयाकडून माहिती अपेक्षित नसल्याचे स्वाक्षरीसह नमूद केले. उपविभाग, सार्वजनिक बांधकाम, उपविभाग नेवासा यांच्याकडून माहिती हवी असल्याचे त्यानी सांगितल्यानुसार त्या विभागाला तसे कळविले. त्या विभागाने रूपये ७०२१/- शुल्क कळविले. ते अद्याप अपीलकर्त्यानी भरले नसल्यामुळे माहिती दिलेली नाही, असे जन माहिती अधिकारी यानी पूरक कागदपत्रांसह लेखी निवेदनाद्वारे आयोगास अवगत केले.

अपीलकर्त्यानी सरसकट व व्यापक स्वरूपाची माहिती मागितली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(९) अन्वये जन माहिती अधिकारी यानी ती नाकारणे योग्य आहे. मूळ अर्जात वेगळी मागणी करून प्रथम अथवा द्वितीय अपिलाच्या वेळी वेगळ्या तपशिलाची मागणी करणे ही अपीलकर्त्याची कृती नियमाला धरून नाही. तसेच अपीलकर्त्यानी केलेली मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील नमूद केलेल्या व्याख्येनुसार आहे की नाही, याची खबरदारी स्वत: अपीलकर्त्यानी घेणे व जन माहिती अधिकाऱ्यानी त्याबाबत तपासणी करणे आवश्यक आहे. अपीलकर्त्यास माहिती हवी असल्यास शुल्क भरून घ्यावी लागेल. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम, उपविभाग नेवासा यानी कळविलेले शुल्क न भरता माहिती न

मिळाल्याची  तक्रार करणे व त्यासाठी आयोगाकडे अपील करून सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम यांचा अपव्यय करणे याबाबत अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अंनत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, कळस, जय गणेश विश्व,
विश्रांतवाडी, ता.हवेली, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी धानोरी, जय गणेश विश्व,
विश्रांतवाडी, ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७०८ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.अंनत देऊ गावडे<br>सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, कळस, ता.हवेली, जि.पुणे श्री.आय.यु.पटेल | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

मौजे धानोरी, ता.हवेली येथील जमिनीबाबीची माहिती अपीलकर्ता श्री.अनंत देऊ गावडे यानी मागितली होती. 'तक्रार संपुष्टात आली. माहिती मिळाली,'असे अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले असून संयुक्त निवेदनावर अपिलीय प्राधिकारी यांचीही स्वाक्षरी आहे.

' मौजे धानोरी येथील स.नं.४७ व ९० या जमिनीबाबत आपल्याकडे असतील त्या सर्व फाईलीतील सुरूवातीपासून ते अखेरपर्यंतच्या संपूर्ण कागदपत्रांच्या प्रती द्याव्या,'अशी त्यांच्या अर्जातील मागणी आहे. कालावधी न देता सरसकट माहितीची मागणी अपीलकर्त्यांनी करणे योग्य नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अंनत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, कळस, ता.हवेली, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी लोहगाव, मु.पो.लोहगांव,
ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७०७ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अंनत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, कळस, ता.हवेली, जि.पुणे श्री.आय.यु.पटेल

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी लोहगाव, मु.पो.लोहगांव,
ता.हवेली, जि.पुणे श्री.आर.टी.कांबळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

नोव्हेंबर २००८ मधील दोन नोटिशींच्या संदर्भातील आजपर्यंतच्या सर्व कागदपत्रांच्या प्रतीची मागणी अपीलकर्त्यांनी केली होती. त्यानी प्रथम अपील केलेले नव्हते. 'तक्रार संपुष्टात आली. माहिती मिळाली. अर्ज निकाली काढण्यात यावा,'असे अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले असून संयुक्त निवेदनावर जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचीही स्वाक्षरी आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अंनत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, वडगांव शेरी, मु.पो.वडगाव शेरी,
ता.हवेली, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी वडगांव शेरी, मु.पो.वडगाव शेरी,
ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १८२८ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.अंनत देऊ गावडे<br>सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, वडगांव शेरी, मु.पो.वडगाव शेरी, ता.हवेली, जि.पुणे श्री.आय.यु.पटेल<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी वडगांव शेरी, मु.पो.वडगाव शेरी, ता.हवेली, जि.पुणे श्री.एस.बी.भोरडे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

एकूण क्षेत्रफळाच्या वाटणीची ७/१२ उताऱ्यावरील नोंद कशाच्या आधारे केली, अशी माहिती अपीलकर्ता श्री.अंनत देऊ गावडे यानी मागितली होती. संबंधित वाटणीबाबतचा कालावधी अथवा अन्य बाबी त्यानी नोंदविल्या नाहीत. तलाठी कार्यालयात उपलब्ध असलेल्या ७/१२ उताऱ्याच्या प्रती दिल्या, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले.

अपीलकर्त्याची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. तसेच नेमका कालावधी न देता 'आजपर्यंत'अशा स्वरूपात माहितीची मागणी वैध नाही. 'माहिती प्राप्त झाली, शास्तीची मागणी नाही,'असे अपीलकर्ता यानी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी प्रपत्रात केलेले निवेदन लक्षात घेता, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.नंदकुमार बाबूराव काळे
(२)श्री.माणिकराव त्रिंबकराव गोते
४१/४२, कमर्शियल बिल्डिंग नं.१, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-३७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२,
४०५, मंगळवार पेठ, ससूनसमोर, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १०७४ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.नंदकुमार बाबूराव काळे
(२)श्री.माणिकराव त्रिंबकराव गोते
४१/४२, कमर्शियल बिल्डिंग नं.१, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
मध्यवर्ती इमारत, पुणे प्रतिनिधी श्री.एच.आर.चौगुले

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२,
४०५, मंगळवार पेठ, ससूनसमोर, मध्यवर्ती इमारत, पुणे श्री.आर.डी.लिंगावार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२, यांच्या कार्यालयामार्फत सन २००७-२००८ ते ३१ मार्च २००९ पर्यंत पुणे शहरातील ज्या शासकीय इमारतीच्या दुरूस्तीची कामे करण्यात आली त्या संदर्भातील सर्व माहिती देण्याची मागणी अपीलकर्ता श्री.नंदकुमार बाबूराव काळे व श्री.माणिकराव त्रिंबकराव गोते यानी केली होती. त्यांच्या दि.३०.९.२००९ च्या अर्जाला दि.१४.५.२००९ च्या पत्रान्वये उत्तर दिले. कार्यालयात येऊन कागदपत्रांची पाहणी करून आवश्यक असलेल्या प्रती घेण्याबाबत त्याना कळविले होते. मोघम स्वरूपाची मागणी असल्यामुहे अपीलकर्त्यानी अभिलेखाचे अवलोकन करावे व जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती विनाशुल्क द्याव्यात, असे आदेश प्रथम अपिलावर दिले होते. परंतु अपीलकर्त्यांनी संपर्क साधला नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे. अपीलकर्त्यानी दि.२४.११.२०११ रोजी माहिती प्रत्यक्ष पहावी व त्यानंतर छायांकित प्रती देण्यात येतील, असे ठरले. ते मान्य असून अर्ज निकाली काढण्यात यावा असे अपीलकर्त्यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

अपीलकर्त्यानी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अन्य कार्यालयातही याच स्वरूपाच्या माहितीची मागणी केली असल्याचे कागदपत्रावरून दिसून येते. ढोबळ व सरसकट स्वरूपाची माहितीची मागणी त्यानी केली असून नेमकेपणा नसल्यामुळे व संकलित करावी लागणार असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(९) प्रमाणे ती नाकारता येईल. परंतु जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहिती न नाकारता अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली आहे, ते योग्य आहे. अशा स्वरूपाची माहिती नि:शुल्क देऊन शासनाच्या पर्यायाने जनतेच्या तिजोरीवर भार टाकणे योग्य नाही. त्यामुळे माहितीसाठी योग्य ते शुल्क आकारून माहिती देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) अभिलेख अवलोकनानंतर अपीलकर्त्यास द्यावयाच्या माहितीबाबत योग्य ते शुल्क आकारून जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२, ४०५, मंगळवार पेठ, ससूनसमोर, मध्यवर्ती इमारत, पुणे यानी दि.५.१२.२०११ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे-४११०१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी,
उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७२० / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन), पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.प्रमोद यादव

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी, उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.एस.ए.गावडे

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'माहिती देण्यास विलंब झालेला नाही व अपीलकर्त्यांनी प्रथम अपील केलेले नाही,' असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे. 'माहिती पूर्ण मिळाली आहे. तक्रार नाही,' असे अपीलकर्त्यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

माहिती पूर्ण मिळाली असताना आयोगाकडे अपील करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही, सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे-४११०१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता, भूमिप्रापण कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५

<table>
<tr><td>१.</td><td>अपील क्रमांक</td><td>१७१० / २००९ / पुणे</td></tr>
<tr><td>२.</td><td>विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक</td><td>१७.११.२०११</td></tr>
<tr><td colspan="3">३. उपस्थित<br><br>अपीलकर्ता अपीलकर्ता श्री.अनंत देऊ गावडे<br>सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे<br><br>जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, भूमिप्रापण कार्यालय,<br>पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.ललित मधुकर बेंद्रे</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="2">माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.</td></tr>
</table>

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्त्यांनी ‘तक्रार संपुष्टात आली, माहिती मिळाली,’असे नमूद केले आहे. त्यास जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी संमतीदर्शक स्वाक्षरी केली आहे.

‘तक्रार संपुष्टात आली. माहिती मिळाली. अर्ज निकाली काढण्यात यावा,’असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे-४११०१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, लोहगांव,
मु.पो.लोहगाव, ता.हवेली, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी लोहगांव,
मु.पो.लोहगाव, ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७१४ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे-४११०१५

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, लोहगांव,
मु.पो.लोहगाव, ता.हवेली, जि.पुणे श्री.आय.यू.पटेल

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी लोहगांव,
मु.पो.लोहगाव, ता.हवेली, जि.पुणे श्री.आर.टी.कांबळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्त्यांनी 'तक्रार संपुष्टात आली, माहिती मिळाली,'असे नमूद केले आहे. त्यास जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी संमतीदर्शक स्वाक्षरी केली आहे.

'तक्रार संपुष्टात आली. माहिती मिळाली. अर्ज निकाली काढण्यात यावा,'असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे-४११०१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त क्र.२ , पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी, येरवडा क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, नगर रोड, पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७२६ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे-४११०१५

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त क्र.२ , पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे श्री.भानुदास माने

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी, येरवडा क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, नगर रोड, पुणे श्री.मुकुंद भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'माहिती वेळेत दिलेली आहे. तरीही अपीलकर्त्याने शहानिशा न करता अपील केले आहे. त्यामुळे आपल्या सर्वांचा वेळ गेलाच परंतु नाहक त्रासही झाला,' असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे.अपीलकर्ता श्री.अनंत देऊ गावडे यानी 'माहिती मिळाली. समाधान झाले. अपील निकाली काढण्यात यावे,' असे सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

दिलेल्या माहितीची शहानिशा करूनच अपीलकर्त्यांनी सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम वाया न जाईल याची खबरदारी घेण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.तुकाराम विष्णू कवडे
१७/अे.सी/३ इमारत, सूर्यलोकनगरी, वैदवाडी, हडपसर, पुणे-२८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विकास विभाग, विभागीय कार्यालय क्र.२, ढोले पाटील रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, (बांधकाम), विभागीय कार्यालय क्र.२, ढोले पाटील रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १३६+१३७+१३८+१३९+१४०+१४१+/ २००९ / पुणे, |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विकास विभाग, विभागीय कार्यालय क्र.२, ढोले पाटील रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.दिलीप के.पावरा

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, (बांधकाम), विभागीय कार्यालय क्र.२, ढोले पाटील रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.शि.म.भांगरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

घोरपडी गाव, बालाजीनगर, पुणे येथील स.नं.७१/२१अ च्या ७/१२ उताऱ्यावरील नोंदी, अनधिकृत बांधकामावरील कारवाई व त्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.तुकाराम विष्णू कवडे यानी मागितली होती. ती न मिळाल्याच्या कारणावरून त्यानी प्रस्तुत सहा अपिले आयोगाकडे केली आहेत. एकाच विषयाबाबत तीच तीच माहिती अपीलकर्ता पुनः पुन्हा मागणी करीत असून सर्व माहिती त्याना देण्यात आलेली आहे. कायदेशीर बाबींविषयीचे त्यांचे आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील भाग नाही. याच विषयाच्या संदर्भातील याच स्वरूपाच्या माहितीबाबतची त्यांची (अपील क्र.१४१९/२००८/पुणे, १४२०/२००८/पुणे, १४२४/२००८/पुणे, १४२४अ/२००८/पुणे, १४२९/२००८/पुणे, १४३०/२००८/पुणे, १४४३/२००८/पुणे, १५१४/२००८/पुणे, १४८४/२००८/पुणे व १३४/२००९/पुणे) अपिले राज्य माहिती आयोगाने यापूर्वी निकाली काढलेली आहेत, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे. ते रास्त आहे. त्याच त्याच विषयाबाबत त्याच त्याच माहितीसाठी व आयोगाने पूर्वी आदेश केले असतानाही पुनः पुन्हा अर्ज व अपिले करून सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम यांचा अपव्यय अपीलकर्त्यान करू नये, अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अंनत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे-४११०१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय,
खडकमाळ आळी, शुक्रवार पेठ, पुणे-४११००२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय,
खडकमाळ आळी, शुक्रवार पेठ, पुणे-४११००२

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७१२ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अंनत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय,
खडकमाळ आळी, शुक्रवार पेठ, पुणे-श्री.रणजित भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

मौजे लोहगांव, ता.हवेली, जि.पुणे येथील विमान धावपट्टीच्या विस्तारीकरणाच्या भूसंपादनासंदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.अंनत देऊ गावडे यानी दि.४.८.२००९ च्या अर्जान्वये मागितली होती. ही माहिती आपल्या कार्यालयाकडील नसल्याचे दि.२७.८.२००९ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास कळविले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, खडकमाळ आळी, शुक्रवार पेठ, पुणे यानी आयोगास अवगत केले. 'माहिती प्राप्त झाली असल्याने अपील निकाली काढण्यास हरकत नाही,'असे अपीलकर्त्यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अंगद नरहरीराव भोसले
स.नं.५३/५८, साईनाथनगर, वडगावशेरी, पुणे-४११ ०१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे
विभाग कार्यालय, ता.मुखेड, जि.नांदेड उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे
विभाग कार्यालय, ता.मुखेड, जि.नांदेड

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७७८ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.अंगद नरहरीराव भोसले<br>स.नं.५३/५८, साईनाथनगर, वडगावशेरी, पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे<br>विभाग कार्यालय, ता.मुखेड, जि.नांदेड श्री.ए.एस.डावकोरे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

ग्रामपंचायत दापका गुं, ता.मुखेड, जि.नांदेड येथील लाभार्थींना सन २००० ते २००७ या काळात देण्यात आलेल्या विहिरीसंबंधीची तपशिलवार माहिती अपीलकर्ता श्री.उदयराज अनिल आळंदकर यानी मागितली होती. कळविलेले शुल्क भरल्यानंतर त्यानी उपलब्ध माहिती देण्यात आली. काही माहिती इतर कार्यालयांशी संबंधित असून त्याबाबतही कळविले, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात पूरक कागदपत्रांसह नमूद केले आहे. अद्याप पूर्ण माहिती मिळालेली नाही,त्यामुळे माहिती देण्याचे निर्देश द्यावेत व दंड करावा, असे अपीलकर्त्यांनी म्हटले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर दिले आहे. सात वर्षाच्या काळातील माहिती संकलित करून देण्याची अपीलकर्त्याची मागणी असून आवश्यक असल्यास प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन त्यानी संबंधित अभिलेखाचे अवलोकन करावे व हव्या असलेल्या कागदपत्राच्या प्रती प्राप्त करून घ्याव्यात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, शिंदेवाडी, मु.पो.शिंदेवाडी,
ता.भोर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, शिंदेवाडी,
मु.पो.शिंदेवाडी, ता.भोर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १८२९ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, शिंदेवाडी, मु.पो.शिंदेवाडी,
ता.भोर, जि.पुणे श्री.आर.एम.सोनवणे

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, शिंदेवाडी,
मु.पो.शिंदेवाडी, ता.भोर, जि.पुणे श्री.एच.एम.नाईकवाडी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

एका फेरफार प्रकरणी 'सुरुवातीपासून अखेरपर्यंतच्या सर्व कागदपत्रांच्या प्रती' मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.अनंत देऊ गावडे यानी केली होती. 'माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्यात यावे,' असे अपीलकर्त्यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले असून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी त्यावर सहमतीदर्शक स्वाक्षरी केलेली आहे. अपीलकर्त्यानी कालावधीचा नेमका तपशील देऊन माहितीची मागणी करणे आवश्यक आहे. 'सुरूवातीपासून अखेरपर्यंतच्या' अशा स्वरूपात कालावधी नमूद करून माहिती मागितल्यास कालावधी शोधून माहिती संकलित करून देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास दत्तात्रय बारवकर
विद्याधाम सोसायटी, चाकण, ता.खेड, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण रोड,
चव्हाणनगर, पुणे-४११ ००८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड विभाग,
खेड, ता.खेड (राजगुरूनगर), जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ४१ / २०१० / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण रोड, चव्हाणनगर, पुणे प्रतिनिधी श्री.आर.बी.माळवे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड विभाग, खेड, ता.खेड (राजगुरूनगर), जि.पुणे श्री.विनायक ढाकणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

चाकण पोलीस ठाण्याच्या बांधकामाबाबतची सन १९९८-९९ मधील माहिती अपीलकर्ता श्री.विलास दत्तात्रय बारवकर यानी दि.१७.८.२००९ च्या (प्राप्त दि.२८.८.२००९) अर्जान्वये मागितली होती. दि.१६.२.२००९ च्या पत्रान्वये उत्तर देऊन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून माहिती घेण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले, असे जन माहिती अधिकारी पूरक कागदपत्रांसह यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. त्यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बापू पांडुरंग पोळ
मु.गोखळी, पो.बिजवडी, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा वैद्यकिय अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र,
बावडा, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १३९ / २०१० / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, बावडा, ता.इंदापूर, जि.पुणे डॉ.सविता चित्रकोटी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, बावडा यांच्याकडे सन २०७ ते २००९ या काळात  आलेला निधी व त्याच्या खर्चाची सर्व कागदपत्रांच्या प्रतींसह माहिती अपीलकर्ता श्री.बापू पांडुरंग पोळ यानी दि.६.८.२००९ च्या अर्जान्वये मागितली होती. दि.१२.८.२००९ च्या पत्रान्वये उत्तर व माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. सदरची माहिती मिळाल्याने व समाधान झाल्याने अपील निकाली काढण्यात यावे, माझी तक्रार नाही, असे अपीलकर्त्याने दि.२५.२.२०११ रोजी लेखी दिले असून जन माहिती अधिकारी यानी ते आयोगाला सादर केले.

अपीलकर्त्यानी ढोबळ मानाने माहिती मागितली असून त्यात नेमकेपणा नाही. तरीही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.उदयराज अनिल आळंदकर
फ्लॅट नं.२०बी, बिल्डिंग सी-३, सूर्यलोकनगरी, पुणे-सोलापूर रोड, पुणे-१३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-३, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतुश्रृंगी विभाग,
पुणे शहर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ११६१ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.उदयराज अनिल आळंदकर<br>फ्लॅट नं.२०बी, बिल्डिंग सी-३, सूर्यलोकनगरी, पुणे-सोलापूर रोड, पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतुश्रृंगी विभाग,<br>पुणे शहर, पुणे श्री.वि.रा.माने | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

स्वतःला झालेल्या अटकेच्या संदर्भात व लॉकअपमध्ये ठेवताना कोणाला कळविले, त्याबाबतच्या दस्तऐवजाच्या प्रतींसह माहिती मागितली होती. अपीलकर्त्याच्या पत्नीने त्यांच्याविरूध्द तक्रार देऊन

त्यांच्यापासून जिवितास धोका असल्याचे सांगितल्याने ही कारवाई करण्यात आली होती. ती अपुरी, त्रोटक व पूर्णतः खोटी असून त्यासाठीच्या नकला न देता पत्ररूपाने माहिती देण्यात आली, अशी अपीलकर्त्याची तक्रार आहे.

पोलीस ठाण्याकडील माहिती देण्यास विलंब झालेला नाही. अटक रजिस्टर उतारा, स्टेशन डायरी नोंद इ. कागदपत्रे उपलब्ध असल्यास आठ दिवसांत त्याच्या प्रती देण्यात येतील, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतुशृंगी विभाग, पुणे शहर, पुणे श्री.वि.रा.माने यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नोंदविले आहे. आठ दिवसांत संपूर्ण माहिती मिळाल्यास मी स्वतः लेखी कळवीन व त्यानंतर हे अपील निकाली काढण्यात यावे, असे अपीलकर्ता श्री.उदयराज अनिल आळंदकर यानी प्रपत्रात नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केल्याप्रमाणे संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह मुद्देनिहाय उत्तर दि.२३.११.२०११ च्या पत्रान्वये स्पीड पोस्टाद्वारे पाठविल्याचे दि.२८.११.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. त्यानी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त नमूद केल्याप्रमाणे पूर्तता केली आहे. अपीलकर्त्यानी केलेले भाष्य, पक्षपाताचे आरोप या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत निर्णयाच्या नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शाहिद रजा बर्नी
डी/३, अमर क्लासिक, हडपसर, पुणे-४११०२८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशााकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा,
पुणे मंडळ कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १३९० / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, पुणे श्री.एस.आर.कारेगावकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशााकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, पुणे श्री.बी.ए.सोनवणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. वैद्यकिय कारणास्तव आपण उपस्थित राहू शकत नसल्याचे अपीलकर्त्यानी कळविले होते.

अपीलकर्ता श्री.शाहिद रजा बर्नी यानी दि.७.४.२००९ च्या अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीबाबत दि.१७.७.२००९ च्या पत्रान्वये उत्तर दिले. अन्य विभागाकडील माहिती प्राप्त करून घेऊन दि.२७.८.२००९ रोजी पुरविली. प्रथम अपिलाच्या सुनावणीदरम्यान झालेल्या चर्चेनुसार उपलब्ध परिपत्रके रूग्णालयीन प्रशासन पुस्तकातील विशिष्ट पृष्ठाच्या प्रती इ. माहिती अपीलकर्त्यास पुरविली, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.भास्कर आबाजी वायाळ
अणुवीज विभाग, राज्य आरोग्य प्रयोगशाळा, स्टेवली रोड,
लष्कर पाणीपुरवठा आवार पूलगेट, पुणे-४११००१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, अणुवीज विभाग, राज्य आरोग्य प्रयोगशाळा,
स्टेवली रोड, लष्कर पाणीपुरवठा आवार पूलगेट, पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी, अणुवीज विभाग, राज्य
आरोग्य प्रयोगशाळा, स्टेवली रोड, लष्कर पाणीपुरवठा आवार पूलगेट, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६०५ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता श्री.भास्कर आबाजी वायाळ यानी आश्वासित प्रगती योजने अंतर्गत लाभ मिळण्याबाबत अर्ज केला होता व त्या संदर्भातील माहिती मागितली होती. त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची होती व त्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती त्याना देण्यात आली होती. कार्यवाही पूर्ण झ ााल्यानंतर त्यांची तक्रार राहिली नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगास

अवगत केले. 'कार्यालयाने योग्य दखल घेऊन योग्य ती कार्यवाही केल्यामुळे माझे अपील कृपया निकालात काढावे,' असे लेखी निवेदन अपीलकर्त्यांनी दि.२.११.२०११ च्या पत्राने आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विश्वास भांबुरकर
बी-७२, सॅटेलाईट सेंटर, वस्त्रापूर, अहमदाबाद-३८००१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, इंदिरा इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, तपस्या, स.नं.८५/५-अ, नवीन पुणे-मुंबई हायवे, न्यू वाकड पोलीस चौकीजवळ, पुणे-३३ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा इंदिरा इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, तपस्या, स.नं.८५/५-अ, नवीन पुणे-मुंबई हायवे, न्यू वाकड पोलीस चौकीजवळ, पुणे-३३

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७३१ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, इंदिरा इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, तपस्या, स.नं.८५/५-अ, नवीन पुणे-मुंबई हायवे, न्यू वाकड पोलीस चौकीजवळ, पुणे डॉ.तरीता शंकर

**जन माहिती अधिकारी** तथा इंदिरा इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, तपस्या, स.नं.८५/५-अ, नवीन पुणे-मुंबई हायवे, न्यू वाकड पोलीस चौकीजवळ, पुणे श्री.विजय राजोपाध्ये

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपील क्र.सीआयसी / एसजी / ए / २००९ / ०००६३६ च्या अन्वये केंद्रीय माहिती आयोग, नवी दिल्ली यांनी सदर अपील निकाली काढलेले आहे. सदर निकालान्वये श्री चाणक्य एज्युकेशन सोसायटी ही माहिती अधिकारांतर्गत येत नाही. केंद्रीय माहिती आयोगाच्या निकालाची प्रत सोबत जोडलेली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे-४११०१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, विभागीय कार्यालय, येरवडा, नगर रोड, पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७१७ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे-४११०१५

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे श्री.राजेंद्र राऊत

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका,
विभागीय कार्यालय, येरवडा, नगर रोड, पुणे-६ श्री.प्रताप धायगुडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'माहिती मिळाली, समाधान झाले, अपील निकाली काढण्यात यावे,' असे अपीलकर्ता श्री.अनंत देऊ गावडे यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले असून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनीही मान्यतादर्शक स्वाक्षरी केलेली आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष आर.पाटील
३, जेलरोड, येरवडा, पुणे-४११००६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक अधिकारी, पुणे, महाराष्ट्र प्रदूषण व नियंत्रण मंडळ, पुणे, दुसरा मजला, जोग सेंटर, पुणे मुंबई रस्ता, वाकडेवाडी, पुणे-३ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्रादेशिक अधिकारी, पुणे, महाराष्ट्र प्रदूषण व नियंत्रण मंडळ, पुणे, दुसरा मजला, जोग सेंटर, पुणे मुंबई रस्ता, वाकडेवाडी, पुणे-३

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७०३ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुभाष आर.पाटील
३, जेलरोड, येरवडा, पुणे-४११००६

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्रादेशिक अधिकारी, पुणे, महाराष्ट्र प्रदूषण व नियंत्रण मंडळ, पुणे, दुसरा मजला, जोग सेंटर, पुणे मुंबई रस्ता, वाकडेवाडी, पुणे श्री.प्र.प्र.धायगुडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

घनकचरा व्यवस्थापनाबाबतची अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती अपीलकर्ता श्री.सुभाष आर.पाटील यानी मागितली होती. उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका यांच्याकडील माहिती असल्यामुळे विहित मुदतीत अपीलकर्त्यास तसे कळवून अर्ज वर्ग करण्यात आला होता. त्यानी पाठविलेली माहिती मिळाली नसल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे असल्यामुळे त्याची प्रत आज (दि.१७.११.२०११) रोजी अपीलकर्त्यास देण्यात येत आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे. सदरची माहिती दिल्यामुळे अपील निकाली काढण्यात यावे, असे अपीलकर्त्यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे-४११०१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, येरवडा क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, येरवडा, नगर रोड, पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७२२ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे श्री.राजेंद्र राऊत

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, येरवडा क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, येरवडा, नगर रोड, पुणे श्री.प्रताप धायगुडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'माहिती मिळाली, समाधान झाले, अपील निकाली काढण्यात यावे,' असे अपीलकर्ता श्री.अनंतर देऊ गावडे यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले असून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनीही मान्यतादर्शक स्वाक्षरी केलेली आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष आर.पाटील
३, जेलरोड, येरवडा, पुणे-४११००६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा चिटणीस, महसूल शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वर कारकून, महसूल शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १०६४ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुभाष आर.पाटील
३, जेलरोड, येरवडा, पुणे-४११००६

**अपिलीय प्राधिकारी** तथा चिटणीस, महसूल शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे
श्रीमती सीमा होळकर

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वर कारकून, महसूल शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्रीमती कुसुम हुणजगी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

ग्रँट ऑफ सॉईल या प्रकारच्या देवस्थान ईनाम जमिनीच्या संदर्भातील एका पत्राची प्रत देऊन त्या प्रकरणातील सुरूवातीपासून आतापर्यंतच्या सर्व कागदपत्रांच्या नकला द्याव्यात, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुभाष आर.पाटील यानी केली होती. संबंधित संचिका आपल्या कार्यालयातील नसल्यामुळे अपीलकर्त्यास तसे विहित मुदतीत कळविले होते. प्रथम अपील निकाली काढतानाही तसे स्पष्ट केले होते. सबंधित माहिती विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाकडील असून अपीलकर्त्यांनी त्यांच्याकडे अर्ज केला असल्यामुळे अपील निकाली काढावे, असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अंगद नरहरीराव भोसले
स.नं.५३/५८, साईनाथनगर, वडगावशेरी, पुणे-४११०१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
देवणी, ता.देवणी, जि.लातूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
देवणी, ता.देवणी, जि.लातूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७७९ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अंगद नरहरीराव भोसले
स.नं.५३/५८, साईनाथनगर, वडगावशेरी, पुणे-४११०१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
देवणी, ता.देवणी, जि.लातूर श्री.एन.एस.दाताळ

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
देवणी, ता.देवणी, जि.लातूर श्री.ए.व्ही.मांदळे

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या प्रकरणातील चौकशी पूर्ण होऊन माहिती देणे आवश्यक असल्यामुळे विलंब झाला. चर्चेनुसार माहिती आज देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे. संपूर्ण माहिती मिळाली व संबंधिताना शास्ती करावी, अशी मागणी अपीलकर्त्यांनी नमूद केली आहे. तथापि, मूळ प्रकरणातील कार्यवाही करून माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निवेदन लक्षात घेता ती अमान्य करण्यात येत आहे. मात्र अशा संदर्भातील त्या त्या वेळच्या स्थितीबाबतचे / मूळ अर्जातील मागणीच्या अनुषंगाने द्यावयाचे उत्तर व प्रथम अपिलाचा निर्णय विहित मुदतीत देणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अंगद नरहरीराव भोसले
स.नं.५३/५८, साईनाथनगर, वडगावशेरी, पुणे-४११ ०१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, कै.सौ.शैलाताई रतनमाळी
डी.एड.कॉलेज लेन-२,ससाणे नगर, हडपसर, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, कै.सौ.शैलाताई रतनमाळी
डी.एड.कॉलेज लेन-२,ससाणे नगर, हडपसर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १५१९ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अंगद नरहरीराव भोसले
स.नं.५३/५८, साईनाथनगर, वडगावशेरी, पुणे-४११ ०१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, कै.सौ.शैलाताई रतनमाळी डी.एड.कॉलेज लेन-२,
ससाणे नगर, हडपसर, पुणे श्री.आर.एन.माळी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, कै.सौ.शैलाताई रतनमाळी डी.एड.कॉलेज
लेन-२,ससाणे नगर, हडपसर, पुणे श्री.यु.डी.सावंत

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता श्री.अंगद नरहरीराव भोसले याना दि.२८.४.२००९ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती स्वीकारण्याबाबत दि.८.५.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. माहिती उपलब्ध असून ती देण्यास तयार आहोत, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे. विलंबाची विचारणा करून निकाली काढावे, असे अपीलकर्त्यानी प्रपत्रात नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेला खुलासा पाहता त्यांचा पत्रव्यवहार अपीलकर्त्यास प्राप्त झाला नसल्याचे दिसून येते. या स्थितीत जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क देणे योग्य राहील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कै.सौ.शैलाताई रतनमाळी डी.एड.कॉलेज लेन-२, ससाणे नगर, हडपसर, पुणे यानी अपीलकर्त्यास 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त ठरल्याप्रमाणे माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक अधिकारी, पुणे, महाराष्ट्र प्रदूषण व नियंत्रण मंडळ, पुणे, दुसरा मजला, जोग सेंटर, पुणे मुंबई रस्ता, वाकडेवाडी, पुणे-३ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्रादेशिक अधिकारी, पुणे, महाराष्ट्र प्रदूषण व नियंत्रण मंडळ, पुणे, दुसरा मजला, जोग सेंटर, पुणे मुंबई रस्ता, वाकडेवाडी, पुणे-३

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७१५ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्रादेशिक अधिकारी, पुणे, महाराष्ट्र प्रदूषण व नियंत्रण मंडळ, पुणे, दुसरा मजला, जोग सेंटर, पुणे मुंबई रस्ता, वाकडेवाडी, पुणे श्री.प्र.प्र.धायगुडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

माहिती मुदतीत देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. माहिती दिल्यामुळे अपील निकाली काढण्यात यावे, असे अपीलकर्ता श्री.अनंत देऊ गावडे यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. महानगरपालिकेवर कायदेशीर कारवाई त्वरित करावी व त्याची प्रत द्यावी, ही अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कारवाईची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष आर. पाटील
३, जेल रोड, येरवडा, पुणे-६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अभियंता (गार्डन विभाग), पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता (गार्डन विभाग), पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १६७६ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुभाष आर. पाटील
३, जेल रोड, येरवडा, पुणे-६

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता (गार्डन विभाग), पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे श्री.प्रविण वा.गेडाम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'अपीलकर्त्यांनी (नदीकाठावरील रस्त्याबाबत) मागितलेली माहिती त्याना देण्यात आलेली असून ती त्याना मान्य आहे. ऊर्वरित माहिती संबंधित विभागाकडून ते घेणार आहेत, त्यामुळे अपील निकाली काढण्यात यावे,' असे अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे. हे निवेदन लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.नंदकुमार बाबूराव काळे
(२)श्री.माणिकराव त्रिंबकराव गोते
४१/४२, कमर्शियल बिल्डिंग नं.१, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-३७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, छोटे पाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, छोटे पाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ११७८ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.नंदकुमार बाबूराव काळे
(२)श्री.माणिकराव त्रिंबकराव गोते
४१/४२, कमर्शियल बिल्डिंग नं.१, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, छोटे पाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, पुणे श्री.स.वा.शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, छोटे पाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, पुणे श्री.डी.जी. काटकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

सन २००४-२००५ ते २००७-२००८ या काळात पुणे जिल्ह्यात छोटे पाटबंधारे विभागातर्फे ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत झालेल्या सर्व मृद् व जलसंधारणाच्या कामांची माहिती अपीलकर्त्यांनी मागितली हाती. परंतु 'शुल्क भरूनही काही तालुक्यांची माहिती मिळाली नाही. काही तालुक्यांची माहिती अपुरी मिळाली, म्हणून जन माहिती अधिकाऱ्याना दंड करावा,'अशी मागणी अपीलकर्ता श्री.नंदकुमार बाबूराव काळे व श्री.माणिकराव त्रिंबकराव गोते यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नोंदविली आहे.

'अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती बहुतांश तालुका स्तरावरील असून विभागीय स्तरावरील माहिती शुल्क भरताच उपलब्ध करून दिलेली आहे. अन्य माहितीसाठी अर्ज संबंधित तालुक्याच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे वर्ग करून त्यांच्याकडून माहिती घेण्याबाबत अपीलकर्त्यास मुदतीत कळविले,'असे जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, छोटे पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, पुणे श्री.डी.जी.काटकर व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, छोटे पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, पुणे श्री.स.पां.शिंदे यानी प्रपत्रात नमूद केले आहे.

प्रपत्रातील नोंदी व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यांनी सरसकटपणे व अत्यंत विस्तृत स्वरूपातील माहिती मागितली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(९) अन्वये ती नाकारता येऊ शकते. तथापि जन माहिती अधिकारी यानी विभागीय स्तरावरील माहिती देऊन ऊर्वरित माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे-४११०१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष अधिकारी, भूमी आणि जिंदगी विभाग,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक, भूमी आणि जिंदगी विभाग,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७२४ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | दि.१७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष अधिकारी, भूमी आणि जिंदगी विभाग,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक, भूमी आणि जिंदगी विभाग,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे
\

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

‘अनेक वर्षे होऊनही पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने भू-संपादन केलेल्या त्यांच्या मिळकतीस त्यांचे नाव हक्क-नोंदणीस दाखल करून घेतले नाही. याबाबत माहिती द्यावी,’ अशी मागणी अपीलकर्ता श्री.अनंत देऊ गावडे यानी केली होती. वस्तुतः त्यानी एक निवेदन केले असून माहिती नेमकेपणाने मागितलेली नाही. अशी मागणी योग्य नाही. तथापि, ‘माहिती मिळाली, अपील निकाली काढण्यात यावे,’ असे निवेदन अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात केले असून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनीही स्वाक्षरी केली आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे-४११०१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता, भूमिप्रापण कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७२३ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं.३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, भूमिप्रापण कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.ललित मधुकर बेंद्रे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'अर्जदारास विहित मुदतीत उत्तर दिले होते. अर्जदाराचे दि.१०.८.२००९ चे अपील अर्जानुसार दि.२४.८.२००९ रोजी व ३१.८.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली होती. दोन्ही वेळेस अर्जदार श्री.गावडे सुनावणीस गैरहजर होते,' असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. 'माहिती मिळाली, समाधान झाले, अपील निकाली काढण्यात यावे,' असे अपीलकर्ता यानी प्रपत्रात नमूद केले आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष आर. पाटील
३, जेल रोड, येरवडा, पुणे-६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी,
उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १७०६ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुभाष आर. पाटील
३, जेल रोड, येरवडा, पुणे-६

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.प्रमोद यादव

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी, उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन)
कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.एस.ए.गावडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्त्यास कळविलेले शुल्क न भरल्यामुळे कागदपत्रांच्या प्रती दिल्या नाहीत. मात्र अन्य माहिती दिली. त्यानी प्रथम अपील केलेले नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. 'दिलेली माहिती अपीलकर्त्यास मान्य आहे, अपील निकाली काढण्यास विनंती आहे,' असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तरीत्या नोंदविले आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.हरिभाऊ रघुनाथ काकडे
15/बी-1, सर्वत्र सहकारी गृहरचना मर्यादित,
पौड रस्ता, कोथरुड,
पुणे-411 038

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, 4 था मजला,
विधान भवन समोर,
पुणे-411 001

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा, कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, 4 था मजला,
विधान भवन समोर,
पुणे-411 001

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2494/2011/पुणे |
| २ | मूळ अर्जान्वये केलेली मागणी :- श्री.हरिभाऊ काकडे यांच्या आयोगाकडील अपिल क्रमांक 2484/पुणे, 241/2009/पुणे व 2662/पुणे या तिनही अपिलांवर आयोगाने दि.14.5.2010 रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने खुलासेवजा स्वरुपातील माहिती व अभिप्राय | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.हरिभाऊ रघुनाथ काकडे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, यांनी दिलेला निर्णय योग्य आहे. खुलासा, स्प्ष्टीकरण अशा स्वरुपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मधील 'माहिती' च्या संज्ञेत येत नाही. तसेच आयोगाच्या आदेशाबाबत अशी विचारणा करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-22.11.2011**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

सौ.प्राची प्रशांत कुंभारे
प्रगती पार्क, प्लॉट नं.५१, रो.हाऊस नं.१,
सेक्टर नं.१६, राजेशिवाजीनगर, चिखली,
चिंचवड, पुणे-१९

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याध्यापक,**
भालेराव हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज,
सावनेर रोड, जि.नागपूर

**उत्तरवादी**

**१.जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी,**
रविनगर शिक्षण विभाग, जि.नागपूर

**२.जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
भालेराव हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज,
सावनेर, जि.नागपूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२९/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सहाव्या वेतन आयोगानुसार थकबाकी मिळणेबाबत. | |

**विवेचन**

अपीलकर्त्या सौ.प्राची प्रशांत कुंभार यानी राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ यांच्याकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, नागपूर यानी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता सहाव्या वेतन आयोगानुसार थकबाकी मिळण्यास विलंब का झाला, कोण जबाबदार इ.च्या स्पष्टीकरणाची अपीलकर्त्याची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २२.११.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.आलम अमिन तांबोळी
आळंदी देवाची, ता.खेड, **अपीलकर्ता**
जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),**
जिल्हा परिषद, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा,**
**प्रशासन अधिकारी,**
आळंदी नगरपालिका शिक्षण मंडळ,
आळंदी, ता.खेड
जि.पुणे.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६२/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>आळंदी नगरपालिकेच्या शाळा क्र.१ मधील उपशिक्षिका श्रीमती आत्तार यांच्या सेवा ज्येष्ठता व वरिष्ठ वेतन श्रेणी संदर्भातील माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.आलम अमिन तांबोळी यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता आयोगाने त्यांच्या याच विषयाबाबतच्या अन्य अपिलांवर (अपिल

क्र. १०६९/पुणे, १३७१/पुणे, ७१९१/पुणे) यापूर्वी आदेश पारित केलेले आहेत. तेच आदेश प्रस्तुत अपिलामध्ये देखील लागू होतात. अपीलकर्ता श्री.तांबोळी यांनी आवश्यक तर सर्व संबंधीत संचिकांचे आवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरुन घ्याव्यात. पुन:पुन्हा त्याच विषयासाठी सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय करु नये, अशी समज श्री.तांबोळी याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८.११.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मनमोहनसिंग आनंद
पॅरॉगॉन मोटर्स, बीजी१(बी), कोनार्क इस्टेटस,
पूना क्लबसमोर, ९ कॅनॉट रोड, पुणे-१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन भांडार,
दापोडी, पुणे-१२ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय भांडार अधिकारी,
नियंत्रक यांचे कार्यालय, राज्य परिवहन भांडार, दापोडी, पुणे-१२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२३ / २००९ / पुणे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

'किंग्ज वे इंडस्ट्रियल कॉर्पोरेशन'कडून कडून सन १९८५ पासून राज्य परिवहन महामंडळाला करण्यात आलेला साहित्य पुरवठा व देयके याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.मनमोहनसिंग आनंद यानी दि.६.४.२००९ च्या अर्जाद्वारे मागितली होती. वीस वर्षांपूर्वीची अशा प्रकारची माहिती राज्य परिवहन महामंडळाच्या प्रचलित नियमानुसार जतन केली जात नाही. त्यामुळे देता येत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा विभागीय भांडार अधिकारी, नियंत्रक यांचे कार्यालय, राज्य परिवहन भांडार, दापोडी, पुणे यानी दि.२०.४.२००९ च्या पत्रान्वये त्याना कळविले. त्याविरूध्द त्यानी केलेल्या अपिलाचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन भांडार, दापोडी, पुणे यानी दि.८.९.२००९ च्या

पत्रान्वये त्याना कळविला. 'गेल्या आठ वर्षात किंग्ज वे इंडस्ट्रियल कॉर्पोरेशन, पुणे यांच्याकडून कोणत्याही साहित्याचा पुरवठा महामंडळाला करण्यात आलेला नाही,' असे स्पष्ट करून अपिलीय प्राधिकाऱ्यानी महामंडळातील अभिलेख जतनाच्या संदर्भातील स्थायी आदेशाची प्रतही अपीलकर्त्यास पुरविली. परंतु 'जन माहिती अधिकारी आपल्याला चुकीची व निराधार माहिती देत आहेत. संबंधित संस्थेकडून शेवटच्या साहित्याचा पुरवठा केव्हा झाला, तो महिना व तारीख कळविण्यासारखी मागणीही वीस वर्षांपूर्वीची असल्याचे ठरू शकत नाही. अभिलेख जतनाच्या संदर्भातील नियमाची प्रत त्याच वेळी जन माहिती अधिकारी यानी द्यावयास हवी होती,'असे प्रतिपादन अपीलकर्ता यानी राज्य माहिती आयेगाकडील अपील अर्जात केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेख अवलोकनाचा आणि त्यातून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती सशुल्क प्राप्त करून घेण्याचा मार्ग उपलब्ध आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २२.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विद्याधर बाजीराव घायाळ
सर्व्हे नं.167, महादेव नगर,
पो.मांजरी फार्म, **अपीलकर्ता**
पुणे-412 307

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,
सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य,
रायगड इमारत, राष्ट्रीय युध्द स्मारका समोर,
घोरपडी, पुणे-411 001 **उत्तरवादी**
जन माहिती अधिकारी तथा, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी
सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य,
रायगड इमारत, राष्ट्रीय युध्द स्मारका समोर,
घोरपडी, पुणे-411 001

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2411/2011/पुणे |
| २ | मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-<br>अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.विद्याधर बाजीराव घायाळ यानी राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांनी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबत माहिती - मागणी अर्ज जोडपत्र अ, प्रथम अपील अर्ज

जोडपत्र ब, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे, तसेच योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने मर्जीतर वरील कागदपत्रे व शुल्क जोडून अपील फेर सादर करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- 22.11.2011**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रवि महापुरे
110, सुती मोहल्ली, खडकी,

**अपीलकर्ता**

पुणे-411 003

**जन माहिती अधिकारी तथा, कार्यकारी अभियंता,** **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
शिवाजीनगर पुणे,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2512/2011/पुणे |
| २ | मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-<br>अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.रवि महापुरे यानी राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांनी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबत माहिती-मागणीचा अर्ज जोडपत्र अ, प्रथम अपील अर्ज जोडपत्र ब, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे, तसेच योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर)

जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने मर्जीतर वरील कागदपत्रे व शुल्क जोडून अपील फेर सादर करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-22.11.2011**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रवि महापुरे
110, सुती मोहल्ली, खडकी, **अपीलकर्ता**
पुणे-411 003

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2510/2011/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.रवि महापुरे यानी राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांनी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबत माहिती-मागणी अर्ज अ, जोडपत्र प्रथम अपील अर्ज जोडपत्र ब, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे, तसेच योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने मर्जीतर वरील कागदपत्रे व शुल्क जोडून अपील फेर सादर करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.** **(विजय कुवळेकर)**
**दि :-१८.११.२०११** **राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विलास शंकर शेलार
सर्व्हे नं.54/1ए, एस.आर.पी.रोड, **अपीलकर्ता**
वानवडी, पुणे-411 040

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र.4, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-411 005 **उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा, उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र.4, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-411 005

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2511/2011/पुणे |
| २ | मूळ अर्जान्वये केलेली मागणी :- स.नं.53/6 7 वानवडी वरील बांधकाम परवानगी बाबत | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.विलास शंकर शेलार यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत माहिती-मागणी अर्ज अ, जोडपत्र प्रथम अपील अर्ज जोडपत्र ब, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे, तसेच योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही

करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने मर्जीतर वरील कागदपत्रे व शुल्क जोडून अपील फेर सादर करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-18.11.2011**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवशंकर विश्वनाथ घोलप
मु.महागांव, पो.बावी, ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (सं.व.सु.), महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता(ग्रामीण), उपविभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १६३२ / २००९ / कोल्हापूर |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवशंकर विश्वनाथ घोलप
मु.महागांव, पो.बावी, ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (सं.व.सु.), महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी, जि.सोलापूर श्री.संजय बाळकृष्ण साळे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता(ग्रामीण), उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्यादित, बार्शी, जि.सोलापूर श्री.लिंबराज महादेव बंडगर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

आश्रमशाळा, तांबेवाडी (तांडा) या शाळेच्या विद्युत पुरवठ्यासंबंधातील माहिती अपीलकर्ता श्री.शिवशंकर विश्वनाथ घोलप यानी मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यानी अपुरी माहिती दिल्याची त्यांची तक्रार होती. अपीलकर्त्यानी योग्य त्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज केला नव्हता. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार उपलब्ध झालेली माहिती रजिस्टर्ड टपालाने अपीलकर्त्यास दिली. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.आर.सी.बारस्कर यांचे दि.१७.५.२०१० रोजी निधन झाले, असे तपशीलवार निवेदन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(ग्रामीण), उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी, जि.सोलापूर श्री.लिंबराज महादेव बंडगर व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सं.व सु.), उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी, जि.सोलापूर श्री.संजय बाळकृष्ण साळे यानी आयोगाला सादर केले. पुनश्च शोध घेऊन उपलब्ध होणारी माहिती १५ दिवसांत देत आहोत, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले असून, अपूर्ण माहिती मिळाली ती पूर्ण मिळावी, असे अपीलकर्त्यानी नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. तसेच पुनश्च शोध घेऊन उपलब्ध होणारी माहिती १५ दिवसांत देण्याबाबत उभय बाजूंचे एकमत असल्याचे सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नोंदविलेले आहे. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.परशराम बंडू पाटील
३१५, खेडे, ता.आजरा, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, आजरा, तहसीलदार
कार्यालय आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसीलदार
कार्यालय आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ३२६९ / २०१० / कोल्हापूर |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.परशराम बंडू पाटील
३१५, खेडे, ता.आजरा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, आजरा, तहसीलदार कार्यालय आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.बी.एस.पवार

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसीलदार कार्यालय आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.टी.व्ही.पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता श्री.परशराम बंडू पाटील यानी जमिनीच्या वटमुखत्यार म्हणून नोंदीच्या संदर्भात सन १९७७-७८ व १९७८-७९ मधील माहिती मागितली होती. तसेच अशा नोंदीच्या कायदेशीरपणाबाबतचे अभिप्रायही विचारले होते. त्यांचा दि.७.९.२०१० चा अर्ज दि.९.९.२०१० रोजी प्राप्त झाला व दि.१७.९.२०१० च्या पत्रान्वये त्याना मुद्देनिहाय उत्तर दिले. कायदेशीर बाबीविषयीच्या त्यानी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत त्यानी विधितज्ज्ञाचा सल्ला घेणे उचित होईल, असेही कळविले. कार्यपध्दती व नियमावलीबाबतची माहितीही पुरविली. कळविलेले शुल्क त्यानी भरलेले नाही. त्यावरून त्याना माहितीची गरज नसल्याचे दिसते, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी पूरक कागदपत्रांच्या प्रतींसह सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. आयोगाने यापूर्वी अपीलकर्ता यांची अपील क्र.४६४/२००९, २६५/२००९, ४७७/२००९, २७८/२००९, १२६०/२००९ ही अपिले निकाली काढलेली आहेत, याकडेही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लक्ष वेधले आहे. मागणी केलेली संपूर्ण माहिती पूर्वीच्या कागदपत्रांच्या प्रतींसह मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता यानी नोंदविली आहे.

उभय बाजूंनी प्रपत्रात केलेल्या नोंदी व सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.नंदकुमार बाबूराव काळे
(२)श्री.माणिकराव त्रिंबकराव गोते
४१/४२, कमर्शियल बिल्डिंग नं.१, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-३७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी,
पुणे जिल्हा परिषद, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १०७१ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,<br>पुणे जिल्हा परिषद, पुणे-श्री.बी.एम.वराळे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे<br>श्रीमती सविता शालगर | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

सन २००३ ते २००८ या काळात पुणे जिल्ह्यात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत विविध तालुक्यामध्ये झालेल्या कामांची, तसेच वनविभागाने मृद् व जलसंधारण व भू-सुधारणांची प्रस्तावित केलेली कामे इ.संदर्भात अपीलकर्ता श्री.नंदकुमार बाबूराव काळे व श्री.माणिकराव त्रिंबकराव गोते यानी माहिती मागितली होती. अत्यंत विस्तृत स्वरूपाची व जिल्ह्यातील सर्व तालुक्यामधील आणि तीन विभागांशी संबंधित अशी ही माहिती होती. विहित मुदतीत उत्तर दिले. वनविभाग, भोर यानी यापूर्वीच माहिती दिली असून त्या संदर्भातील अपीलकर्त्याचे अपील क्र.१०६५/२००९/पुणे आयोगाने यापूर्वीच दि.१०.२.२०११ रोजी निकाली काढले आहे. वनविभाग, पुणे यानी माहितीसाठी कळविलेले शुल्क रूपये २५०००/- अपीलकर्त्यानी भरलेले नाही. त्यामुळे माहिती दिलेली नाही. अन्य माहिती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या अभिलेखातील असून ती वेळेत उपलब्ध करून दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील पाच वर्षांच्या काळातील अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती सरसकटपणे मागितली आहे. वस्तुतः अनेक विभागांकडील व एवढ्या मोठ्या प्रमाणावरील माहिती संकलित करून देणे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही. तसेच कलम ७(९) खाली ती नाकारता येते. तरीही माहिती न नाकारता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी कार्यवाही केली आहे. वनविभाग, भोर यानी कार्यालयाकडील माहिती अपीलकर्त्यास पूर्वी मिळालेली असतानाही प्रस्तुत अपिलाच्या अर्जातही पुन्हा त्या माहितीची मागणी अपीलकर्त्यानी करणे योग्य नव्हते. तसेच जन माहिती अधिकाऱ्यानी कळविलेले शुल्क न भरता माहिती मिळाली नसल्याची तक्रार करण्याची त्यांची कृतीही योग्य नाही व त्यांच्या भूमिकेबाबत

प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. अशा प्रकारची मागणी हा माहितीच्या अधिकाराचा योग्य वापर नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गणेश गबरू पवार
आपलेघर सोसायटी, सर्व्हे नं.५६, चंदननगर, पुणे-४११०१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर, सिंचन भवन, फकीरवाडा, नगर-औंरगाबाद रोड, नगर-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग,
अहमदनगर, जि.अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १८११ / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर, सिंचन भवन, फकीरवाडा, नगर-औंरगाबाद रोड, नगर श्री.ना.ल.साबळे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, अहमदनगर, जि.अहमदनगर श्री.दि.वि.पिंगळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता श्री.गणेश गबरू पवार यानी मागितलेली माहिती, कळविलेले शुल्क प्राप्त झाल्यानंतर देण्यात आली. तत्कालीन उपविभागीय अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, अहमदनगर, जि.अहमदनगर श्री.नंदलाल काबरा यांच्या व्यक्तिगत संदर्भातील माहिती अपीलकर्त्यांनी मागितली होती. त्यांच्याच कारकिर्दीत ती देण्यात आली. दि.४.८.२०१० रोजी श्री.काबरा यांचे निधन झाले. अपीलकर्त्यानी अन्य अर्जाद्वारे माझ्या मालमत्तेच्या विवरणपत्रासह वैयक्तिक स्वरूपाची माहिती मागितली आहे. मला त्रास देण्याचा व वाईट हेतूने माझे कौटुंबिक आयुष्य उद्ध्वस्त करण्याचा त्यांचा हेतू आहे. तेव्हा मला श्री.पवार यांच्याविरूध्द न्यायालयात जाण्याची परवानगी द्यावी, असे लेखी निवेदन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, अहमदनगर, जि.अहमदनगर यानी सादर केले.

अपीलकर्त्यांनी दोन अर्जांद्वारे विशिष्ट अधिकाऱ्याबाबत गोपनीय अहवाल आदी वैयक्तिक स्वरूपाची व त्यांच्याविरूध्द नागरिकांकडून अथवा वर्तमानपत्रांमध्ये आलेल्या तक्रारी, त्यांच्या कार्यकाळातील निविदा अशी ढोबळ व सरसकट स्वरूपाची माहिती मागितली आहे. त्याबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्याच्या संदर्भात विद्यमान जन माहिती अधिकारी यानी लेखी निवेदनात केलेली विधाने चिंताजनक आहेत. मात्र त्याबाबत त्याना रीतसर कायदेशीर कारवाई करावयाची असल्यास त्यासाठी आयोगाच्या परवानगीची आवश्यकता नाही. त्याबाबतचा निर्णय त्यानी स्वतःच घ्यावयाचा आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शाहीद रजा बर्नी
डी/३, अमर क्लासिक, हडपसर, पुणे-४११०२८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा वैद्यकीय अधीक्षक, बै.जी.वैद्यकीय
महाविद्यालय, पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी, बै.जी.वैद्यकीय
महाविद्यालय, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १६४० / २००९ / पुणे |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा वैद्यकीय अधीक्षक, बै.जी.वैद्यकीय
महाविद्यालय, पुणे डॉ.अजय एस.चंदनवाले

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी, बै.जी.वैद्यकीय
महाविद्यालय, पुणे श्री.रमेश एन.जगताप

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्त्यानी वैद्यकीय कारणास्तव सदर कार्यक्रमास उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले होते.

अपीलकर्ता श्री.शाहीद रजा बर्नी यानी मूळ अर्जानुसार मुख्य प्रशासकीय अधिकारी, बै.जी.वैद्यकीय महाविद्यालय, पुणे यांच्या संदर्भात मागितलेली माहिती विहित मुदतीत देण्यात आली. बै.जी.महाविद्यालयाचे जन माहिती अधिकारी श्री.गणेश नारायण बडदरे यांच्या संदर्भातील माहिती अपूर्ण मिळाल्याची त्यांची तक्रार होती. ती देण्याचे आदेश तत्कालीन अपिलीय प्राधिकारी यानी दिले. त्यानुसार पूर्तता केली, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, बै.जी.वैद्यकीय महाविद्यालय, पुणे श्री.रमेश एन.जगताप व अपिलीय प्राधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, बै.जी.वैद्यकीय महाविद्यालय, पुणे डॉ.अजय एस.चंदनवाले यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

अपीलकर्त्यानी काही नियमांबाबत विचारणा केली असून काही मुद्दयासंदर्भात खुलासा, स्पष्टीकरण या स्वरूपाची विचारणा केली आहे. अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संभाजी निवृत्ती काळे
मु.पो.माढा रोड, ता.माढा, कुर्डुवाडी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूसंपादन अधिकारी क्र.४, करमाळा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १८४३ / २००९ / सोलापूर |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संभाजी निवृत्ती काळे
मु.पो.माढा रोड, ता.माढा, कुर्डुवाडी, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूसंपादन अधिकारी क्र.४, करमाळा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्रीमती एस.वाय.भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'अर्जातील मजकूर अपूर्ण असल्याने पुराव्यासह फेर अर्ज करावा, असे मुदतीत कळविलेले आहे. तथापि दि.१८.११.२०११ रोजी त्याना अपेक्षित माहिती समक्ष देण्यात आली.त्याची छायांकित प्रत सादर केली आहे,'असे अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तरीत्या नमूद केले आहे. उभय बाजूंची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश वसंत केसकर
मु.पो.भांबुर्डी, ता.माळशिरस, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय, माळशिरस,
ता.माळशिरस, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय, माळशिरस,
ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १६६४ / २००९ / सोलापूर |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश वसंत केसकर
मु.पो.भांबुर्डी, ता.माळशिरस, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय, माळशिरस,
ता.माळशिरस, जि.सोलापूर श्रीमती सुरेखा माने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

‘अर्जात नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे मिळाली नाहीत, परंतु ताबडतोब मिळावीत,’अशी मागणी अपीलकर्ता श्री.रमेश वसंत केसकर यानी प्रपत्रात नोंदविली आहे. अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांची नोंद कार्यालयात नसल्यामुळे अपीलकर्त्यास विहित मुदतीत तसे कळविले. त्यानी प्रथम अपील केलेले नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्रीमती सुरेखा माने यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात, दिलेल्या माहितीच्या प्रतीसह नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश वसंत केसकर
मु.पो.भांबुर्डी, ता.माळशिरस, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय, माळशिरस,
ता.माळशिरस, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय, माळशिरस,
ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १६६३ / २००९ / सोलापूर |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश वसंत केसकर
मु.पो.भांबुर्डी, ता.माळशिरस, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय, माळशिरस,
ता.माळशिरस, जि.सोलापूर श्रीमती सुरेखा माने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'अर्जात नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे मिळाली नाहीत, परंतु ताबडतोब मिळावीत,'अशी मागणी अपीलकर्ता श्री.रमेश वसंत केसकर यानी प्रपत्रात नोंदविली आहे. अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या कागदपत्राची नोंद कार्यालयात नसल्यामुळे अपीलकर्त्यास विहित मुदतीत तसे कळविले. त्यानी प्रथम अपील केलेले नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्रीमती सुरेखा माने यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

'अपील निकाली काढण्यास विनंती आहे,'असा 'चर्चा झाल्यानंतर झालेला निर्णय' अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यांनी संयुक्तपणे प्रपत्रात नोंदविलेला आहे. जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही व उभय बाजूंमधील एकमताचा निर्णय मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संभाजी निवृत्ती काळे
मु.पो.माढा रोड, ता.माढा, कुर्डुवाडी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, माढा उपविभाग, माढा
यांचे कार्यालय, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, माढा उपविभाग
यांचे कार्यालय, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १५४५ / २००९ / सोलापूर |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संभाजी निवृत्ती काळे
मु.पो.माढा रोड, ता.माढा, कुर्डुवाडी, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, माढा उपविभाग
यांचे कार्यालय, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.जी.एम.माडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

‘आरटीएस अपील क्र.२/७२ या संदर्भाबाबत माहिती पाहिजे होती. अपील अर्जामध्ये चुकून आस्थापनाची माहिती नमूद केली आहे. सबब सदरचे अपील निकाली काढण्यास विनंती आहे,’असे अपीलकर्त्यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. ‘अपील अर्जाबाबत अर्जदाराची काहीही तक्रार नसल्याने अपील निकाली काढण्यास विनंती आहे,’असे जन माहिती अधिकारी व अपीलकर्ता यांनी प्रपत्रात संयुक्तरीत्या नमूद केले आहे. उभय बाजूंची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सलीम नबीलाल नदाफ
१७१, गुरूवार पेठ, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक
आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नोडल अधिकारी, मौलाना आझाद अल्पसंख्यांक
आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ९५२ / २००९ / सोलापूर |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, सोलापूर श्री.गफ्फार आर.शेख<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नोडल अधिकारी, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, सोलापूर श्री.विनायक पाटोळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'अपीलकर्त्याने मागितलेली माहिती मोठ्या प्रमाणात, म्हणजेच २८९२ पाने पाठपोठ धरून, असून त्यास रू.२ प्रमाणे ५७८४ पृष्ठांचे एकूण रूपये ११५६८/- एवढे होतात, असे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कळविण्यात आले आहे. यात त्रास देणे किंवा अवास्तव पैसे मागणे असा कोणताही हेतू नाही. तसेच त्यानी दि.१६.२.२००८ रोजी मागितलेली माहिती त्याना देण्यात आली असून त्याना सदर माहिती प्राप्त झाल्याची नोंद जन माहिती अधिकारी यांच्याकडे आहे. 'शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यास तयारी होती व आहे. संबंधित अर्जदाराने शुल्क कळविल्यानंतर संपर्क केला नाही,'असे जन माहिती अधिकारी तथा नोडल अधिकारी, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, सोलापूर श्री.विनायक पाटोळे व अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, सोलापूर श्री.गफ्फार आर.शेख यानी पूरक कागदपत्रांसह सदरच्या कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांनी आवश्यक असल्यास शुल्क भरून माहिती प्राप्त करून घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गुलामहुसेन कासीमसाहेब शेख
६१० / ११, उत्तर कसबा, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आस्थापना अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी,
सोलापूर यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १५०२ / सोलापूर |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गुलामहुसेन कासीमसाहेब शेख
६१० / ११, उत्तर कसबा, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर प्रतिनिधी श्री.एस.आर.उबाळे

**जन माहिती अधिकारी** तथा आस्थापना अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी, सोलापूर यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर तत्कालीन श्री.एस.एम.बिराजदार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'अपीलकर्त्यांनी दि.१२.१२.२००८ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती दि.२२.१२.२००८च्या पत्रान्वये दिली. अधिक माहिती दि.१६.७.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी दिली. तसेच अर्जदार यांच्या शंकेचे निरसन झालेले आहे. अपील अर्ज निकाली काढण्यात यावा,' असे अपीलकर्ता, अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तरीत्या नमूद केले आहे. ते मान्य करण्यात येत आहे.

अपीलकर्त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मध्ये दिलेल्या 'माहिती'च्या व्याख्येनुसारच माहिती-मागणीचे अर्ज व माहितीबाबतचा पत्रव्यवहार करावा, अशी समज अपीलकर्ता श्री.गुलामहुसेन कासीमसाहेब शेख याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गुलामहुसेन कासीमसाहेब शेख
६१० / ११, उत्तर कसबा, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आस्थापना अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी,
सोलापूर यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १५००-अ / सोलापूर |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गुलामहुसेन कासीमसाहेब शेख
६१० / ११, उत्तर कसबा, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर, जिल्हाधिकारी
कार्यालय आवार, सोलापूर प्रतिनिधी श्री.एस.आर.उबाळे

**जन माहिती अधिकारी** तथा आस्थापना अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी, सोलापूर
यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर तत्कालीन श्री.एस.एम.बिराजदार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'अर्जदार यांना अलाहिदा माहिती दिलेली आहे. तसेच अर्जदार यांच्या तक्रारीचे सध्या निरसन झ ालेले आहे. अपील निकाली काढण्यात यावे,'असे जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी व अपीलकर्ता यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तरीत्या नमूद केले आहे. अपील निकाली काढण्याची उभय बाजूंची विनंती मान्य करण्यात येत आहे.

अपीलकर्त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मध्ये दिलेल्या 'माहिती'च्या व्याख्येनुसारच माहिती-मागणीचे अर्ज व माहितीबाबतचा पत्रव्यवहार करावा, अशी समज अपीलकर्ता श्री.गुलामहुसेन कासीमसाहेब शेख याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ताहीर अब्दुल रहेमान खान
मॅनेजर, श्री विठ्ठल सर्व सेवा संघ, वेणूनगर गुरबाले, ता.पंढरपूर, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मॅनेजर, श्री विठ्ठल सर्व सेवा संघ,
वेणूनगर गुरबाले, ता.पंढरपूर, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, सिव्हिल हॉस्पिटलच्या पूर्वेस, उत्तर सदर बझार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १४१ / २०१० / सोलापूर |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.ताहीर अब्दुल रहेमान खान प्रतिनिधी श्री.अजित बाळकृष्ण गिरमे
मॅनेजर, श्री विठ्ठल सर्व सेवा संघ, वेणूनगर गुरबाले, ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, सिव्हिल हॉस्पिटलच्या पूर्वेस, उत्तर सदर बझार, सोलापूर श्री.अमोल अशोक शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा मॅनेजर, श्री विठ्ठल सर्व सेवा संघ, वेणूनगर गुरबाले, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.अजित बाळकृष्ण गिरमे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

श्री विठ्ठल सर्व सेवा संघ, वेणूनगर गुरबाले, ता.पंढरपूर, जि.सोलापूर या संस्थेला शासनाकडून भरीव अर्थसहाय्य प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात होत नसले तरी व राज्य माहिती आयोगाने तसा निर्णय दिला असतानाही माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, सिव्हिल हॉस्पिटलच्या पूर्वेस, उत्तर सदर बझार, सोलापूर यानी दिले. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने श्री.भास्करराव शंकरराव कुलकर्णी विरूध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ (रीट पिटीशन क्र.५२९४ / २००८, दि.२८.४.२००९) या प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार या न्यायाला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्यामुळे अपिलीय प्राधिकारी यांचा आदेश रद्द करावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.ताहीर अब्दुल रहेमान खान यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे. तशीच नोंद त्यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात केली आहे. त्यांचे म्हणणे रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, सिव्हिल हॉस्पिटलच्या पूर्वेस, उत्तर सदर बझार, सोलापूर यांचे उपरोक्त प्रकरणातील माहिती देण्याबाबतचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रमेश कल्याणरमण अय्यर
बी-३, कलश अपार्टमेंट, **अपीलकर्ता**
११०, राव कॉलनी, समाज मंदिरा समोर,
तळेगांव-दाभाडे, पुणे-४१० ५०६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय वडगांव मावळ,
ता.मावळ, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय वडगांव मावळ,
ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२४/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अधिवास प्रमाणपत्र निर्गमित करण्यासंदर्भातील निकष | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. रमेश कल्याणरमण अय्यर याना त्यांच्या मागणीप्रमाणे माहिती न मिळाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले होते. 'दरम्यानच्या काळात सदर अधिकाऱ्यांकडून मला योग्य माहिती मिळाली असल्याने अपील चालवण्याची माझी इच्छा राहिलेली नाही. मी केलेले अपील निकाली

काढणेत यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.अय्यर यांनी आयोगास सादर केले. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.११.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड. विकास जोशी
साई सदन, फ्लॅट नं. २९, ४ था मजला,
पुण्याईनगर, धनकवडी, पुणे ४११ ०४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११००५
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहकारी अधिकारी श्रेणी (१),
सहकारी संस्था पुणे शहर (१), स.नं.५८२/डी,
गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ४११ ००७.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६५/२००९/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १७/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे
यांचे प्रतिनिधी श्री. व्ही. एम. गवळी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था पुणे शहर (१), स.नं.५८२/डी, गुलटेकडी,
मार्केटयार्ड, पुणे श्री. के. डी. नऱ्हे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

एका सहकारी गृहरचना संस्थेच्या लेखा परीक्षणासंदर्भातील माहिती अपीलकर्ता यानी मागितली होती. माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे अर्ज संस्थेकडे वर्ग करुन माहिती देण्यास विहित मुदतीत कळविले. संस्थेच्या पोटनियम दुरुस्ती संदर्भाची नस्ती विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे पाठविली होती. ती परत प्राप्त झाल्यावर लेखा परीक्षण अहवालाच्या प्रती दिल्या, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड. विकास जोशी
साई सदन, फ्लॅट नं. २९, ४ था मजला,
पुण्याईनगर, धनकवडी, पुणे ४११ ०४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११००५,
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था पुणे शहर (१), स.नं.५८२/डी,
गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ४११ ००७.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६६/२००९/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १७/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे
यांचे प्रतिनिधी श्री. व्ही. एम. गवळी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था पुणे शहर (१), स.नं.५८२/डी, गुलटेकडी,
मार्केटयार्ड, पुणे श्री. के. डी. नऱ्हे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता यानी एका पत्राच्या संदर्भात विचारणा केली असून मुदतीत माहिती दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रामचंद्र नारायण जाधव
१०० फुटी रोड, माळी वस्ती,
यशवंतनगर, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९११/२००९/सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १७/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रामचंद्र नारायण जाधव
१०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जि. सांगली श्री. जालंदर निवृत्ती कांबळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'मुदतीत माहिती मिळाल्यामुळे तसेच तारखांच्या गोंधळामुळे व्दितीय अपील चुकून दाखल झ ाालेले आहे. त्यामुळे व माहिती दिलेमुळे शास्ती करु नये. अपील निकाली काढणेस विनंती आहे', असे अपीलकर्ता यानी सदर कार्यकर्माच्या प्रपत्रात नमूद केले आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रामचंद्र नारायण जाधव
१०० फुटी रोड, माळी वस्ती,
यशवंतनगर, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९१२/२००९/सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १७/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रामचंद्र नारायण जाधव
१०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि. सांगली
श्री. दिलीप भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

कामाच्या व्यापात माहिती दिली गेली नाही. ८ दिवसांत माहिती देण्याचे ठरले आहे, असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संयुक्तपणे सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले.

'जन माहिती अधिकारी यांनी ऊर्वरित माहिती आज रोजी दिलेली आहे. त्यापासून मी समाधानी असून, त्याबद्दल माझी काहीही तक्रार नाही. त्यामुळे त्यांनी दिलेल्या प्रतिसादामुळे त्यांना कोणत्याही प्रकारची शास्ती करु  नये. उपरोक्त विषयांकित अपील निकाली काढणेस माझी हरकत नाही', असे अपीलकर्ता यानी दि. २३/११/२०११ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रामचंद्र नारायण जाधव
१०० फुटी रोड, माळी वस्ती,
यशवंतनगर, सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख सांगली, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी,
सांगली, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०९/२००९/सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १८/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रामचंद्र नारायण जाधव
१०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख सांगली, जि. सांगली यांचे प्रतिनिधी श्री. अ. द. कदम

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी,
सांगली, जि. सांगली श्री. व्ही. टी. शिंदे

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी,
सांगली, जि. सांगली श्री. व. स. निकम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

माहिती पुरविण्यात आली आहे. अपीलकर्त्यांनी प्रथम अपील केले नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. 'मागणीनुसार माहिती देण्यासाठी १५ दिवसांची मुदत देण्याचे ठरले. त्यानुसार शास्तीबाबत १५ दिवसांत पत्रव्यवहार करत आहे', असे अपीलकर्ता यानी प्रपत्रात म्हटले आहे. मात्र मूळ अर्जातील माहितीच्या अनुषंगाने कार्यालयातील परिपत्रकाची धारिका पाहण्यासाठी देण्याचे व त्यानुसार त्यानी मागणी केलेली माहिती नियमानुसार देण्याचे ठरले आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी म्हटले आहे.

अपीलकर्त्याचा मूळ अर्ज पाहता सर्वसाधारण नियमावलीबाबतची माहिती त्यानी मागितली असून अशी माहिती सार्वजनिकरीत्या उपलब्ध असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांच्याच कक्षेतील म्हणता येणार नाही. त्यामुळे ती देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. तसेच 'बदली न करण्याचे कारण' या स्वरुपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या व्याख्येनुसार 'माहिती' ठरत नाही. जन माहिती अधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य असून याच विषयाबाबतचे अपीलकर्त्यांचे यापूर्वीचे अपील क्र. ५२५/२००९/सांगली आयोगाने निकाली काढले असल्यामुळे प्रस्तुत अपीलही दखलपात्र ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रामचंद्र नारायण जाधव
१०० फुटी रोड, माळी वस्ती,
यशवंतनगर, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अन्न धान्य वितरण अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०८/२००९/सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १८/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रामचंद्र नारायण जाधव
१०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा अन्न धान्य वितरण अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, जि. सांगली श्री. अशोक दत्तात्रय मोरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'मुदतीत माहिती दिलेली आहे. माहिती मोफत दिल्याने तक्रार नाही. अपील निकाली काढणेस विनंती आहे', असे अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवशंकर विश्वनाथ घोलप
मु.महागाव, पो.बावी, ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे, पीएमटी इमारत,
दुसरा मजला, कामगार न्यायालयाचे वर, स्वारगेट, पुणे-३७ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गृहपाल, शासकीय वसतीगृह,माढा, ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १५३१ / सोलापूर |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवशंकर विश्वनाथ घोलप
मु.महागाव, पो.बावी, ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे, पीएमटी इमारत, दुसरा मजला, कामगार न्यायालयाचे वर, स्वारगेट, पुणे प्रतिनिधी सी.वाय.जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा गृहपाल, शासकीय वसतीगृह,माढा, ता.माढा, जि.सोलापूर
श्री.ए.बी.डोंसरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'श्री.शिवशंकर विश्वनाथ घोलप हे समाजकल्याण खात्याअंतर्गत असलेल्या माध्यमिक आश्रमशाळा, तांबेवाडी, ता.बार्शी, जि.सोलापूर येथे सहाय्यक शिक्षक या पदावर नियुक्त होऊन कार्यरत होते. त्यांची नियुक्ती म्हणजे अनुसूचित जातीचा उमेदवार उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आलेली होती. अनुसूचित जातीचा उमेदवार उपलब्ध झाल्यावर श्री.शिवशंकर विश्वनाथ घोलप याना सेवेतून कमी करण्यात आले. त्याविरूध्द श्री.घोलप यानी उच्च न्यायालयात दावा दाखल केलेला होता. त्यावेळी शासनाचे वतीने, म्हणजे विशेष समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांच्या वतीने श्री.घोलप यांच्या विरोधात मी ॲफिडेव्हिट दाखल केले होते. त्यानुसार उच्च न्यायालयात निकाल शासनाच्या बाजूने म्हणजे श्री.घोलप यांच्या विरूध्द लागला. मी शासनाचे बाजूने ॲफिडेव्हिट दाखल केल्यामुळे त्याचा रोष माझ्यावर धरून मी ज्या ठिकाणी कार्यरत होतो म्हणजे गृहपाल, शासकीय वसतीगृह, माढा यांच्याकडून अनेक विषयांची माहिती सातत्याने माहिती अधिकाराखाली मागण्यास त्यानी सुरू करून जेणेकरून मला शास्ती व्हावी या उद्देशाने प्रेरित होऊन पत्रव्यवहार अनावश्यक करीत राहिले,'असे लेखी निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गृहपाल, शासकीय वसतीगृह,माढा, ता.माढा, जि.सोलापूर श्री.भारत दाजी हावळे यानी उच्च न्यायालयातील प्रतिज्ञापत्राच्या प्रतीसह आयोगाला सादर केले.

'दोन वेळेस मागणीनुसार माहिती दिलेली आहे. सदरची माहिती १६ वर्षांपूर्वीची जुनी असल्याने रेकॉर्ड उपलब्ध करण्याची कार्यवाही चालू आहे,'असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा गृहपाल, शासकीय वसतीगृह,माढा, ता.माढा, जि.सोलापूर श्री.ए.बी.डोंसरे यानी प्रपत्रात नमूद केले आहे. माहिती मिळावी व जन माहिती अधिकाऱ्याना शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्त्यांनी केली आहे.

अपीलकर्त्यांनी दि.१.१.१९९२ ते दि.३१.८.२००९ अशी प्रदीर्घ कालखंडातील व्यक्तिनिहाय व त्याबाबतचा नेमका कालावधी न देता, तसेच न्यायालयीन प्रकरणासंबंधाने सरसकट माहिती मागितली आहे. ते लक्षात घेता जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. आवश्यक असल्यास

अपीलकर्ता अभिलेखाचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरून प्राप्त करून घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.फक्रोद्दिन हसन डोंगरी
मेहबूबनगर, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
मु.पो.ता.मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | २२३ / २००९ / सोलापूर |
| २. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाचा दिनांक | १८.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.फक्रोद्दिन हसन डोंगरी
मेहबूबनगर, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर
प्रतिनिधी श्री.व्ही.बी.माने

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
मु.पो.ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.एन.ए.अनपट

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

श्री सिध्दीविनायक सहकारी पतसंस्थेच्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार आपण केलेल्या अर्जावरील निर्णयाची व आदेशाची प्रत अपीलकर्ता श्री.फक्रोद्दिन हसन डोंगरी यानी दि.१५.१.२००९ च्या अर्जान्वये मागितली होती. जन माहिती अधिकारी यानी दि.१०.२.२००९ च्या पत्रान्वये शुल्क कळविले. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मु.पो.ता.मोहोळ, जि.सोलापूर यांच्या कार्यालयातून चलन तयार करून दिल्यानंतर सादर केले असता देऊ केलेली माहिती अपीलकर्त्याच्या म्हणण्याप्रमाणे बदल करून देण्यास नकार दिल्यामुळे त्यानी स्वीकारली नाही. त्यामुळे ती यूपीसीने पाठविली. त्याना हव्या असलेल्या कार्यवाहीसाठी अपीलकर्ता वारंवार त्याच विषयात माहितीच्या अधिकारान्वये अर्ज करतात व दिलेली माहिती घेत नाहीत. आपल्या मागणीप्रमाणे बदल करून मागतात, असे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. परंतु संबंधित पतसंस्थेचे कर्मचारी व जन माहिती अधिकाऱ्यांच्यासह शासकीय अधिकारी यांचे संगनमत असून आर्थिक लाभ मिळविण्यासाठी व अधिक लाभ मिळाल्याने जन माहिती अधिकारी त्रास देण्यासाठी माहिती देत नाहीत, असे अपीलकर्ता सातत्याने लेखी व तोंडी प्रतिपादन करतात म्हणून त्याना पुन्हा माहिती देण्याचे आदेश दिले, असे लेखी निवेदन विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर श्री.एस.एस.मोरे यानी आयोगाला सादर केले.

‘सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मु.पो.ता.मोहोळ, जि.सोलापूर यानी आजपासून दोन महिन्यात कारवाई करून देण्यात येईल याबाबतचे म्हणणे आज मान्य केले आहे.’असे अपीलकर्त्यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. परंतु प्रशासकीय कार्यवाही/कारवाई करणे ही बाब माहितीचा अधिकार

अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. त्यामुळे माहितीशी त्याची सांगड घालता येणार नाही, याची समज अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

सौ.शकुंतला प्रताप वाघ
मार्केट यार्डाच्या मागे,
विद्यानगर, पलूस, जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग,
कोल्हापूर विभागीय कार्यालय,
राजाराम कॉलेज परिसर, कोल्हापूर-416 004

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
पलूस, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2914/2010/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.2.11.2011 |
| 3 | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस या महाविद्यालयाने जून 1998 ते ऑगस्ट 2010 या कालावधीत अधिव्याख्याते (सहायक प्राध्यापक) यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याच्या उद्देशाने दिलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रती | |

**विवेचन**

अपीलकर्त्या सौ.शकुंतला प्रताप वाघ यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.2.11.2011 रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'मला जन माहिती

अधिकारी तथा प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस, जि.सांगली यानी माहिती दिली आहे. माहिती मिळाल्याने माझे समाधान झाले आहे', असे निवेदन अपीलकर्त्या श्रीमती वाघ यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-2.11.2011**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे  ४११ ००१

श्री.नवनाथ पांडुरंग मुंढे
रूम नं.४६, साठ कोठरी पोलीस लाईन, भगवा चौक,
कसबा बावडा, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (II),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२७६ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नवनाथ पांडुरंग मुंढे
रूम नं.४६, साठ कोठरी पोलीस लाईन, भगवा चौक,
कसबा बावडा, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (II), कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
श्री.ओमप्रकाश दिवटे

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
श्री.एस.एस.भोसले

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : कोल्हापूर महानगरपालिकेतील वर्ग १, २, ३ व ४ च्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील जात पडताळणी दाखल्यांच्या प्रतीसह माहिती दि.२३.७.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यानी माहिती अथवा उत्तरही दिले नाही. १५ दिवसात अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दि.३.११.२०१० रोजी दिले. परंतु कोणतीही माहिती मिळाली नाही. जातीचे खोटे दाखले देऊन अनेक कर्मचारी / अधिकारी कोल्हापूर महानगरपालिकेत काम करीत असल्यामुळे ही माहिती मिळणे आवश्यक आहे. विशिष्ट अधिकाऱ्यांची वा कर्मचाऱ्यांची माहिती मागितल्यास अर्जाची माहिती त्याना मिळते. त्यामुळे अर्जदार अडचणीत येतो, म्हणून अशी माहिती मागितली असल्याचे गोपनीय राखले गेले पाहिजे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यानी मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची आहे. तसेच संबंधितांचे जातीचे / जातपडताळणीचे दाखले त्या त्या वेळच्या नियुक्तीच्या ठिकाणी आहेत. मात्र महानगरपालिकेत त्याबाबतचे रजिस्टर असून ते शासनाच्या संबंधित विभागाकडून प्रमाणित करून घेतलेले आहे. अपीलकर्त्यानी मागासवर्गीय कक्षाशी संपर्क साधून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घ्याव्यात, असे त्यांना दि.५.१०.२०१० च्या पत्रान्वये कळविले होते. त्यानी संपर्क साधला नाही. म्हणून आयोगापुढील सुनावणीची सूचना प्राप्त झाल्यानंतर त्याना स्मरणपत्र दिले.

जन माहिती अधिकारी अधिकारी म्हणतात ते दि.५.१०.२०१० चे पत्र आपल्याला मिळालेले नाही. तसेच ते म्हणतात तशी विस्तृत स्वरूपाची माहिती नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता यानी केले. दि.२३.७.२०१० च्या अपीलकर्त्याच्या अर्जाला जन माहिती अधिकारी यानी दि.५.१०.२०१०च्या पत्रान्वये म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार असलेल्या तीस दिवसांच्या मुदतीपेक्षा ४४ दिवस विलंबाने उत्तर दिले. अतिरिक्त कार्यभार व माहितीचे स्वरूप यामुळे विलंब झाल्याचे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.एस.एस.भोसले यानी केले. मात्र दि.५.१०.२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यानी जे उत्तर दिले आहे. त्यासाठी

तीस दिवसाहून अधिक विलंब लागण्याचे कारण नाही. तथापि शास्तीविषयक म्हणण्यासह विलंबाचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यानी सादर करणे आवश्यक असून पुढील कार्यवाहीबाबतचा निर्णय त्यानंतर घेण्यात येईल.

अपीलकर्त्यानी मागितलेली माहिती सरसकट स्वरूपाची असून, सर्व कर्मचाऱ्यांच्या जातीच्या दाखल्यासह सर्व माहिती अशा प्रकारे उपलब्ध करून देता येणार नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित संचिकांचे / रजिस्टर्सचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेता येतील. पारदर्शकता हा माहितीच्या अधिकाराच्या कायद्याचा गाभा आहे हे लक्षात घेता, अपीलकर्त्यानी केलेली स्वतःचे अर्ज गोपनीय राखण्याची मागणी समर्थनीय ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्याच्या अर्जाला उत्तर देण्यास झालेल्या विलंबाबाबतचा खुलासा, शास्तीविषयक म्हणण्यासह जन माहिती अधिकारी तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यानी दि.३०.११.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्यानंतर पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यात येईल.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शहाजी श्रीपती पाटील
मु.पो.तिरपण, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, श्री विलासराव कोरे हायस्कूल,
म्हाळुंगे तर्फे बोरगांव, पो.का.ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१३७ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.११.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री.बाबासाहेब नाथा पाटील | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

श्री विलासराव कोरे हायस्कूल, म्हाळुंगे तर्फे बोरगांव, पो.का.ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर या शाळेतील सन २००० ते २००८ या काळातील सर्व शिक्षकांच्या सेवापुस्तकांची व गोपनीय अहवालांची प्रत

अपीलकर्ता श्री.शहाजी श्रीपती पाटील यानी मागितली होती. ही माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, श्री विलासराव कोरे हायस्कूल, म्हाळुंगे तर्फे बोरगांव, पो.का.ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यानी विहित मुदतीत कळविले. संबंधित शिक्षकांची ही वैयक्तिक माहिती असल्यामुळे त्यांच्या संमतीशिवाय देता येणार नाही. त्यांच्याशी पत्रव्यवहार करून पुढील कारवाई करावी व शक्य ती माहिती द्यावी, असा निर्णय प्रथम अपिलावर दिला, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री.बाबासाहेब नाथा पाटील यानी केले.

आयोगापुढील सुनावणीच्या दोन्ही तारखांना अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते.

सर्व शिक्षकांच्या सेवापुस्तकाची व गोपनीय अहवालाची प्रत सरसकट सर्वांना देता येणार नाही. मात्र सेवापुस्तकाच्या प्रथम व अंतिम पृष्ठाची प्रत देय ठरते. अपीलकर्त्यास हवी असल्यास त्यानुसार माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, श्री विलासराव कोरे हायस्कूल, म्हाळुंगे तर्फे बोरगांव, पो.का.ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यानी द्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगापुढील सुनावणीला अनुपस्थित असल्याबाबतचा व अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानुसार माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, श्री विलासराव कोरे हायस्कूल, म्हाळुंगे तर्फे बोरगांव, पो.का.ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यानी दि.२५.११.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्यानुसार कार्यवाही न झाल्यास त्या पुढील कारवाईस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत महादेव शिंदे
मु.पो.शेगाव, ता.जत, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, जत, तहसील कार्यालय, जत,
ता.जत, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, जत,
तहसील कार्यालय, जत, ता.जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८३१ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंत महादेव शिंदे
मु.पो.शेगाव, ता.जत, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, जत, तहसील कार्यालय, जत,
ता.जत, जि.सांगली श्रीमती वर्षा शिंगण

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, जत,
तहसील कार्यालय, जत, ता.जत, जि.सांगली श्री.सी.बी.पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : शेतकऱ्याना स्वतःच्या नावे असलेल्या शेतजमिनीत कोणकोणती कामे करण्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागते, त्या संदर्भात शासनाने पारित केलेल्या आदेशाच्या व शासन निर्णयाच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात, अशी मागणी केली होती. परंतु अशा प्रती देण्याऐवजी नियमावलीचे पुस्तक व शासन निर्णयाची पुस्तके घेण्यास जन माहिती अधिकारी यानी सांगितले व त्यासाठी रूपये १४२८ शुल्क आकारले. माहिती एक महिना विलंबाने दिली.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांच्या दि.४.६.२०१० च्या अर्जाला दि.२१.६.२०१० च्या पत्रान्वये उत्तर देऊन आवश्यक परवान्यांबाबतची माहिती कळविली. त्यानी मागितलेली अन्य माहिती सरसकट स्वरूपाची व सार्वजनिकरीत्या पुस्तकरूपाने उपलब्ध असलेली, अशी असल्यामुळे तसे कळविले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार पृष्ठसंख्येला अनुसरून रूपये १४२८ शुल्क आकारले.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यानी मागितलेली माहिती सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेल्या नियमावलीमधील व पुस्तकांमधील होती. नेमक्या कागदपत्रांच्या प्रती मागितल्यास तशा देता येतील किंवा नियमावलीचे पुस्तक ते बाजारातून प्राप्त करून घेऊ शकतील, असे दोन्ही पर्याय त्याना दिले होते. कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढण्यासाठी येणाऱ्या खर्चाएवढ्या रकमेची तरतूद कार्यालयाकडे नसल्यामुळे त्याबाबत वरिष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार केला. परंतु निधी उपलब्ध झाला नाही. या प्रक्रियेत संपूर्ण माहिती देण्यास विलंब झाला. अपीलकर्त्यानी बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन केल्याबद्दल नोटीस दिल्यामुळे ते अशा स्वरूपाची तक्रार व अर्ज करीत आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यानी ढोबळ मानाने व सरसकट स्वरूपाची माहिती मागितली असून सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली नियमावलीसारखी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याच कक्षेतील मानता येत नाही व त्यामुळे ती देणे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यानी दिलेले उत्तर योग्य आहे. तथापि पुस्तकरूपात मिळणारी माहिती देण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार रूपये २ प्रतिपृष्ठप्रमाणे शुल्क आकारणी करणे योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यास दिलेल्या माहितीची पृष्ठसंख्या व संबंधित पुस्तकाची बाजारातील किंमत लक्षात घेता रूपये १४२८ शुल्कामधील रूपये ७१४ अपीलकर्त्यास परत करावे. यानुसार कार्यवाही करून अनुपालन अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जत, तहसील कार्यालय, जत, ता.जत, जि.सांगली यानी दि.३०.११.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विश्वास रावसाहेब भोसले
१४८१, रिसाला रोड, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा नियोजन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नागाळा पार्क, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नागाळा पार्क, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९१५ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विश्वास रावसाहेब भोसले
१४८१, रिसाला रोड, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नागाळा पार्क, कोल्हापूर श्री.बी.जे.जगदाळे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नागाळा पार्क, कोल्हापूर श्री.सुरेश रामचंद्र गिरी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : क्रिडा व्यायाम साहित्य खरेदीसाठी दिलेल्या निधीचा तपशील व आयुक्त, पुणे विभाग,पुणे यानी एका प्रकरणात मागविलेल्या अहवालाची प्रत, अशी माहिती मागितली होती. परंतु कोणतीही माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्याच्या दि.२३.८.२०१० च्या अर्जातील मुद्दा क्र.१ ची माहिती आमच्या कार्यालयाच्या कक्षेतील होती. ती दि.२६.८.२०१० च्या पत्रान्वये दिली. मुद्दा क्र.२ व ३ ची माहिती जिल्हा क्रिडा अधिकारी, कोल्हापूर यांच्या कक्षेतील असल्यामुळे त्याच दिवशी अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला.

जन माहिती अधिकारी यानी मूळ जावक नोंदवही आयोगापुढे सादर करून त्याच्या छायांकित प्रतीसह पूरक कागदपत्रांच्या प्रती दाखल केल्या.

जिल्हा क्रिडा अधिकारी : आमच्या कार्यालयाकडे हे पत्र वर्ग झाल्याचे अपिलीय प्राधिकारी यानी निदर्शनास आणल्यानंतर कालच मला कळले. कार्यालयात हे पत्र उपलब्ध झाले नसल्यामुळे माझ्या निदर्शनास आले नाही. तथापि मूळ अर्जानुसार शोध घेऊन तीन दिवसांत माहिती पुरवू.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. त्यानी पाठविलेले पत्र मिळाले नसल्याची अपीलकर्त्यांची तक्रार असून जन माहिती अधिकारी त्याची प्रत त्याना पुरवू शकतात. जिल्हा क्रिडा अधिकारी, कोल्हापूर यांच्या कार्यालयात आवक बारनिशीत शोध घेऊन संबंधित पत्र केव्हा प्राप्त झाले, कोणी स्वीकारले, आदी बाबींचा खुलासा प्रभारी जिल्हा क्रिडा अधिकारी, कोल्हापूर यानी करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नागाळा पार्क, कोल्हापूर यानी जिल्हा क्रिडा अधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे वर्ग केलेल्या पत्राबाबत आवक बारनिशीतील नोंदी तपासून संबंधितांनी त्याबाबत केलेल्या पुढील कार्यवाहीचा खुलासा जिल्हा क्रिडा अधिकारी, कोल्हापूर यानी त्या कर्मचाऱ्यांकडून प्राप्त करून घ्यावा व स्वयंस्पष्ट अभिप्रायासह दि.५.१२.२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

(३) अपीलकर्त्याच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. मुद्दा क्र.२ मधील अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे याना अहवाल सादर केला असल्यास त्याची प्रत प्रभारी जिल्हा क्रिडा अधिकारी, कोल्हापूर यानी अपीलकर्त्यांना पुरवावी. असा अहवाल सादर केला नसल्यास त्यानी अपीलकर्त्यांना तसे कळवावे. याबाबतचा अनुपालन अहवाल त्यानी दि.५.१२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास बाबूराव सगरे
मु.पो.लेंगरे, ता.खानापूर, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, विटा,
ता.विटा, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत जखिनवाडी,
पो.जाधववाडी, ता.खानापूर, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९०६/२०१०/ सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विलास बाबूराव सगरे
मु.पो.लेंगरे, ता.खानापूर, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, विटा,
ता.विटा, जि.सांगली श्री.व्ही.जी.मंडले

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत जखिनवाडी, पो.जाधववाडी,
ता.खानापूर, जि.सांगली श्री.डी.बी.जावीर

| | |
|---|---|
| | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : दि.६.९.२०१० च्या अर्जान्वये ग्रामसभेचे इतिवृत्त मागितले. परंतु माहिती मिळाली नाही. प्रथम अपील दि.५.१०.२०१० ला केले. सुनावणीला जन माहिती अधिकारी हजर नव्हते. दि.११.१०.२०१० रोजी माहिती तयार असल्याचे पत्र त्यानी दिले व शुल्क कळविले. दि.१२.१०.२०१० रोजी शुल्क रू.५/- त्याना दिले. परंतु त्याची पावती व माहितीही त्यानी दिली नाही. यूपीसीने दि.१६.११.२०१० ला त्यानी दिलेली माहिती चुकीची आहे. प्रत्यक्षात महिला ग्रामसभा झालेली नसताना झाल्याचे दाखविले आहे.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांचा अर्ज दि.८.९.२०१० रोजी प्राप्त झाला. दि.६.१०.२०१० च्या पत्रान्वये त्याना शुल्क कळविले. ते म्हणतात त्याप्रमाणे त्यानी शुल्क भरलेले नाही. त्यामुळे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर दि.१७.४.२०१० रोजी माहिती पुरविली.

अपिलीय प्राधिकारी : जन माहिती अधिकारी यांचे गाव डोंगराळ भागात असून ग्रामपंचायत छोटी आहे. ग्रामसेवक कंत्राटी तत्त्वावर व नवे आहेत. त्यानी विहित मुदतीत शुल्क कळविले. शुल्क भरूनही पावती मिळाली नाही, हे अपीलकर्त्यानी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी सांगितले नव्हते. तसेच अपीलकर्त्यांच्या मूळ अर्जातील व प्रथम अपिलातील मुद्दयांमध्ये तफावत आहे व ग्रामपंचायतीच्या महिला ग्रामसभेच्या इतिवृत्ताच्याच्या नकलेव्यतिरिक्तचे त्यांचे मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तसे निकालात नमूद केले आहे.

शुल्क भरून पावती न मिळाल्याचे आपण प्रथम अपिलाच्या सुनावणीत सांगितले नव्हते, हे अपीलकर्त्यानी मान्य केले. प्रशासकीय कार्यवाहीची अथवा खुलासा, स्पष्टीकरण याची मागणी, तसेच ग्रामसभा झालेली नसताना खोटी नोंद केल्याची तक्रार या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक गणपतराव चव्हाण
वॉर्ड १२२६, प्लॉट नं.२, चोपडे मळा, लक्षतीर्थनजीक, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(I), कोल्हापूर महानगरपालिका उत्तरवादी
जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उप शहर अभियंता, विभाग कार्यालय क्र.२,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०९० / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक गणपतराव चव्हाण
वॉर्ड १२२६, प्लॉट नं.२, चोपडे मळा, लक्षतीर्थनजीक, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(I), कोल्हापूर महानगरपालिका
जि.कोल्हापूर श्री.ओमप्रकाश दिवटे

**जन माहिती अधिकारी** तथा उप शहर अभियंता, विभाग कार्यालय क्र.२, कोल्हापूर
महानगरपालिका, जि.कोल्हापूर श्री.एस.के.माने, श्री.आर.के.जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : दि.१.१.२००१ नंतर गुंठेवारी नियमित होत नाही, असे अधिकाऱ्यानी मला कळविले आहे. परंतु माझे प्रकरण त्यापूर्वीच दाखल केलेले असून त्यावर शुल्क आकारणीही झालेली आहे. माझ्यानंतर अर्ज करणाऱ्या माझ्या शेजारील व्यक्तींची गुंठेवारी प्रकरणे नियमित करण्यात आली आहेत. याबाबतचा कोणताही खुलासा देण्यात येत नाही. गुंठेवारीचे नियम नेमके काय आहेत, याची माहिती मिळावी.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यानी तीन व्यक्तींच्या गुंठेवारी प्रकरणासंदर्भातील कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या, त्या दिल्या. अन्य मुद्दे त्यानी नंतर उपस्थित केले आहेत. मात्र हव्या असल्यास संबंधित संचिका त्याना अवलोकनासाठी उपलब्ध करून देता येतील.

अपिलीय प्राधिकारी : स्वतःच्या संदर्भातील गुंठेवारी नियमित करून द्यावी, अशी अपीलकर्त्यांची मागणी आहे. प्रथम अपिलाच्या अर्जात त्यानी तसे स्पष्टपणे नमूद केले आहे. ही मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. त्याना हव्या असलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती दिल्या आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता गुंठेवारी नियमितीकरणाची अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि गुंठेवारीविषयक नियमावलीच्या अनुषंगाने त्यांच्या शंकांचे निरसन अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त(I), कोल्हापूर महानगरपालिका जि.कोल्हापूर श्री.ओमप्रकाश दिवटे यानी करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.राजेश विजय कल्याणकर
एस.टी.स्टॅण्डसमोर, झुलेलाल चौक, अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, राजवाडा चौक, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून (गृह शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, राजवाडा चौक, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९१८ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, राजवाडा चौक, सांगली प्रतिनिधी श्री.संजय पांडुरंग संकपाळ

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून (गृह शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, राजवाडा चौक, सांगली श्री.संजय पांडुरंग संकपाळ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

एका इमारतीमधील लॉजिंगसंदर्भात अपीलकर्ता ॲड.राजेश विजय कल्याणकर यांची तक्रार असून त्या अनुषंगाने सन २००१ ते २००९ या कालावधीतील कारवाईची माहिती त्यानी दि.२८.८.२००९ च्या अर्जान्वये मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (गृह शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, राजवाडा चौक, सांगली यानी माहिती अथवा समर्पक लेखी उत्तर दिले नसल्याचा निष्कर्ष अपिलीय प्राधिकारी यानी निकालपत्रात नोंदविला असून १५ दिवसांत माहिती देण्याचे आदेश दिले. त्या दरम्यान माझ्याकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता व अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार १५ दिवसांत माहिती पुरविली. दोन चुलत भावांमधील वादाचा हा विषय असून त्या अनुषंगाने अपीलकर्ता सातत्याने अर्ज व पत्रव्यवहार करीत असतात. त्याबाबत पुढील कार्यवाही त्या त्या वेळी केली जाते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (गृह शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, राजवाडा चौक, सांगली श्री.संजय पांडुरंग संकपाळ यानी केले.

विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकर्त्यांच्या अशा अर्जांवर केलेल्या कार्यवाहीच्या नोंदीबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती सादर केल्या. विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यानी माहिती देण्याबाबत कार्यवाही केली आहे. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.ए.बी.सोनवणे व श्री.आर.पी.तोडकर यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विहित मुदतीत माहिती अथवा उत्तर अपीलकर्त्यास दिले नसल्याचा निष्कर्ष अपिलीय प्राधिकारी यानीही त्यांच्या निकालपत्रात नोंदविला आहे. तो लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत तरतुदीनुसार पुढील कार्यवाहीच्या दृष्टीने म्हणणे मांडण्याची संधी म्हणून त्यांचा लेखी खुलासा घेणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी अव्वल कारकून (गृह शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, राजवाडा चौक, सांगली यानी अपीलकर्त्याच्या दि.२८.८.२००९ च्या अर्जावर

केलेल्या कार्यवाहीबाबतचा खुलासा, विहित मुदतीत कार्यवाही केली नसल्यास त्याबाबतचे स्पष्टीकरण व शास्तीविषयक म्हणणे यासह दि.५.१२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. आयोगाचे हे आदेश जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (गृह शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, राजवाडा चौक, सांगली श्री.संजय पांडुरंग संकपाळ यानी श्री.ए.बी.सोनवणे व श्री.आर.पी.तोडकर याना कळवून त्याची प्रत आयोगाला सादर करावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.परशराम बंडू पाटील
३१५, खेडे, ता.आजरा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, आजरा,
ता.आजरा, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२६८ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.११.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.बी.एच.पाटील | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आजरा तालुक्यातील सर्व पतसंस्थांचे संचालक, संस्था अवसायनात काढण्याची कार्यपध्दती इत्यादी स्वरूपाची माहिती अपीलकर्ता श्री.परशराम बंडू पाटील यानी मागितली होती. विशिष्ट कालावधी त्यानी अर्जात नमूद केलेला नव्हता. तसेच नेमकेपणाने माहिती मागितलेली नव्हती. म्हणून दोन दिवसातच त्याना तसे कळविले. त्यानी केलेल्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्यानी माहितीबाबतचे स्पष्टीकरण दिले. त्यातील त्यांच्या मागणीनुसार त्याना माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती

अधिकारी तथा मुख्य लिपिक, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.बी.एच.पाटील यानी पूरक कागदपत्रांसह केले. माहिती मिळाल्याची अपीलकर्त्याची दि.२४.११.२०१० ची पोहोचही त्यानी सादर केली.

अपीलकर्त्यानी अत्यंत ढोबळ मानाने व सरसरकट स्वरूपात माहिती मागितली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(९)अन्वये ती नाकारता येऊ शकते. तरीही अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर यानी चर्चा करून अपीलकर्त्यास कोणती माहिती हवी आहे हे जाणून घेतले व ती माहिती दिली. त्याची पोहोच दिल्यानंतर सुमारे महिनाभराने आयोगाकडे अपील करून माहिती न मिळाल्याची तक्रार करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. माहितीच्या अधिकाराचा हा योग्य वापर नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिनकर रामचंद्र पाटील
धनदौलत, शाहूनगर, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सांगली

<table>
<tr><td>१</td><td>अपील क्रमांक</td><td>२२४६ / २०१० / सांगली</td></tr>
<tr><td>२</td><td>सुनावणीची तारीख</td><td>दि.२.११.२०११</td></tr>
<tr><td colspan="3">३. उपस्थित<br><br>जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली<br>श्री.आण्णासाहेब गणपती मगदूम</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="2">माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.</td></tr>
</table>

## <u>विवेचन</u>

मुंबई उच्च न्यायालयात सन १९९६ मध्ये दाखल झालेल्या व सन २००३ मध्ये निकाल झ ालेल्या प्रकरणातील आदेशाची अंमलबजावणी का केली नाही, अशा स्वरूपाची विचारणा अपीलकर्ता श्री.दिनकर रामचंद्र पाटील यानी केली होती. त्यांच्या मुख्याध्यापक या पदाच्या अनुषंगाने ही विचारणा असल्याचे स्पष्ट होते. मात्र ते कोणत्या शाळेत कार्यरत होते. हा व अन्य तपशील अर्जात नसल्यामुळे हा

तपशील पुरविण्याबाबत त्याना विहित मुदतीत कळविले. त्यानंतर त्यानी संपर्क साधला नाही. तसेच प्रथम अपील केलेले नाही. त्यामुळे माहिती देता आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली श्री.आण्णासाहेब गणपती मगदूम यानी पूरक कागदपत्रांसह केले. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली श्री.पी.जी.साठे यांचे लेखी निवेदन त्यानी सादर केले.

उपरोक्त निवेदन व कागदपत्रे लक्षात घेता अपीलकर्त्यांनी संबंधित तपशील पुरवून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. मात्र खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरूपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळासाहेब बाबूराव खोत
३१, जनक्रांती चौक, सांगलीवाडी(सांगली), ता.मिरज, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड
शहर महानगरपालिका, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता, मागासवर्गीय दलित वस्ती सुधार
समिती, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९१९ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड
शहर महानगरपालिका, सांगली प्रतिनिधी दिलीप भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता, मागासवर्गीय दलित वस्ती सुधार समिती, सांगली,
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.एच.एन.दिक्षीत

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिका क्षेत्रामध्ये दलित वस्तीत केलेल्या पूर्ण, अपूर्ण, मंजूर व सध्या सुरू असलेल्या कामांची माहिती अपीलकर्ता श्री.बाळासाहेब बाबूराव खोत यानी मागितली होती. विहित मुदतीत त्याना शुल्क कळवून माहिती देण्यात आली. एका मुद्दयाबाबत (मूळ अर्जातील मुद्दा क्र.४) समाधानकारक माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून त्यानी प्रथम अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार त्या मुद्दयाबाबतचे स्पष्टीकरणही कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा  नगर अभियंता, मागासवर्गीय दलित वस्ती सुधार समिती, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.एच.एन.दिक्षीत यानी केले.

उपरोक्त निवेदन व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहितीबद्दल केलेली कार्यवाही योग्य आहे. मात्र विशिष्ट नमुन्यात संकलित करून माहिती, निकष, कारणे, खुलासा अशा स्वरूपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ‘माहिती’च्या व्याख्येत येत नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.धनंजय शंकर मोहिते
मु.पो.पलूस (मेन रोड), ता.पलूस, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पलूस,
ता.पलूस, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, पलूस,
ता.पलूस, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८३० / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.धनंजय शंकर मोहिते
मु.पो.पलूस (मेन रोड), ता.पलूस, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पलूस, ता.पलूस, जि.सांगली
प्रतिनिधी श्री.रविंद्र शशिकांत मठकरी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, पलूस, ता.पलूस, जि.सांगली
विद्यमान श्री.हरिभाऊ चंद्रभान जाधव, तत्कालीन-श्री.पांडुरंग राजाराम सूर्यवंशी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : अतिक्रमण करून वहिवाटीचा रस्ता अडविला गेला असल्याबद्दल तक्रार करूनही दखल घेतली जात नाही. रस्ता वहिवाटीसाठी आम्हाला मिळणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यानी या प्रकरणातील तक्रारीबाबत दिलेल्या आदेशानुसार कोणती कार्यवाही केली, याची माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यानी कोणती कागदपत्रे हवी आहेत याचा तपशील अर्जात दिलेला नाही. तरीही अनुषंगिक सर्व कागदपत्रांच्या प्रती त्याना दिल्या. अतिक्रमण हटविण्याची व रस्ता उपलब्ध करून देण्याची त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून त्याबाबतची वस्तुस्थितीही त्याना स्पष्ट करण्यात आली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यानी मूळ अर्जात माहितीचा नेमका तपशील दिलेला नाही. त्याना हवे असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून कागदपत्रांच्या प्रती ते प्राप्त करून घेऊ शकतात. रस्ता उपलब्ध करून देण्याच्या संदर्भातील त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.ईशामुद्दिन हमिद शेख
स.नं.156, प्रतिक नगर जवळ,
येरवडा, पुणे-411 006 **अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,
पवनचक्की, औरंगाबाद

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,
पवनचक्की, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2454/2010/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.3.11.2011 |
| 3 | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दि मुस्लिम जमात हुसेन शहा बाबा ट्रस्टच्या नोंदणी संदर्भातील कागदपत्रे | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.ईशामुद्दिन हमिद शेख यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.16.3.2011, दि.27.6.2011 व दि.3.11.2011 रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'मी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पवनचक्की, औरंगाबाद व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,

पवनचक्की, औरंगाबाद यांच्याकडून मागणी केलेली माहिती उच्च न्यायालयाकडून मिळाली असल्याने माझे अपील रद्द करण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता ईशामुद्दिन हमिद शेख यानी आयोगास सादर केले.

तीनपैकी एकाही तारखेला उपस्थित न राहिल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पवनचक्की, औरंगाबाद व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पवनचक्की, औरंगाबाद यांना कडक ताकिद देण्यात येत आहे. यापुढे अशा विनाअनुमती गैरहजेरीबद्दल शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- 16.11.2011**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रंगराव सदाशिव पाटील
मु.पो.पाचगांव, पाऊंडकर गल्ली, महादेव तालमीच्या मागे,
ता.करवीर, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(I), कोल्हापूर महानगरपालिका,
जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२७७ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रंगराव सदाशिव पाटील
मु.पो.पाचगांव, पाऊंडकर गल्ली, महादेव तालमीच्या मागे,
ता.करवीर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(I), कोल्हापूर महानगरपालिका
जि.कोल्हापूर श्री.ओमप्रकाश दिवटे

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर
श्री.एस.एस.भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : तीन प्रश्नांची माहिती मागितली होती. ३८० रोजंदारी कामगारांची माहिती मिळाली नाही. काम केलेले असूनही महानगरपालिकेच्या प्रतीक्षा यादीत माझ्या नावाचा समावेश केलेला नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्ता यांच्या मागणीनुसार पदनिहाय प्रतीक्षा यादीची प्रत १४० रूपये शुल्क भरून घेऊन पुरविलेली आहे. या यादीत अपीलकर्ता यांचा समावेश नाही. परंतु त्याबाबतची त्यांची तक्रार हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. संबंधित विषयातील अभिलेखांचे अवलोकन करून अपीलकर्त्यास आणखी कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास देता येतील, असे त्याना कळविलेले आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. प्रतीक्षा यादीत समावेश नसल्याबाबतची अपीलकर्त्याची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मारुती भाऊसाहेब जाधव
मु.पो.तळाशी, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, मध्यवर्ती प्रशासकीय
इमारत, बावडा रोड, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, राधानगरी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२८०/२०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, मध्यवर्ती प्रशासकीय
इमारत, बावडा रोड, जि.कोल्हापूर श्री.चिंतामण भुरकुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१,
राधानगरी, जि.कोल्हापूर प्रतिनिधी सौ.विद्या र.कंकाळ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

शासकीय जमिनीची खरेदी-विक्री व हस्तांतरण या संदर्भात अपीलकर्ता श्री.मारुती भाऊसाहेब जाधव यानी माहिती मागितली होती. वस्तुतः त्यानी केलेली विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, राधानगरी, जि.कोल्हापूर यानी विहित मुदतीत उत्तर दिले होते. परंतु अपीलकर्त्यांना स्वतःच्या संदर्भातील एका विशिष्ट प्रकरणाबाबत कार्यवाहीची अपेक्षा होती. त्यांचा अर्ज हा त्या प्रकरणातील तक्रार अर्ज समजून उत्तर देण्याचे आदेश जन माहिती अधिकाऱ्याना दिले व त्यांच्या संदर्भित दस्ताबाबतचा अहवालही सादर केला, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बावडा रोड, जि.कोल्हापूर श्री.चिंतामण भुरकुंडे यानी पूरक कागदपत्रांसह केले.

जन माहिती अधिकाऱ्यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांच्या अर्जातील माहितीच्या मागणीपलीकडे जाऊन मूळ प्रश्नाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बावडा रोड, जि.कोल्हापूर श्री.चिंतामण भुरकुंडे यांची कृती उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दयानंद महादेव जाधव
मु.पो.शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ,
तहसील जयसिंगपूर, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**(१) जन माहिती अधिकारी** तथा सचिव/चेअरमन, श्री छत्रपती शाहू को.ऑप.
इंडस्ट्रियल इस्टेट लि., आगर भाग, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर
**(२)जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, अधिन सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, शिरोळ, तहसील जयसिंगपूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२७१ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २.११.२०११ |

**३. उपस्थित**

**(१) जन माहिती अधिकारी** तथा सचिव/चेअरमन, श्री छत्रपती शाहू को.ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट लि., आगर भाग, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.सुरेश शामराव मोरे

**(२)जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, अधिन सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, शिरोळ, तहसील जयसिंगपूर, जि.कोल्हापूर श्री.बाळकृष्ण जगन्नाथ शिंदे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

श्री छत्रपती शाहू को.ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट लि., आगर भाग, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर या संस्थेला शासनाचे कोणतेही अनुदान, सवलत नाही. जमीनही संस्थेने स्वतः विकत घेतलेली आहे. तरीही अपीलकर्त्यास माहिती दिली असून कोणतीही तक्रार अगर हरकत नसल्याचे लेखी निवेदन त्यानी दिलेले आहे, असे प्रतिपादन संस्थेचे मॅनेजर श्री.सुरेशराव शामराव मोरे यानी केले.

उपरोक्त संस्थेला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरूपात कोणतेही शासकीय अर्थसहाय्य नसल्याचे लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(एच)मधील तरतुदीनुसार उपरोक्त संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण'ठरत नाही, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ तिला लागू होत नाही. तरीही माहिती देण्याची संस्थेची कृती उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश ऊर्फ रामचंद्र राजाराम चव्हाण
दऱ्याचे वडगाव, ता.करवीर, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सि.स.नं.६४८,
सी वॉर्ड, भुसारीवाडा, बिंदू चौक, रविवार पेठ, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री विठ्ठल सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित,
दऱ्याचे वडगांव, ता.करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६१३ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.१०.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश ऊर्फ रामचंद्र राजाराम चव्हाण
दऱ्याचे वडगाव, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री विठ्ठल सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित,
दऱ्याचे वडगांव, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.नानासाहेब चंदर बेनके

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : श्री विठ्ठल सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, दऱ्याचे वडगांव, ता.करवीर, जि.कोल्हापूर या संस्थेला शासनाकडून ३६,७५००० रूपये कर्जमाफीसाठी अनुदान मिळालेले आहे. त्यामुळे संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो. परंतु संस्थेने अधिनियम लागू होत नसल्याचे कारण देऊन माहिती दिली नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> : संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही असे कळविले, म्हणून अपीलकर्ता श्री.रमेश ऊर्फ रामचंद्र राजाराम चव्हाण यानी अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अपील केले. अपीलकर्त्यांना अभिलेख दाखवून हवी असलेली माहिती द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यानी दिला. परंतु त्यानुसार श्री.चव्हाण अभिलेख अवलोकनासाठी आले नाहीत. तसेच शासनाचे अनुदान मिळालेले नाही. सर्व रक्कम कर्जमाफीपोटी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली आहे.

संस्थेला रूपये ३६,७५००० अनुदान शासनाने दिल्याचे दर्शविणाऱ्या शासन निर्णयाची प्रत अपीलकर्ता यानी दि.१५.१०.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केली. तथापि ही रक्कम संस्थेला मिळाल्याचे त्यावरून स्पष्ट होत नाही. संबंधित अनुदान शेतकऱ्याना कर्जमाफीच्या रूपाने मिळालेले आहे की संस्थेला मदत म्हणून मिळालेले आहे, हे अपिलीय प्राधिकारी यानी स्पष्ट करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(२)** श्री विठ्ठल सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, दऱ्याचे वडगांव, ता.करवीर, जि.कोल्हापूर या संस्थेला रूपये ३६,७५००० हे अनुदान मदत आहे की शेतकऱ्याना कर्जमाफीच्या रूपात मिळालेली रक्कम आहे याबाबतचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सि.स.नं.६४८, सी वॉर्ड, भुसारीवाडा, बिंदू चौक, रविवार पेठ, कोल्हापूर यानी दि.३०.११.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. ही रक्कम संस्थेला मदत स्वरूपाची मिळाल्याचे स्पष्ट झाल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ संस्थेला लागू राहील. त्या स्थितीत संस्थेकडून अपीलकर्त्यांना हवी असलेली माहिती निःशुल्क दिली जाण्याची कार्यवाही करून अपिलीय प्राधिकारी यानी अनुपालन अहवाल आयोगाला दि.५.१२.२०११ पर्यंत सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश दगडूअप्पा रेणके
३५४, किराणा रोड, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२५६ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश दगडूअप्पा रेणके
३५४, किराणा रोड, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर
श्री.एम.जी.आंबेडकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सिध्देश्वर प्रशाला, सोलापूर या प्रशालेत मी सहाय्यक शिक्षक या पदावर कार्यरत असून मे २००७ मध्ये माझ्या सेवाविषयक अपिलावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने मागितलेली माहिती वारंवार अर्ज, पत्रव्यवहार करू नही दिली जात नाही. जन माहिती अधिकाऱ्यानी माहिती देण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. तसेच अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाची दखल घेतली नाही. त्यामुळे या दोघांवरही दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुरेश दगडूअप्पा रेणके यानी केली.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यानी मागितलेली माहिती शाळेकडील असल्यामुळे जन माहिती अधिकारी यानी अर्ज शाळेकडे वर्ग केला व माहिती देण्याबाबत कळविले. परंतु शाळेने माहिती दिली नसल्याची अपीलकर्त्याची तक्रार आहे. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी यानी प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नाही.

अपिलीय प्राधिकारी यानी प्रथम अपिलाची दखल घेणे व लेखी स्वरूपात निर्णय देणे आवश्यक आहे. तसेच त्यानी दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही झाली की नाही हे पाहण्याचीही त्यांची जबाबदारी आहे. माहिती देण्याची जबाबदारी आयोगाने अपिलीय प्राधिकाऱ्यावर सोपविल्यास ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४(५) अन्वये जन माहिती अधिकारी ठरतात. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांवर होणाऱ्या कारवाईस ते पात्र ठरू शकतात, याची जाणीव अपिलीय प्राधिकारी श्री.एम.जी.आंबेडकर याना आयोगाने अनेक अपिलांमध्ये लेखी व मौखिक स्वरूपात दिली असूनही त्यानुसार अनुपालन होत असल्याचे दिसून येत नाही. ही बाब गंभीर आहे. प्रस्तुत अपिलातही मुख्याध्यापक, सिध्देश्वर प्रशाला, सोलापूर यानी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राप्त करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सादर करण्याचे मौखिक आदेश आयागाने दिले होते. त्यानुसार अद्याप पूर्तता झालेली नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>**आदेश**</u>

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) सिध्देश्वर प्रशाला, सोलापूर या प्रशालेचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, यानी अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.३०.११.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. माहिती दिली नसल्यास अथवा विलंब झाला असल्यास शास्तीविषयक म्हणणेही अहवालात मांडावे.

(३) उपरोक्त मुद्दा क्र.२ नुसार कार्यवाही करून घेण्याची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.जी.आंबेडकर यांची राहील. त्याबाबतचा अनुपालन अहवाल अपिलीय प्राधिकारी श्री.एम.जी.आंबेडकर यानी दि.५.१२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.राजगोंडा बाबासाहेब पाटील
'शेटे भवन', 1350/ब, **अपीलकर्ता**
'सी' वॉर्ड, लक्ष्मीपुरी,
कोल्हापूर

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुनर्वसन शाखा,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा,
कोल्हापूर **उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार(पुनर्वसन),
जिल्हाधिकारी कार्यालय, पुनर्वसन शाखा,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2471/2010/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.2.11.2011 |
| 3 | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** गट क्र.436 व 414 या जमिनीच्या 7/12 उता-याबाबत | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.राजगोंडा बाबासाहेब पाटील यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.2.11.2011 रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'मी मागणी केलेली माहिती मला

मिळाली असल्याने माझी कोणतीही तक्रार नाही. माझे द्वितीय अपील काढून टाकण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.राजगोंडा बाबासाहेब पाटील यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे

**पुणे.**
**दि :-22/11/2011**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं. ३६/२, विद्यानगर, लेन नं. ६,
वर्ल्ड वॉटर टँक, पुणे ४११ ०१५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी,
मु. पो. वडगांवशेरी, ता. हवेली, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी,
मु. पो. वडगांवशेरी, ता. हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८२६/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं. ३६/२, विद्यानगर, लेन नं. ६,
वर्ल्ड वॉटर टँक, पुणे ४११ ०१५

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी,
मु. पो. वडगांवशेरी, ता. हवेली, जि. पुणे श्री. आय. यु. पटेल

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी,
मु. पो. वडगांवशेरी, ता. हवेली, जि. पुणे एस.बी.भोरडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'मागितलेली माहिती मिळाली असून, शास्तीची मागणी नाही. अपील निकाली काढण्यात यावे', असे अपीलकर्ता श्री. अनंत देऊ गावडे यानी सदर कार्यक्रमातील प्रपत्रात नमूद केले असून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सहमतीदर्शक स्वाक्षरी केली आहे.

फेरफार प्रकरणातील सुरुवातीपासून आज अखेरपर्यंत अशा स्वरुपात अपीलकर्त्यांनी माहिती मागणे योग्य नाही. विशिष्ट कालावधी नमूद करुन तपशील देणे आवश्यक असल्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

वरील संयुक्त निवेदन लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २२.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.उमाकांत नंदकुमार भोसले
देशप्रेमी मित्रमंडळ शेजारी, यादवनगर, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (II), कोल्हापूर
महानगरपालिका, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर
महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२७२ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उमाकांत नंदकुमार भोसले
देशप्रेमी मित्रमंडळ शेजारी, यादवनगर, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (II), कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
श्री.ओमप्रकाश दिवटे

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
श्री.एस.एस.भोसले

| | |
|---|---|
| | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

कोल्हापूर महानगरपालिकेचे तत्कालीन उपायुक्त श्री.गणेश देशमुख यांच्या कार्यकालासंबंधीची माहिती अपीलकर्ता श्री.उमाकांत नंदकुमार भोसले यानी दि.७.८.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. श्री.देशमुख यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबतची कागदपत्रे महानगरपालिकेकडे उपलब्ध नसल्यामुळे त्वरित माहिती दिली नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या दिवशी दि.३.११.२०१० रोजी त्याव्यतिरिक्तची माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.एस.एस.भोसले यानी केले.

अपीलकर्ता श्री.उमाकांत नंदकुमार भोसले यांचा अर्ज दि.७.८.२०१० चा असून जन माहिती अधिकारी श्री.एस.एस.भोसले यानी दि.३.११.२०१० रोजी म्हणजे अधिनियमातील तीस दिवसांच्या विहित मुदतीपेक्षा ५७ दिवस विलंबाने माहिती दिली आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार शास्तीबाबतचा लेखी खुलासा त्यानी सादर केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.एस.एस.भोसले यानी दि.५.११.२०११ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. मागणी केल्यानुसार माहिती मिळाल्याची अपीलकर्त्याची पोहोच असलेल्या पत्राची प्रत त्यासोबत त्यानी सादर केली. माहिती देण्याचे अनवधानाने राहून गेले. माहिती लपविण्याचा उद्देश नव्हता, असे त्यानी खुलाशात म्हटले आहे. हा खुलासा समर्थनीय नाही. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यास माहिती देण्यास झालेल्या ५७ दिवसांच्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.एस.एस.भोसले याना (५७x२५०=१४२५०) रूपये १४२५० शास्ती करण्यात येत आहे. ही शास्तीची रक्कम श्री.एस.एस.भोसले यांना नोव्हेंबर २०११, डिसेंबर २०११ व जानेवारी २०१२ या महिन्यात मिळणाऱ्या ऑक्टोबर २०११, नोव्हेंबर २०११ व डिसेंबर २०११ या महिन्याच्या पगारातून अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त(II), कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यानी वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रकाश विनायक पवार
२५१/क, शनिवार पेठ,पुणे-३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त, भूमी आणि जिंदगी कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, भूमी आणि जिंदगी कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९६ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रकाश विनायक पवार
२५१/क, शनिवार पेठ,पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त, भूमी आणि जिंदगी कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.आर.टी.शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, भूमी आणि जिंदगी कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.शिवाजी लंके

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

माहिती मिळाली नसल्याची व अपिलीय प्राधिकाऱ्यानी लिखित आदेश निर्गमित केला नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.प्रकाश विनायक पवार यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नोंदविली आहे, तर वेळोवेळी लेखी व तोंडी स्वरूपात माहिती पुरविण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी नमूद केले आहे.

प्रपत्रातील नोंदी व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, भूमी आणि जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यानी विहित मुदतीत मुद्देनिहाय योग्य उत्तर दिले आहे. अपिलीय प्राधिकारी यानी अपिलावरील लेखी आदेश देणे आवश्यक असल्याची समज तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, भूमी आणि जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.सुधाकर तेलंग याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नंदकुमार बाबुराव काळे
श्री. माणिकराव त्रिंबकराव गोते
४१/४२ कमर्शियल बिल्डिंग नं. १,
मार्केटयार्ड गुलटेकडी, पुणे - ३७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे - १

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम वैद्यकीय उपविभाग, पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७३/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. नंदकुमार बाबुराव काळे
श्री. माणिकराव त्रिंबकराव गोते
४१/४२ कमर्शियल बिल्डिंग नं. १, मार्केटयार्ड गुलटेकडी, पुणे - ३७

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. एच.आर.चौगुले

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम वैद्यकीय उपविभाग, पुणे श्री. एम.एन.कुलकर्णी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

शासकीय इमारतींच्या दुरुस्तीच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता यानी दि.३०/४/२००९ च्या अर्जाद्वारे मागितली होती. दि. ४/५/२००९ च्या पत्रान्वये ती देण्यात आली. अधिक माहितीसाठी अभिलेख अवलोकन करुन हवी असलेली माहिती अपीलकर्त्यांनी प्राप्त करुन घ्यावी, असे आदेश प्रथम अपिलावर देण्यात आले. परंतु त्यानंतर अपीलकर्त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांशी आजतागायत संपर्क साधला नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. तसेच दि. २३/११/२०११ रोजी अपीलकर्ता याना कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात येतील व हवी असलेली माहिती देण्यात येईल. त्यामुळे अपील अर्ज निकाली काढण्यात यावा, असे संयुक्त निवेदन अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात केले आहे.

अपीलकर्त्यांनी माहितीची मागणी सरसकट स्वरुपात केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(९) अन्वये ती नाकारता येऊ शकते. तसे न करता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अशा प्रकारे माहिती उपलब्ध करुन देताना सार्वजनिक निधीवर ताण पडता कामा नये. म्हणून नियमानुसार योग्य ते शुल्क जन माहिती अधिकारी यानी आकारणे आवश्यक आहे.अभिलेख अवलोकनास कळवूनही न जाणे व माहिती न मिळाल्याची तक्रार करणे ही अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नंदकुमार बाबुराव काळे
श्री. माणिकराव त्रिंबकराव गोते
४१/४२ कमर्शियल बिल्डिंग नं. १,
मार्केटयार्ड गुलटेकडी, पुणे - ३७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत,
पुणे - ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. ५, पुणे
यांचे कार्यालय, हॉटेल सागर प्लाझा समोर,
३ रा मजला, कॅम्प, पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७२/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. नंदकुमार बाबुराव काळे
श्री. माणिकराव त्रिंबकराव गोते
४१/४२ कमर्शियल बिल्डिंग नं. १, मार्केटयार्ड गुलटेकडी, पुणे - ३७

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. एच.आर.चौगुले<br><br>**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. ५ यांचे कार्यालय,<br>हॉटेल सागर प्लाझा समोर, ३ रा मजला, कॅम्प, पुणे श्री. डी. के. इंगळे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्त्यानी मागितलेली शासकीय इमारतींच्या दुरुस्ती संदर्भातील माहिती समक्ष उपस्थित राहून अभिलेख अवलोकन करुन प्राप्त करुन घ्यावी, असे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले. माहितीची मागणी मोघम स्वरुपाची असून नेमकेपणाने माहितीची मागणी करावी व अभिलेख अवलोकन करुन माहिती निःशुल्क प्राप्त करुन घ्यावी, असा निर्णय प्रथम अपिलावर दिला होता. परंतु त्यानंतर अपीलकर्त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांशी आजतागायत संपर्क साधला नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. तसेच दि. २४/११/२०११ रोजी अपीलकर्ता यांनी उपस्थित रहावे. माहिती समक्ष देण्यात येईल, असे चर्चेत ठरले. त्यानुसार अपील अर्ज निकाली काढण्यात यावा, असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संयुक्तपणे सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

अपीलकर्त्यांनी सरसकट स्वरुपात माहितीची मागणी केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (९) अन्वये ती नाकारता येऊ शकते. परंतु जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती नाकारलेली नाही. त्यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अशा प्रकारे माहिती देताना शासनाच्या म्हणजेच जनतेच्या निधीवर भार पडता कामा नये, म्हणून जन माहिती अधिकारी

यानी योग्य ते शुल्क आकारणे आवश्यक आहे. अभिलेख अवलोकनास कळवूनही न जाणे व माहिती न मिळाल्याची तक्रार करणे ही अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मनमोहनसिंग आनंद
पॅरॉगॉन मोटर्स, बीजी१(बी), कोनार्क इस्टेटस,
पूना क्लबसमोर, ९ कॅनॉट रोड, पुणे-१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**(१)अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, पुणे (अ.क्र.२०/पुणे, २९/पुणे, ४४८/पुणे, २२९१/पुणे, १३०३/पुणे)

**(२)अपिलीय प्राधिकारी** तथा सहसचिव, गृह विभाग, ई.एक्स.सी-३,
मंत्रालय, मुंबई-३२ (अ.क्र.२४९३/२०११/पुणे)

**(३)अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त उत्पादन शुल्क विभाग,
ओल्ड कस्टम हाऊस, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई (अ.क्र.२४९४/२०११/पुणे) उत्तरवादी

**(१)जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे (अ.क्र.२०/पुणे, २९/पुणे, ४४८/पुणे, २२९१/पुणे, १३०३/पुणे)

**(२)जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव, गृह विभाग, ई.एक्स.सी-३,

मंत्रालय, मुंबई-३२ (अ.क्र.२४९३/२०११/पुणे)

**(३)जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त उत्पादन शुल्क विभाग, ओल्ड कस्टम हाऊस,
दुसरा मजला, फोर्ट, मुंबई (अ.क्र.२४९४/२०११/पुणे)

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०/पुणे + २९/पुणे + ४४८/पुणे +२२९१/पुणे + १३०३/पुणे + २४९३/२०११/पुणे + २४९४/२०११/पुणे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

पुणे व सातारा रोडवरील काही ताडी दुकानांच्या अबकारी अनुज्ञप्त्या व काही दुकानांबाबत अबकारी विभागाने केलेली कारवाई या संदर्भातील विविध तपशिलांची माहिती अपीलकर्ता श्री.मनमोहनसिंग आनंद यानी सात अर्जांद्वारे मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा (१) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे, (२)अवर सचिव, गृह विभाग, ई.एक्स.सी-३, मंत्रालय, मुंबई, (३)उपआयुक्त उत्पादन शुल्क विभाग, ओल्ड कस्टम हाऊस, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई व अपिलीय प्राधिकारी तथा (१) जिल्हाधिकारी, पुणे, (२) सहसचिव, गृह विभाग, ई.एक्स.सी-३, मंत्रालय, मुंबई (३) आयुक्त उत्पादन शुल्क विभाग, ओल्ड कस्टम हाऊस, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई यानी केलेल्या कार्यवाहीने समाधान न झ ाल्यामुळे श्री.आनंद यानी राज्य माहिती आयोगाकडे सात अपिले केली आहेत. यातील अपील क्र.२९/पुणे व ४४८/पुणे यामधील मूळ अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा २००२ अन्वये केलेले होते.

या अपिलांमधील मूळ अर्जामधील मागणी पुढीलप्रमाणे आहे :

| अपील क्रमांक | मूळ माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २० / पुणे | खडकमाळ आळी, जेधे चौक, लक्ष्मीनारायण थिएटर इ. परिसरात असलेल्या किरकोळ मद्यविक्री दुकाने, मद्यविक्री करणारे उपहारगृह(परवाना कक्ष) व ताडी विक्री दुकानांची माहिती. तसेच त्यांच्या अनुज्ञप्तीची दि.१.५.२००० ते ३१.८.२००४ दरम्यानची स्थिती/पत्ता |
| २९ / पुणे | सन २००५/२००६ सालासाठी सर्व बोलीदारांची ऐपतवारी ठरविण्यासाठी ठेवण्यात येणाऱ्या नोंदवहीच्या प्रती व दुकानाच्या निविदाबाबतची माहिती |
| ४४८ / पुणे | मे.क्रांती ट्रेडर्स, मे.क्रांती वाईन्स प्रा.लि., गिरीश ट्रेडर्स, गायत्री एंटरप्राइजेस, प्रिमिअर लिकर डिस्ट्रीब्यूटर्स, प्रा.एन.एम.इराणी व के.एस.एन.इराणी अँड कंपनी यांच्या अनुज्ञप्ती रजिस्टरची प्रत व इतर माहिती |
| २२९१ / पुणे<br>१३०३ /पुणे | सन २००४ पासून ताडी नमुन्यात आढळून आलेल्या क्लोरल हायट्रेड प्रकरणाच्या नोंदवह्या |
| २४९३/ २०११ / पुणे | मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने अधीक्षक, उत्पादन शुल्क व जिल्हाधिकारी, पुणे यांनी बाजू मांडलेल्या प्रकरणांची माहिती |
| २४९४/२०११/पुणे | मा.उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ व औरंगाबाद खंडपीठ येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयुक्त, उत्पादन शुल्क विभाग, मुंबई शासनाच्या वतीने बाजू मांडलेल्या प्रकरणांची माहिती |

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे श्री.यतीन पी.सावंत हे नागपूरला बदलून गेले असले, तरी विषय त्यांच्या कार्यवाहीशी संबंधित असल्यामुळे ते सुनावणीला व्यक्तिशः हजर असले पाहिजेत, असा आग्रह अपीलकर्ता यानी धरला. त्यानुसार आयोगापुढील सुनावणीच्या सूचनेनुसार श्री.सावंत दि.२९.१०.२००७ रोजी हजर राहिले. 'अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती वेळावेळी देण्यात आली असून काही संचिका शोध घेऊनही उपलब्ध झाल्या नाहीत. सर्व अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध असल्याचेही कळविले. परंतु अपीलकर्ता भागीदार असलेल्या 'एम.डी.वाईन्स' या दुकानाच्या अनुज्ञप्तीच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईमुळे केवळ व्यक्तिगत आकसापोटी ते व्यक्तिगत उपस्थितीची मागणी व लेखी निवेदनात आपल्यावर अनेक आरोप करीत आहेत,'असे प्रतिपादन श्री.सावंत यानी केले, तर 'श्री.सावंत यानी आपल्या अनुज्ञप्तीच्या प्रकरणी आकसाने केलेली कारवाई व दंड बेकायदेशीर असल्यामुळे व त्यानी केलेला पक्षपात सिध्द होऊ नये, म्हणून ते माहिती देत नाहीत. ते व अन्य अधिकारीही संगनमताने असे करीत आहेत,'अशी तक्रार श्री.आनंद यानी केली.

अपीलकर्त्याची अपिले एकाच विषयासंदर्भात असल्यामुळे सर्व अपिलांबाबत उभय बाजूंनी लेखी निवेदन सादर करावे, असे निदेश आयोगाने दिले. त्यानुसार उभय बाजूंनी सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये वरील बाबींचीच पुनरावृत्ती असल्याचे दिसून येते. अधिकाऱ्यानी केलेली कारवाई बेकायदेशीर आहे, म्हणून दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी ठरते, असा श्री.आनंद यांचा युक्तिवाद आहे. तसेच नस्त्यांमधील कागद हेतुतः फाडण्यात आले आहेत, अशासारखे आरोप त्यानी केले आहेत. मात्र त्यांचे आरोप खोटे असून कोणतीही माहिती नाकारलेली नाही. त्यांच्या प्रत्येक अर्जानुसार माहिती देण्यात आली. तसेच अभिलेख अवलोकनासाठीही त्याना बोलाविण्यात आले आणि सर्व अभिलेख उपलब्ध करून देण्यात आले. अवलोकनानंतर त्यानी मागितलेली माहिती पुरविण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे श्री.यतीन पी.सावंत व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.चिंतामणी जोशी यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी एकाच विषयाच्या अनुषंगाने विस्तृत स्वरूपाची माहिती सातत्याने मागितली असल्याचे दिसून येते. जन माहिती

अधिकारी यानी वेळावेळी त्याना उत्तर व माहिती दिली असून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपीलकर्त्याच्या मुद्दयांचा परामर्श अपिलांच्या निर्णयात घेतला असल्याचे दिसून येते. ते लक्षात घेता माहिती न मिळाल्याची अपीलकर्त्यांची तक्रार रास्त ठरत नाही. अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीचा कायदेशीरपणा - बेकायदेशीरपणा, पक्षपात या स्वरूपाचे अपीलकर्त्यांचे आरोप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील निर्णयाचा विषय नाही.

सर्वसाधारणतः अपीलकर्त्याच्या माहितीच्या मागणीत व्यक्तिगत संदर्भ अधिक असून सार्वजनिक हिताशी निगडित विषय दिसून येत नाही. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र.६४५४/२०११, दि.९.८.२०११ रोजी दिलेल्या निकालातील अभिप्राय या संदर्भात मार्गदर्शक आहेत.

'Indiscriminate and impractical demands or directions under RTI Act for disclosure of all and sundry information (unrelated to transparency and accountability in the functioning of public authorities and eradication of corruption) would be counter-productive as it will adversely affect the efficiency of the administration and result in the executive getting bogged down with the non-productive work of collecting and furnishing information.

The nation does not want a scenario where 75% of the staff of public authorities spends 75 % of their time in collecting and furnishing information of applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and the pressure of the authorities under the RTI Act should not lead to employees of the public authorities prioritizing 'information furnishing', at the cost of their normal and regular duties,' असे सर्वोच्च न्यायालयाने या निकालात म्हटले आहे.

वरील मार्गदर्शक अभिप्राय प्रस्तुत अपिलांमध्येही लागू ठरतात.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं. ३६/२, विद्यानगर, लेन नं. ६,
वर्ल्ड वॉटर टँक, पुणे ४११ ०१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी,
मु. पो. वडगावशेरी, ता. हवेली, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी,
मु. पो. वडगावशेरी, ता. हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८२७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं. ३६/२, विद्यानगर, लेन नं. ६,
वर्ल्ड वॉटर टँक, पुणे ४११ ०१५

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी,
मु. पो. वडगावशेरी, ता. हवेली, जि. पुणे श्री. आय. यु. पटेल

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी,
मु. पो. वडगावशेरी, ता. हवेली, जि. पुणे श्री. एस. बी. भोरडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'माहिती प्राप्त झाली. शास्तीची मागणी नाही. अपील निकाली काढण्यात यावे', असे अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. प्रपत्रात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी आहे.

वरील संयुक्त निवेदन लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पुरुषोत्तम महादेव भांगरे
घर नं. २९६, भांगरवाडी, लोणावळा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
लोणावळा नगर परिषद, लोणावळा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
लोणावळा नगर परिषद, लोणावळा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. पुरुषोत्तम महादेव भांगरे
घर नं. २९६, भांगरवाडी, लोणावळा

**विद्यमान जन माहिती अधिकारी**
नगर रचना विभाग, लोणावळा श्री. रा.मा.पाटील

**तत्कालीन जन माहिती अधिकारी**
नगर रचना विभाग, लोणावळा श्री. म. घ. ताराणी

**विद्यमान जन माहिती अधिकारी**
आरोग्य विभाग, लोणावळा श्री. दि. न. वाघमारे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्त्यानी मूळ अर्जानुसार मागितलेली माहिती नगररचना विभाग व आरोग्य विभाग यांच्याकडील होती. ती देण्यात आली असून प्रथम अपिलाच्या वेळी मागितलेली माहितीही दिली, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसह सदर कार्यक्रमाच्या परिपत्रकात नमूद केले आहे. 'माहिती उपलब्ध झाली आहे. तक्रार नाही', असे अपीलकर्त्यानी प्रपत्रात नमूद केले आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पुरुषोत्तम महादेव भांगरे
घर नं. २९६, भांगरवाडी, लोणावळा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकार (शेती)
पंचायत समिती चांदिवली, ता. मुळशी, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत चांदिवली, ता. मुळशी, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. पुरुषोत्तम महादेव भांगरे
घर नं. २९६, भांगरवाडी, लोणावळा

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकार (शेती)
पंचायत समिती चांदिवली, ता. मुळशी, जि. पुणे श्रीमती डी.एस.चांदगुडे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत चांदिवली, ता. मुळशी, जि. पुणे श्री. एस.डी.चांदगुडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

सन १९९८ चे मृत्यू रजिस्टर गहाळ झाल्याच्या अनुषंगाने मागितलेली माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या परिपत्रकात नमूद केले आहे.

'सदरची माहिती मिळाली, तक्रार नाही', असे अपीलकर्ता यानी सदर परिपत्रकात नमूद केले आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं. ३६/२, विद्यानगर, लेन नं.६,
वर्ल्ड वॉटर टँक, पुणे ४११ ०१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
हवेली तहसीलदार कार्यालय, खडकमाळ,
शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

उत्तरवादी

**जा माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
हवेली तहसीलदार कार्यालय, खडकमाळ,
शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७१९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/११/२०११ |

**३. उपस्थित**

श्री. अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं. ३६/२, विद्यानगर, लेन नं.६, वर्ल्ड वॉटर टँक, पुणे ४११ ०१५

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
हवेली तहसीलदार कार्यालय, खडकमाळ,
शुक्रवार पेठ, पुणे श्री. रणजित भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

मंडल अधिकारी, चिंचवड, तलाठी कार्यालय चिंचवड गांव, पुणे ४११ ०३३ या पत्त्यावर पाठविलेले पत्र 'सदर ऑफिस दिलेल्या पत्त्यावर सध्या नाही' असा शेरा मारुन परत आले. म्हणून सदरचे ऑफिस केव्हा बंद झाले त्याची तारीख व नवीन ऑफिसचा पत्ता मिळावा, अशी माहिती अपीलकर्ता यानी मागितली होती.

वस्तुतः अशा स्वरुपाच्या माहितीची मागणी योग्य नाही. तथापि एका आठवडयात माहिती उपलब्ध करुन देण्याचे चर्चेत ठरल्याचे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. अपीलकर्त्यांनी माहितीच्या अधिकाराचा वापर अधिक गांभीर्याने करणे आवश्यक असल्याची समज त्याना देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड. विकास जोशी
साई सदन, फ्लॅट नं. २९, ४ था मजला,
पुण्याईनगर, धनकवडी, पुणे ४११ ०४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त ( विशेष),
पुणे महानगरपालिका (भूमी आणि जिंदगी विभाग)
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता,
पुणे महानगरपालिका (भूमी आणि जिंदगी विभाग)
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७४/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड. विकास जोशी
साई सदन, फ्लॅट नं. २९, ४ था मजला,
पुण्याईनगर, धनकवडी, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. अनंत देऊ गावडे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त ( विशेष),
पुणे महानगरपालिका (भूमी आणि जिंदगी विभाग)
शिवाजीनगर, पुणे श्री. आर. टी. शिंदे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी,<br>पुणे महानगरपालिका (भूमी आणि जिंदगी विभाग)<br>शिवाजीनगर, पुणे श्री. खंडू निम्हन |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता यानी सन २००४ मधील एका परिपत्रकाचा संदर्भ देऊन संपूर्ण प्रकरण पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची व आवश्यक त्या प्रती देण्याची मागणी केली होती. त्यात विषयाचा कोणताही उल्लेख नव्हता. त्यामुळे प्रकरणाचा शोध घेऊन उपलब्ध झाल्यानंतर अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकनासाठी कळविले. संपूर्ण कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या परिपत्रकात नमूद करुन माहिती मिळाल्याची अपीलकर्त्यांची पोच सोबत सादर केली आहे. ऊर्वरित माहिती अपीलकर्त्याचे प्रतिनिधी व अशा स्वरुपाच्या अनेक अर्जांमध्ये मूळ अपीलकर्ता असलेले श्री. अनंत देऊ गावडे यानी ताब्यात घेतल्याचे परिपत्रकात नोंदविले आहे. माहिती मिळाली असून 'अपील निकाली काढण्यात यावे',असे श्री. गावडे यानी परिपत्रकात नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. किसन भागुजी वाखारे
रेव्हन्यु कॉलनी शिरुर, ता शिरुर, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
शिरुर नगरपरिषद, घोडनदी, ता शिरुर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सार्वजनिक बांधकाम विभाग,
शिरुर नगरपरिषद, घोडनदी, ता शिरुर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. किसन भागुजी वाखारे
रेव्हन्यु कॉलनी शिरुर, ता शिरुर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
शिरुर नगरपरिषद, घोडनदी, ता शिरुर, जि. पुणे श्री. व्ही. एस. थोरात

**जन माहिती अधिकारी** तथा सार्वजनिक बांधकाम विभाग,
शिरुर नगरपरिषद, घोडनदी, ता शिरुर, जि. पुणे श्री. व्ही. एन. देशमुख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - सार्वजनिक रस्त्यामध्ये काही अतिक्रमण झाले आहे. त्याची माहिती मागितली होती. परंतु माहिती दिशाभूल करणारी दिली. खरी माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी - दोन व्यक्तींच्या भूखंडाच्या अनुषंगाने सार्वजनिक रस्त्यामध्ये अतिक्रमण झ ाले असल्याची अपीलकर्त्यांची तक्रार असून त्याबाबत सक्षम अधिका-यांकडून पाहणी होऊन अहवाल मिळावा, अशी मागणी त्यानी केली होती. सन १९७०-७१ चा रस्त्याचा आराखडा असून त्यावेळी व विकास आराखडयातील रुंदीबाबतची उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास दिली. सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदीबाबतची माहिती प्रथम अपिलातील आदेशानुसार दिली.

अतिक्रमणाबाबतची पाहणी करुन अहवाल देण्याची अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये येत नाही. मात्र संबंधित रस्त्यावर अतिक्रमण झाले आहे किंवा नाही, याबाबतचा स्पष्ट उल्लेख असलेले उत्तर जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यानी दि. १२/१२/२०११ पर्यंत आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. के. पी. प्रमोद
१३६/५, कृष्णा अपार्टमेंट,
जंगली महाराज रोड, टायटन शोरुम मागे,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
सेनापटी बापट रोड, पुणे ४११ ०१६

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,
शिवाजीनगर उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. के. पी. प्रमोद
१३६/५, कृष्णा अपार्टमेंट, जंगली महाराज रोड,
टायटन शोरुम मागे, शिवाजीनगर, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. गणेश उ. निकम

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,<br>सेनापटी बापट रोड, पुणे श्री. मधुकर आत्माराम भोकरे<br><br>**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,<br>शिवाजीनगर उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,<br>शिवाजीनगर, पुणे श्री. एम. के. सुर्यवंशी<br><br>**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. ए. पी. हुवाळे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता यानी अधिकार पत्र दिलेले प्रतिनिधी श्री. गणेश उ. निकम सुनावणीस उपस्थित होते. 'पूर्ण माहिती मिळालेली असून माझे समाधान झालेले आहे. माझी काहीही तक्रार नाही',असे लेखी निवेदन त्यांनी अपीलकर्त्याच्या वतीने सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पंकज रघुनाथ शिंगोटे
५८-ब, मंगळवार पेठ, पुणे ४११ ०११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा लिपिक (अपील शाखा)
अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. पंकज रघुनाथ शिंगोटे
५८-ब, मंगळवार पेठ, पुणे ४११ ०११

**जन माहिती अधिकारी** तथा लिपिक (अपील शाखा)
अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. मिलिंद पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- ऑक्टोबर १९९५ मधील हक्क नोंदणी/वहिवाट अपील प्रकरणातील संचिका अवलोकनासाठी देण्याची व त्यानंतर आवश्यक ती कागदपत्रे मिळण्याची मागणी केली होती. परंतु माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार संबंधित संचिकेचा अभिलेखात शोध घेतला असता आढळत नाही. परंतु पुन्हा सखोल शोध घेतला असता अपीलकर्ता यानी सन १९९६ मध्ये अप्पर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडे केलेल्या अपील प्रकरणात ही संचिका पाठविली असल्याची नोंद आहे. तेथेही त्या संचिकेचा शोध घेण्यात येत आहे.

अप्पर आयुक्त, विभागीय कार्यालय, पुणे यांच्या कार्यालयात संबंधित संचिकेचा शोध घेऊन अपीलकर्त्यास हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती १५ दिवसांत पुरवाव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यानी दि. १५/१२/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. कांताराम तात्याबा काळे
मु. पो. घोडेगाव, ता. आंबेगाव, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस अधीक्षक,
पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालय, पाषाण,
पुणे ४११ ००८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय पोलिस अधीक्षक,
राजगुरुनगर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. कांताराम तात्याबा काळे
मु. पो. घोडेगाव, ता. आंबेगाव, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय पोलिस अधीक्षक,
राजगुरुनगर, जि. पुणे श्री. भारत रामराव पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - पोलिस महासंचालकांसह विविध पातळयांवर केलेल्या अर्जांवरील कार्यवाहीची माहिती मागितली होती. सही-शिक्का नसलेल्या कागदपत्रांच्या प्रती दिल्या. अपूर्ण माहिती देऊनही पोलिस अधिकाऱ्यांनी दबाव आणून माझ्याकडून तक्रार नसल्याचे लिहून घेतले आहे.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्ता व अन्य एक नागरिक यांचा जमिनीवरुन वाद असून आपल्या शेतात अतिक्रमण झाल्याची तक्रार अपीलकर्ता यानी केली होती. त्यात गुन्हा नोंदवून आरोपपत्र दाखल झाले आहे. अपीलकर्ता सातत्याने या प्रकरणी अर्ज व पत्रव्यवहार करीत असतात. त्यांच्या सर्व अर्जांना उत्तरे देण्यात आली आहेत. लोकआयुक्तांकडेही त्यांचे याबाबतचे प्रकरण दाखल आहे. जुलै २००७ पासून जुलै २०११ पर्यंत अपीलकर्त्यांनी या संदर्भात पोलिसांकडे विविध पातळयांवर एकूण ४३ अर्ज केले आहेत.

जन माहिती अधिकारी यानी श्री. काळे यांच्या अर्जांचा तारीखवर लेखी तपशील सादर केला. संबंधित सर्व प्रकरणे वैयक्तिक तक्रारीच्या स्वरुपातील असून वेळोवळी त्याना उत्तरे देण्यात आली असल्याचे कागदपत्रांवरुन स्पष्ट होते. अपीलकर्त्यांच्या मागणीत सार्वजनिक हिताचा कोणताही विषय नसून पूर्णपणे वैयक्तिक स्वरुपाच्या तक्रारीसाठी माहितीच्या अधिकारात सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम यांचा अपव्यय करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सतीश नारायण राक्षे
मु. पो. साळुंब्रे, ता. मावळ, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार वडगांव मावळ, ता. मावळ, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसीलदार वडगांव मावळ, ता. मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सतीश नारायण राक्षे
मु. पो. साळुंब्रे, ता. मावळ, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसीलदार वडगांव मावळ, ता. मावळ, जि. पुणे श्री. राजेश चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील नावाची नोंद रद्द करण्याबाबतच्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री. नारायण खंडू राक्षे यानी मागितली होती. हक्क नोंद संकलनाकडून सन २००३ च्या कार्यविवरणाची कागदपत्रे कार्यालयात आढळून येत नाहीत. कारण असे कार्यविवरण पत्रक जतनाची मुदत ५ वर्षांची असते. तसे विहित मुदतीत कळविले. मूळ अर्ज श्री. नारायण खंडू राक्षे यांचा असून अपील श्री.सतीश नारायण राक्षे यानी केले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसीलदार वडगांव मावळ, ता. मावळ, जि. पुणे श्री. राजेश चव्हाण यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

मूळ अर्जदाराला जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली असून मूळ अपील करावयाचे असल्यास मूळ अर्जदाराने केले पाहिजे. ते अन्य व्यक्तीने करणे नियमबाहय आहे, याची समज श्री. सतीश नारायण राक्षे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अ. मजीत रसूल सय्यद
रा. स. नं. १५६, हुशेनशहा बाबा दर्ग्याशेजारी,
येरवडा, पुणे ४११ ००६. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त,
ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय,
ढोले पाटील रोड, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बंडगार्डन पाणी पुरवठा विभाग, बंडगार्डन पुलालगत, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अ. मजीत रसूल सय्यद
रा. स. नं. १५६, हुशेनशहा बाबा दर्ग्याशेजारी, येरवडा, पुणे ४११ ००६.

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बंडगार्डन पाणी पुरवठा विभाग, बंडगार्डन पुलालगत, पुणे श्री. राजेंद्र अरुण तांबे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - माझ्या मालकीच्या जागेमध्ये कोणतीही मंजुरी दिलेली नसतानाही अन्य व्यक्तीला माझ्याच जागेत पाण्याचा जोड दिला आहे. तो खंडित करणे, तसेच संबंधित व्यक्तीची गलिच्छ वस्ती निर्मूलन सेवाशुल्काची पावती व पाणीपुरवठयाची पावती रद्द करणे आवश्यक आहे. त्याबाबत 'कारवाई कधी करणार' यासह माहितीची मागणी केली असता माहिती दिली नाही व कारवाईही केली नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांची मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून त्यानी अनेक कायदेशीर मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यांच्या मागणीनुसार पुढील कार्यवाहीसाठी अर्ज संबंधितांकडे पाठविला. त्यानी मागणी केल्यानुसार पावत्या रद्द केल्याचे कळविले व दि. १/४/२०१० रोजी संबंधितांची नळ जोड काढण्यात आली असून दि. ६/४/२०१० रोजी अपीलकर्त्यास तसे कळविले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याने प्रशासकीय कार्यवाहीच्या मागणीची व माहिती मागणीची सरमिसळ केली आहे. अशा प्रकारची मागणी तसेच खुलासा, स्पष्टीकरण याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. संबंधिताचा विलंबाबाबतच्या कारणांसह खुलासा सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. १५/११/२०११ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बंडगार्डन पाणी पुरवठा विभाग, पुणे श्री. राजेंद्र अरुण तांबे यानी खुलासा सादर केला. तो मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सिध्दगोंडा बसगोंडा पाटील
रा.क ा सांगाव, ता. कागल, जि. कोल्हापूर ४१६ २१७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
भूमी अभिलेख यांचे कार्यालय, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अधीक्षक,
भूमी अभिलेख यांचे कार्यालय, कागल, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७९८/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/१०/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सिध्दगोंडा बसगोंडा पाटील
रा.क ा सांगाव, ता. कागल, जि. कोल्हापूर ४१६ २१७

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
भूमी अभिलेख यांचे कार्यालय, कोल्हापूर श्री.हिरालाल शंकर मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा उप अधीक्षक,
भूमी अभिलेख यांचे कार्यालय, कागल, जि. कोल्हापूर श्रीमती रोहिणी शरद सागरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - जमिनीच्या एका हिश्श्याचे क्षेत्रफळ किती याची विचारणा केली होती. परंतु ती नेमकी माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - एकत्रिकरण योजनेत संबंधित गटाची मोजणी एकत्रित झाली असल्यामुळे अपीलकर्त्यांच्या मागणीप्रमाणे तेवढया हिश्श्याची वेगळी नोंद केलेली नाही. त्यामुळे तशी माहिती देता येणार नाही. एकत्रिकरणापूर्वीच्या हिश्श्याबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती पुरविल्या आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अभिलेखात नसलेल्या माहितीची मागणी अपीलकर्ता करीत आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत त्याचा समावेश होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अंगद नरहरी भोसले
सं. नं.५३/५८, साईनाथ नगर,
वडगावशेरी, पुणे ४११ ०१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
महात्मा फुले विद्यानिकेतन संस्थेची शाळा लेन-२,
ससाणेनगर, हडपसर, पुणे ४११ ०२८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक
महात्मा फुले विद्यानिकेतन संस्थेची शाळा लेन-२,
ससाणेनगर, हडपसर, पुणे ४११ ०२८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१८/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अंगद नरहरी भोसले
सं. नं.५३/५८, साईनाथ नगर, वडगावशेरी, पुणे ४११ ०१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
महात्मा फुले विद्यानिकेतन संस्थेची शाळा लेन-२,
ससाणेनगर, हडपसर, पुणे श्री. आर. एन. माळी

| | | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक<br>महात्मा फुले विद्यानिकेतन संस्थेची शाळा लेन-२,<br>ससाणेनगर, हडपसर, पुणे श्री. ए. के. चव्हाण | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती स्वीकारण्याबाबत त्याना कळविले होते. माहिती उपलब्ध आहे. चर्चा होऊन माहिती त्वरित देण्याचे ठरले. त्यामुळे अपील निकाली काढण्यात यावे',असे संयुक्तपणे निवेदन अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमातील प्रपत्रात केले आहे. 'अपील निकाली काढण्यात यावे', असे अपीलकर्त्यानी नमूद केले आहे.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विक्रम विष्णु पवार
सी.टी.एस.१२८८/ सर्व्हे नं. २ अ,
राजगुरु रस्ता, येरवडा, पुणे - ४११ ००६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
पुणे शहर तहसील कार्यालय, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
पुणे शहर तहसील कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विक्रम विष्णु पवार
सी.टी.एस.१२८८/ सर्व्हे नं. २ अ,
राजगुरु रस्ता, येरवडा, पुणे ४११ ००६

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
पुणे शहर तहसील कार्यालय, पुणे श्री. सचिन शिवाजी गिरी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - डिसेंबर २००८ मधील येरवडा येथील जमीन प्रकरणी पाठविलेल्या अहवालाबाबत केलेल्या कार्यवाहीची सन २००३ ते २००८ या कालावधीतील माहिती व कार्यवाही न करण्याबाबतच्या कारणांचा व खुलासा मागितला होता. मिळकत पत्रिकेवर नोंद करण्याबाबत पूर्वी आदेश झालेले असून कार्यवाही होत नाही. चुकीची माहिती दिली आहे.

अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची मागणी संबंधित कागदपत्रांच्या असून खुलासा/विचारणा केली आहे. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसल्यामुळे तसे कळविले. विशिष्ट कार्यवाही का केली नाही, अशा स्वरुपाचा खुलासा, स्पष्टीकरण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागता येत नाही. ही संबंधित संचिका सन २००८ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आमच्याकडे आली होती. परंतु ती मिळून येत नसल्यामुळे अधिक तपशील देता येत नाही. याबाबत पूर्वी आयोगाकडे अपील झाले आहे.

संबंधित संचिका उपलब्ध करुन देण्याचे निवेदन चिटणीस, महसूल शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यानी आयोगाकडील अपील क्रमांक ४१६/२०१० च्या सुनावणीमध्ये केले होते. अद्यापही ही संचिका उपलब्ध होत नसल्यास अभिलेख वर्गवारीनुसार संबंधित कागदपत्रांच्या जतनाचा कालावधी तपासावा. हा कालावधी संपून संचिका नष्ट केली असल्यास नाश रजिस्टरमधील त्याच्या नोंदीचा उतारा सादर करावा व जतनाचा कालावधी संपला नसल्यास जतनाची जबाबदारी असणा-या अधिकारी/ कर्मचा-यांचा खुलासा प्राप्त करुन घेऊन महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये आवश्यक तर फौजदारी गुन्हा नोंदविण्यासह पुढील कार्यवाही करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

**१.** अपील निकाली काढण्यात येत आहे.

**२.** अ आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यानी दि. २०.१२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. जे. एम. पाटील
१५७ सिध्दीविनायक हाईटस्,
विश्वेश्वर बँकेसमोर,पुणे सातारा रोड,
धनकवडी, पुणे ४११ ०४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग,
स.नं.७४/२, सारंग सोसायटी, बँक ऑफ महाराष्ट्रचे वर,
सहकारनगर, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक,
नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग,
स.नं.७४/२, सारंग सोसायटी, बँक ऑफ महाराष्ट्रचे वर,
सहकारनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग, स.नं.७४/२, सारंग सोसायटी,
बँक ऑफ महाराष्ट्रचे वर, सहकारनगर, पुणे श्री. अविनाश भालचंद्र पाटील

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक,<br>नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग, स.नं.७४/२, सारंग सोसायटी,<br>बँक ऑफ महाराष्ट्रचे वर, सहकारनगर, पुणे श्री. उत्तरेश्वर नामदेव लोंढे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दि. १/१/२००५ ते २८/१०/२००९ या कालावधीतील पुणे प्रादेशिक योजनेतील जमीन वापरातील बदलाबाबतची सर्व प्रकरणाची तालुकानिहाय संपूर्ण माहिती अपीलकर्ता श्री. जे. एम. पाटील यानी मागितली होती. अपीलकर्ता नेहमी याच स्वरुपाचे, विस्तृत प्रमाणावरील माहिती संकलित करुन मागणारे अर्ज करीत असतात. एका विभागातील माहिती त्याना दिली. तालुकानिहाय नस्तीमधील माहिती संकलित करुन योग्य ते शुल्क आकारुन टप्प्याटप्प्याने देण्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी यानी प्रथम अपिलावर दिला. अपीलकर्त्यांनी तो मान्य केला. त्यानंतर टप्प्याटप्प्याने माहिती तयार करुन अपीलकर्त्याला शुल्क कळविले असता त्यानी माहिती घेतलेली नाही. यावरुन त्याना माहिती प्राप्त करुन घेण्यात स्वारस्य नसल्याचे दिसून येते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग, स.नं.७४/२, सारंग सोसायटी, बँक ऑफ महाराष्ट्रचे वर, सहकारनगर, पुणे श्री. उत्तरेश्वर नामदेव लोंढे व अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग, स.नं.७४/२, सारंग सोसायटी, बँक ऑफ महाराष्ट्रचे वर, सहकारनगर, पुणे श्री. अविनाश भालचंद्र पाटील यांनी केले.

अपीलकर्त्यांनी याच स्वरुपाचे अपील क्र. ५१७/२०१०/पुणे केलेले दिसून येते. त्याच स्वरुपाची माहिती पुन्हा मागणे व त्यासाठी पुन्हा अपील करणे ही अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही. त्या अपिलातही एका माहितीबाबत अशाच प्रकारे शुल्क भरणा केला नसल्याचे जन माहिती अधिकारी श्री. उत्तरेश्वर नामदेव लोंढे यानी निदर्शनास आणले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अशा प्रकारे विस्तृत स्वरुपाची माहिती संकलित करुन देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. तथापि माहिती संकलित करुन देऊ केली असता शुल्क न भरण्याची व माहिती प्राप्त करुन न घेण्याची अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही. सर्व यंत्रणांच्या वेळेचा व परिश्रमाचा हा अपव्यय असून माहिती-मागणीच्या अपीलकर्त्यांच्या भूमिकेबाबत साशंकता निर्माण करणारी ही कृती आहे. याबाबत अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

१. श्री. नंदकुमार बाबूराव काळे
२. श्री. माणिकराव त्रिंबकराव गोते — अपीलकर्ता
४१/४२ कमर्शियल बिल्डिंग नं.१, मार्केटयार्ड
गुलटेकडी, पुणे - ३७

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१,
पुणे मध्यवर्ती इमारत, 'बी' बॅराक, पुणे ४११ ००१.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१,
पुणे मध्यवर्ती इमारत, 'बी' बॅराक, पुणे ४११ ००१.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११००/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** १. श्री. नंदकुमार बाबूराव काळे
२. श्री. माणिकराव त्रिंबकराव गोते
४१/४२ कमर्शियल बिल्डिंग नं.१, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे - ३७

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१,
पुणे मध्यवर्ती इमारत, 'बी' बॅराक, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.एच.आर.चौगुले

| | |
|---|---|
| | **विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१,<br>पुणे मध्यवर्ती इमारत, 'बी' बॅराक, पुणे श्री. वि. सा. तोंडे<br><br>**तत्कालीन जन माहिती अधिकारी -** श्री. आर.डी.लिंगावार |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

सन २००७-०८ ते ३१ मार्च २००९ पर्यंत सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. १ यांच्या विभागामार्फत पुणे शहरामध्ये झालेल्या शासकीय इमारतींच्या दुरुस्तीच्या सर्व कामांबाबतची सर्व माहिती अपीलकर्ता यानी मागितली होती. त्यांची मागणी मोघम स्वरुपाची असून नेमकेपणे माहिती मागवावी किंवा संबंधित उपविभागाकडे माहितीची प्रत्यक्ष पाहणी करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे कळविले होते. त्यानुसार पाहणी केल्यानंतर हवी असलेली माहिती निःशुल्क द्यावी, असा निर्णय प्रथम अपिलावर दिला. परंतु अपीलकर्त्यानी संपर्क साधला नाही. त्याना माहिती हवी असल्यास कागदपत्रांची छाननी करुन मागितलेली माहिती त्वरित निःशुल्क देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रप्रपत्रात नमूद केले आहे. दि. २३/११/२०११ रोजी अपीलकर्ता याना माहिती देण्यात येत असल्यामुळे सदर अर्ज निकाली काढण्यात यावा, असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे.

अपीलकर्ता यानी ढोबळमानाने व सरसकट स्वरुपात माहितीची मागणी केली असल्यामुळे ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम (७) अन्वये माहिती नाकारता येते. परंतु तसे न करता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असली तरी अशा स्वरुपात सरसकट माहिती संकलित करुन देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. शिवाय

माहिती देऊ केली असता अपीलकर्ता अभिलेख अवलोकनासाठी गेलेले नाहीत. या स्थितीत माहिती निःशुल्क देणे व शासकीय, पर्यायाने सार्वजनिक निधीवर भार टाकणे योग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय बाजूंमध्ये झालेल्या चर्चेत ठरल्याप्रमाणे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास मूळ अर्जातील माहिती-मागणीबाबतचे अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावेत, व अपीलकर्त्यांनी कागदपत्रांची लेखी यादी दिल्यावर त्यांच्या प्रती सशुल्क द्याव्यात. मूळ अर्जातील माहिती व्यतिरिक्तच्या माहिती-मागणीचा विचार त्यात करता येणार नाही .

३. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मधील उभय घटकांच्या चर्चेत ठरल्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यानी दि. १५/१२/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.विकास जोशी
साई सदन, फ्लॅट नं. २९, ४ था मजला,
पुण्याईनगरी, धनकवडी, पुणे ४११ ०४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
आरोग्य सेवा पुणे मंडळ कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे मंडळ कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६४/२०११/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
आरोग्य सेवा पुणे मंडळ कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, पुणे डॉ. बी. एन. सोनवणे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे मंडळ कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, पुणे श्रीमती एस.आर.कारेगांवकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर होते.

प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे यांच्या ताब्यात सन १९४७ पासून असलेल्या 'व्हाईट हाऊस' या मिळकती संदर्भातील माहिती अपीलकर्ता यानी दि. ११/५/२००९ च्या अर्जान्वये मागितली होती. प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे यांच्याशी संबंधित माहिती असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे वर्ग करण्यात आला. त्यानी अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकनाबाबत कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे यानी सुनावणीबाबत कळविले असता उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांच्याच कार्यालयाकडील माहिती हवी, असे अपीलकर्त्यांनी कळविले. त्यामुळे माहिती प्राप्त करुन घेऊन उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे या कार्यालयाने शुल्क कळविले. त्यानंतर अपीलकर्ता यानी 'तूर्त आम्हास माहितीची आवश्यकता नसून अर्ज निकाली काढावा', असे दि. ४/९/२००९ च्या पत्रान्वये कळविले, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रातील नोंदींसोबत संपूर्ण तपशिलासह लेखी निवेदन सादर केले.

माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत अपीलकर्त्यांनी केलेला पत्रव्यवहार, विशिष्ट कार्यालयाकडूनच माहिती मिळण्याचा आग्रह व नंतर माहितीची आवश्यकता नसल्याचे कळविणे या बाबी अपीलकर्त्याच्या भूमिकेबाबतच्या पारदर्शकतेच्या निदर्शक नाहीत. त्यामुळे माहितीच्या अधिकाराचा वापर ते कशा प्रकारे करीत आहेत, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होते, याची जाणीव त्याना करुन देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. उदयराज अनिल आळंदकर
फ्लॅट नं. २० बी, बिल्डिंग सी-३, सुर्यलोकनगरी,
पुणे सोलापूर रोड, हडपसर, पुणे ४११ ०१३. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे ४११ ००७

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे ४११ ००७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४०/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. उदयराज अनिल आळंदकर
फ्लॅट नं. २० बी, बिल्डिंग सी-३, सुर्यलोकनगरी,
पुणे सोलापूर रोड, हडपसर, पुणे

**विद्यमान जन माहिती अधिकारी**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे ४११ ००७
सार्वजनिक बांधकाम वैद्यकीय उपविभाग, पुणे श्रीमती मेघना सावंत भोसले

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. अरुणा विजय चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपिलीय प्राधिकारी गैरहजर असून तसे विनंती पत्र आयोगास सादर केले.

'अपीलकर्ता याना उपलब्ध माहिती मुदतीत पुरविण्यात आली. अपीलकर्त्यास हवे असलेले त्या संदर्भातील दस्तऐवज आता पुरविण्यात आले आहेत', असे जन माहिती अधिकारी यानी व 'वरील दस्तऐवज मिळाल्याने माझे समाधान  झाले आहे. अपील निकाली काढावे',असे अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मदन सोपान फलके
यु टी नं. ४०२, सर्कल नं.१, बराक नं. ४,
येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे ४११ ००६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस उपआयुक्त,
परिमंडळ-२, पुणे शहर, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलिस निरिक्षक,
सहकारनगर पोलिस स्टेशन, स्वारगेट विभाग,पुणे ४११ ००९

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/११/२०११ |
| **३.** | **जन माहिती अधिकारी** तथा पोलिस निरिक्षक,<br>सहकारनगर पोलिस स्टेशन, स्वारगेट विभाग,पुणे<br>यांचे प्रतिनिधी श्री. एम. एस. देशमुख | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्यावर दाखल असलेल्या गुन्हयांची व त्या गुन्हयामधील पंच अन्य कोणकोणत्या प्रकरणात पंच आहेत, त्या सर्व गुन्हयांच्या नोंदीबाबतचा तपशील मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.मदन सोपान फलके यानी दोन अर्जांद्वारे केली होती. सन १९९० ते २००९ या कालावधीतील ही माहिती असून अपीलकर्त्यावर गंभीर स्वरुपाचे दोन गुन्हे दाखल आहेत, असे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एम. एस. देशमुख यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. पंचांच्या नोंदी खोटया आहेत, इ. स्वरुपाची अपीलकर्त्याची विधाने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं. ३६/२, विद्यानगर, लेन नं. ६,
वर्ल्ड वॉटर टँक, पुणे ४११ ०१५. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७०९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं. ३६/२, विद्यानगर, लेन नं. ६,
वर्ल्ड वॉटर टँक, पुणे ४११ ०१५.

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. प्रविण वा. गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. नामदेव बारापात्रे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता यानी मूळ अर्जापेक्षा वेगळी माहिती अपिलात मागितली होती. मूळ अर्जानुसार विहित मुदतीत माहिती देण्यात आली. 'संपूर्ण माहिती मिळाली असून, अपील निकाली काढण्यात यावे',असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या परिपत्रकात नमूद केले आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं. ३६/२, विद्यानगर, लेन नं. ६,
वर्ल्ड वॉटर टँक, पुणे ४११ ०१५. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप आरोग्य प्रमुख,
(घन कचरा प्रक्रिया प्रकल्प) राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम,
आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७२१/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं. ३६/२, विद्यानगर, लेन नं. ६,
वर्ल्ड वॉटर टँक, पुणे ४११ ०१५.

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. प्रमोद यादव

**जन माहिती अधिकारी** तथा उप आरोग्य प्रमुख,
(घन कचरा प्रक्रिया प्रकल्प) राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम,
आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. एस. ए. गावडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

मौजे उरुळी देवाची व मौजे फुरसुंगी येथील कचरा डेपोसाठी करण्यात आलेला खर्च व दोन कंपन्यांशी पुणे महानगरपालिकेने केलेल्या कराराच्या प्रतींची मागणी अपीलकर्ता यानी केली होती. आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर कंपन्यांच्या करारनाम्याच्या प्रती एका आठवडयात देण्याबाबत चर्चेमध्ये ठरल्याचे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या परिपत्रकात नमूद केले. 'अपील अर्ज निकाली काढण्याची विनंती आहे',असेही त्यांनी नोंदविले आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील वेळी चर्चेत उभय बाजूंमध्ये झालेल्या एकमताच्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यानी दि. १२/१२/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. ज्ञानेश्वर बाबुराव रुपनवर
मु. पो. कुरबावी, ता. माळशिरस, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव/अध्यक्ष,
श्री. शिवाजी एज्युकेशन सोसायटी बावडा, ता. इंदापूर जि. सोलापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
माध्यमिक विद्यालय कुरवली, ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२५/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/११/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. ज्ञानेश्वर बाबुराव रुपनवर<br>मु. पो. कुरबावी, ता. माळशिरस, जि. सोलापूर<br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,<br>माध्यमिक विद्यालय कुरवली,<br>ता. इंदापूर, जि. पुणे श्री. सी. टी. कोकाटे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी, बावडा यांचे माध्यमिक विद्यालय, कुरवली ता. इंदापूर, जि. पुणे या शाळेच्या बांधकामासाठी व शालोपयोगी वस्तूंसाठी आजपर्यंत मिळालेले शासकीय अनुदान व त्याच्या खर्चाची निविदा इ. सह सन २००० ते २००८ पर्यंतची माहिती अपीलकर्ता यानी दि. ४/२/२००९ च्या अर्जान्वये मागितली होती. जन माहिती अधिकारी यानी दि. २/३/२००९ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास उत्तर दिले. कागदाचा आकार मोठा असल्यामुळे ८८ पृष्ठांच्या छायांकित प्रतींसाठी रु. ५२८/- शुल्क जन माहिती अधिकारी यानी या पत्राव्दारे कळविले. ते नियमबाहय असल्याची तक्रार अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नोंदविली आहे. 'विद्यालयामध्ये उपलब्ध असणारी माहिती सोबत आणली असून मागितलेली सर्व माहिती निःशुल्क देण्यास संमती आहे', असे जन माहिती अधिकारी यानी नमूद केले आहे.

'सर्व माहिती मिळाली आहे.(एकूण ८५ पाने) त्यामुळे अपील निकाली काढावे', असे अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे.

आठ वर्षांच्या कालावधीतील विस्तृत माहिती अपीलकर्ता यानी मागितली असून ती संकलित करुन देणे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(९) अन्वये माहिती न नाकारता जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. कागदाचा आकार मोठा असल्याचे लक्षात घेता अपीलकर्त्यांनी प्रत्यक्ष छायांकित प्रतींसाठी येणारा खर्च देणे योग्य ठरले असते. तथापि अपील निकाली काढण्याबाबत उभय बाजूंनी एकमताने नमूद केले असल्याने ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विनोद विष्णू महाडिक
रा.४५५५/२, महाडिक बंगला,
जुना कराड नाका, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सह संचालक (साखर),
पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
भीमा सहकारी साखर कारखाना लि. टाकळी, ता. मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/११/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,<br>भीमा सहकारी साखर कारखाना लि. टाकळी,<br>ता. मोहोळ, जि. सोलापूर श्री. पी. जे. रणनवरे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

जनावरांच्या शासकीय छावणीबाबतची माहिती अपीलकर्ता यानी मागितली होती. सर्व माहिती दिलेली आहे. याच संदर्भातील अपीलकर्त्यांची अपील क्र. ७४/२००९ व अपील क्र. ७५/२००९ ही अपिले आयोगाने निकाली काढलेली आहेत, असे जन माहिती अधिकारी यानी पूरक कागदपत्रांसह सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. आयोगाने पूर्वीच निकाल दिलेल्या विषयाबाबत पुन्हा अपील करण्याची अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवशंकर विश्वनाथ घोलप
मु. महागाव, पो. बावी, ता. बार्शी, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
उस्मानाबाद जिल्हा धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय,
औषधी भवन, उस्मानाबाद

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
नाईक चॅरिटेबल ट्रस्ट जुना बस डेपो,
गणेश नगर, उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१३/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शिवशंकर विश्वनाथ घोलप
मु. महागाव, पो. बावी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
नाईक चॅरिटेबल ट्रस्ट जुना बस डेपो,
गणेश नगर, उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद यांचे प्रतिनिधी श्री. गणपत चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

सचिव, नाईक चॅरिटेबल ट्रस्ट, जुना बस डेपो, गणेश नगर, उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद यांच्याकडे मागितलेली माहिती न दिल्याबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना शास्ती करुन अपीलकर्त्यास नुकसान भरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केली आहे. सार्वजनिक विश्वस्त संस्था असल्याने ('सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यामुळे) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. त्यामुळे माहिती देणे बंधनकारक नाही, असे नाईक चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष यानी प्रपत्रात नमूद केले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिलेला निर्णय लक्षात घेता अध्यक्ष, नाईक चॅरिटेबल ट्रस्ट, जुना बस डेपो, गणेश नगर, उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद यांचे निवेदन योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. ज्ञानदेव बाबूराव रुपनवर
मु. पो. कुरबावी, ता. माळशिरस, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, ता. माळशिरस, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७८/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. ज्ञानदेव बाबूराव रुपनवर
मु. पो. कुरबावी, ता. माळशिरस, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, ता. माळशिरस, जि. सोलापूर श्रीमती सुरेखा माने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता यानी संपूर्ण 'माळशिरस तालुक्यासाठी शासनाकडून झालेल्या रेशनिंग दुकानामधील रॉकेल वाटपाबाबतची जानेवारी २००३ ते २००९ पर्यंतची' दुकानदारांची नाववार, गाववार, व महिनावार माहिती मागितली होती. एवढी सविस्तर माहिती देण्यासाठी मोठया प्रमाणात साधन सामुग्री वळवावी लागणार असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(९) अन्वये कळविण्यात आले असते. परंतु तसे न करता अभिलेख अवलोकन करुन माहिती प्राप्त करुन घेण्यास अपीलकर्त्यास दि. ५/२/२००९ च्या पत्रान्वये कळविले. त्यानुसार अभिलेख अवलोकनास न येता त्यानी प्रथम अपील केले. पुरवठा अव्वल कारकून, तहसीलदार कार्यालय, माळशिरस, जि. सोलापूर यानी माहितीचे शुल्क अपीलकर्त्यास कळवावे, असे आदेश दिले होते. परंतु त्यानी तसे शुल्क कळविलेले नाही, म्हणून तत्कालीन पुरवठा अव्वल कारकून श्री. कार्यकर्ते यांच्या विरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावीत करणेची तजवीज करीत आहोत, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यानी सादर केले.

'अर्जदारास आवश्यक माहिती पुढील १५ दिवसांत उपलब्ध करुन देत आहोत, अपील निकाली काढण्यात यावे', असे अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे.

वास्तविक अपीलकर्त्यांनी सरसकट स्वरुपात माहिती मागितली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(९) अन्वये ती नाकारता आली असती. परंतु ती न नाकारता जन माहिती अधिकारी यानी अभिलेख अवलोकनासाठी अपीलकर्त्यास कळवूनही ते गेलेले नाहीत. अपीलकर्त्यांची ही कृती योग्य नाही. पुरवठा अव्वल कारकून यानी अपीलकर्त्यास शुल्क कळविले नसले, तरी मुळात अपीलकर्त्यांनी अभिलेख अवलोकनासाठी जाणे आवश्यक असताना व एवढया मोठया प्रमाणावरील माहिती संकलित करुन देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नसताना माहिती नि:शुल्क देणे हा

शासनाचा-पर्यायाने सार्वजनिक निधीवरील ताण ठरेल. त्यामुळे अपीलकर्त्यांनी अभिलेख अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांची यादी जन माहिती अधिकारी याना स्वतंत्रपणे सादर करुन माहिती सशुल्क प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यांनी अभिलेख अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांची यादी जन माहिती अधिकारी याना स्वतंत्रपणे सादर करावी व ही यादी त्यानी सादर केल्यापासून ४ दिवसांत जन माहिती अधिकारी यानी योग्य ते शुल्क आकारुन संबंधित कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास पुरवाव्यात. १५ दिवसांत ही कार्यवाही पूर्ण करुन जन माहिती अधिकारी यानी तसा अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शेख गुलामहुसेन कासीमसाो
६१०/११ उत्तर कसबा, सोलापूर - ७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
दक्षिण सोलापूर, सोलापूर सिव्हिल हॉस्पिटल समोर,
सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
दक्षिण सोलापूर, सोलापूर सिव्हिल हॉस्पिटल समोर,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०३/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शेख गुलामहुसेन कासीमसाो
६१०/११ उत्तर कसबा, सोलापूर - ७

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
दक्षिण सोलापूर, सोलापूर सिव्हिल हॉस्पिटल समोर,
सोलापूर श्री. एस. एम. बिराजदार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'नंतर पूर्ण माहिती दिलेली आहे. (अपीलकर्त्यांच्या) तक्रारीचे निरसन अलहिदा झालेले आहे. अपील निकाली काढण्यात यावे, असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संभाजी निवृत्ती काळे
रा. माढा रोड, कुर्डुवाडी,
ता. माढा, जि. सोलापूर
अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय माढा,
ता. माढा, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय माढा,
ता. माढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१८/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. संभाजी निवृत्ती काळे
रा. माढा रोड, कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय माढा, ता. माढा, जि. सोलापूर श्री. एस. पी. कुलकर्णी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'माहिती मिळाली आहे. तक्रार नाही', असे अपीलकर्ता यानी सदर कार्यमक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. तसेच 'अपील निकाली काढणेस हरकत नाही', असे संयुक्त निवेदन अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. कुमार महादेव पाथरे
मु. पो. मलकापूर, मंगळवार पेठ,
ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था रत्नागिरी, जि. रत्नागिरी

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक (कार्यालय),
सहकारी संस्था रत्नागिरी, जि. रत्नागिरी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५७०/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/१०/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. कुमार महादेव पाथरे
मु. पो. मलकापूर, मंगळवार पेठ, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था रत्नागिरी, जि. रत्नागिरी श्री. एम. के. अहिरे

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - वाहन तारण प्रकरणी कागदेविषयक तरतुदींबाबतची स्पष्टीकरणात्मक स्वरुपाची माहिती मागितली होती. परंतु स्मरणपत्र देऊनही व अपिलानंतरही कोणतीही माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - सध्या जन माहिती अधिकाऱ्याचा व अपिलीय प्राधिकाऱ्याचा पदभार माझ्याकडेच आहे. अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती कायदेविषयक तरतुदीची, अन्वयार्थ, त्या बाबतचे अभिप्राय अशा स्वरुपाची विचारणा करणारी असल्यामुळे नाकारली.

जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास दिलेले उत्तर योग्य आहे. कायदेविषयक तरतुदीची, अन्वयार्थ, स्पष्टीकरण अशा स्वरुपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या 'माहिती' च्या व्याख्येत येत नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास, त्याना ज्या मूळ विषयाच्या अनुषंगाने माहिती हवी आहे त्याबाबतची कागदपत्रे जन माहिती अधिकारी यानी अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावीत व हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती पुरवाव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. समीर बालेखान पठाण
७९९, बी वॉर्ड, रविवार पेठ,
पूलगल्ली तालीम समोर, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (२),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७५५/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/१०/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. समीर बालेखान पठाण
७९९, बी वॉर्ड, रविवार पेठ, पूलगल्ली तालीम समोर, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (२),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. ओमप्रकाश दिवटे

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी,

| | |
|---|---|
| | कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. संजय एस. भोसले |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - कोल्हापूर महानगरपालिकेचे एकूण विभाग, त्या विभागांमधील कर्मचारी, मागास प्रवर्गाच्या मंजूर पदावरील कर्मचारी, त्यांची नावे, पद, जातीचा प्रवर्ग, जात पडताळणी इ. संदर्भातील माहिती विशिष्ट नमुन्यात मागितली होती. रोस्टरची प्रत जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली. परंतु ऊर्वरित माहिती संकलित करुन देण्यात आली नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी सरसकट स्वरुपात व विस्तृत माहिती मागितली होती. ती विहित मुदतीत संकलित करुन देणे शक्य नसल्याचे त्याना विहित मुदतीत कळविले व त्यानुसार अभिलेख तपासून उपलब्ध माहिती व अन्य माहितीबाबतच्या वस्तुस्थितीची कल्पना दिली. महानगरपालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांची माहिती विशिष्ट तक्त्यामध्ये तयार करुन देणे शक्य नाही. अपीलकर्त्याच्या अन्य अर्जानुसार सेवाज्येष्ठता यादीबाबतची कार्यवाही करण्यात आली असून सर्व माहिती संकेत स्थळावर टाकण्याचे काम सुरु आहे. त्याला दोन ते अडीच महिने लागतील.

अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्ता अशा प्रकारचे विस्तृत व विशिष्ट नमुन्यात माहिती मागणारे अर्ज सातत्याने करीत असतात. ती देणे शक्य होत नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता 'महानगरपालिकेच्या सर्व विभागांची, सर्व कर्मचाऱ्यांची' अशा स्वरुपाची व्यापक माहितीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(९) अन्वये नाकारता येणे शक्य असताना जन माहिती अधिकारी यानी नाकारलेली नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. विशिष्ट नमुन्यात माहिती संकलित करुन देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकरराव लिंगोजी पाटील
प्लॉट नं.५, तोरणानगर, सागरमाळ, कोल्हापूर, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमीसंपादन अधिकारी, क्र.१२, कोल्हापूर
विद्यापीठ हायस्कूलसमोर, भवानी मंडप, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८९/२०१०/ सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.११.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.शंकरराव लिंगोजी पाटील<br>प्लॉट नं.५, तोरणानगर, सागरमाळ, कोल्हापूर, जि.कोल्हापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमीसंपादन अधिकारी, क्र.१२, कोल्हापूर विद्यापीठ हायस्कूलसमोर, भवानी मंडप, कोल्हापूर श्री.शिवाजी त्र्यंबक कादबाने | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

चिकोत्रा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी भूमी संपादनाबाबत सन १९९६ मध्ये झालेल्या निवाड्याच्या अनुषंगाने अपीलक र्ता श्री.शंकरराव लिंगोजी पाटील यानी माहिती मागितली होती. हीच माहिती मागणारे अपीलकर्ता श्री.मारू ती भैरू मातले व श्री.अरू ण वसंत पाटील यांची अपिले

(अ.क्र.१३८५/२०१०/कोल्हापूर व अ.क्र.११५८/२०१०/कोल्हापूर) दि.२.११.२०११ रोजी आयोगापुढे सुनावणीस आली असता प्रतिनिधी म्हणून प्रस्तुत अपिलातील अपीलकर्ता श्री.शंकरराव लिंगोजी पाटील हेच उपस्थित होते. त्यानी नमूद केल्याप्रमाणे निवाडा सन १९९६ मधील नसून जुलै १९९९ मधील आहे. वाढीव मोबदल्याचा अपीलकर्त्याचा मूळ प्रश्न असल्याचे दिसून येते व त्या अनुषंगाने ते विविध प्रकारचे अर्ज व पत्रव्यवहार माहितीच्या अधिकारांतर्गत करीत आहेत. असे आतापर्यंत त्यानी सात अर्ज केले असून वेळोवेळी त्याना उत्तर दिले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमीसंपादन अधिकारी, क्र.१२, कोल्हापूर विद्यापीठ हायस्कूलसमोर, भवानी मंडप, कोल्हापूर श्री.शिवाजी त्र्यंबक कादबाने यानी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता एकाच मागणीसाठी अपीलकर्ता सातत्याने अर्ज करीत असून अन्य व्यक्तींच्या नावे असलेल्या अपिलांमध्येही प्रतिनिधीत्व करीत आहेत असे दिसून येते. सार्वजनिक हिताचा कोणताही विषय त्यात नसून व्यक्तिगत संदर्भातील मागणीसाठी, अशा प्रकारे माहितीच्या अधिकाराचा ते करीत असलेला वापर योग्य म्हणता येणार नाही. संबंधित विषयातील संचिकांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेण्याचा मार्ग त्याना उपलब्ध आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी अपीलकर्त्यास हवे असल्यास अशा अवलोकनासाठी संबंधित संचिका उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कांतिलाल मिलापचंद रूणवाल
११४, पाचवी गल्ली, स्टेशन रोड, पो.बॉक्स नं.७१,
मु.पो.जयसिंगपूर पाठाण, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक, पणन संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक, पणन संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | २९१० / २०१० / कोल्हापूर |
| २. | सुनावणीचा दिनांक | १०.१०.२०११ |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवानी अकृषिक कराची भरमसाट दराने वसुली केली आहे व ज्यानी ही रक्कम दिली नाही त्यांचे भूखंड काढून घेतले आहेत. त्याबाबतची व स्पष्टीकरणात्मक विचारणा केली असता माहितीच्या अधिकारात ती येत नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी कळविले आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.कांतिलाल मिलापचंद रूणवाल यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

याच विषयाच्या अनुषंगाने अपीलकर्त्याची अपील क्र.३०९२ / २०१० / कोल्हापूर व २१३४/२०१०/कोल्हापूर आयोगाने यापूर्वी निकाली काढलेली आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम,

२००५ च्या कक्षेत न येणाऱ्या विषयांसाठी पुनः पुन्हा अर्ज व अपिले करून संबंधित यंत्रणा व आयोग यांचा वेळ व परिश्रम याचा अपव्य न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.रोहिणी प्रभू सुलतानपुरे
प्रियदर्शनी कॉलनी, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-III),
पोलीस आयुक्तालय, मिलकॉर्नर, औरंगाबाद — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिडको विभाग,
औरंगाबाद, जि.औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | २८२५ / २०१० / कोल्हापूर |
| २. | सुनावणीचा दिनांक | १०.१०.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-III),
पोलीस आयुक्तालय, मिलकॉर्नर, औरंगाबाद श्रीमती सुनीता साळुंके-ठाकरे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिडको विभाग,
औरंगाबाद, जि.औरंगाबाद श्री.के.के.येळणकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

'पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, जवाहरनगर, औरंगाबाद शहर यांच्याकडून सदरचा माझा अर्ज व मजकूर दिवाणी स्वरूपाचा आहे, म्हणून निकाली काढलेला आहे. हे संपूर्ण चुकीचे असून, सदरचा अर्ज हा फौजदारी स्वरूपाचा आहे. तरी त्या पध्दतीने कारवाई होऊन मला न्याय मिळावा, ही विनंती,'असे लेखी निवेदन अपीलकर्त्या सौ.राहिणी प्रभू सुलतानपुरे यानी आयोगाला पाठविले.

अपिलार्थी व त्यांची तक्रार असलेली अन्य व्यक्ती यांच्यामध्ये दुकानाविषयीच्या व्यवहारावरून वाद आहे. अन्य व्यक्तींनी त्यांचे दुकान सोडले असले तरी तोंडी कराराप्रमाणे रक्कम परत केली नाही, अशी अपीलकर्त्याची तक्रार आहे. ही बाब माहितीच्या अधिकारात येत नाही. परंतु त्याविषयीच्या कार्यवाहीची माहिती त्याना देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून दिवाणी / फौजदारी कारवाईविषयीची मागणी ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रकाश नरसिंग बाडकर
९०४, सटवाई रोड, निपाणी,
ता. चिक्कोडी, जि. बेळगाव अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५३८/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/१०/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. प्रकाश नरसिंग बाडकर
९०४, सटवाई रोड, निपाणी, ता. चिक्कोडी, जि. बेळगाव

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर श्री. अनंत गजानन जोशी

**जन माहिती अधिकारी** तथा
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर श्री.रमेश शांतीनाथ नवाळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर महाविद्यालयातील सर्व प्रशासकीय कर्मचाऱ्यांची पदनिहाय सेवाज्येष्ठता यादी, मागास वर्गीयांचा अनुशेष, चतुर्थश्रेणी सेवकांबाबतचा तपशील इ. माहिती मागितली होती. परंतु दिड वर्ष होऊनही कोणतीही माहिती मिळाली नाही. म्हणून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना शास्ती होऊन मला नुकसान भरपाई मिळावी.

जन माहिती अधिकारी -तत्कालीन जन माहिती अधिकारी सेवानिवृत्त झाले असून दि. १३/३/२०११ पासून मी पदभार घेतला आहे. अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. ती त्वरित देण्यात येईल.

अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांनी दि. २३/४/२०११ रोजी अर्ज केला. त्या दरम्यान जन माहिती अधिकारी बदलले व महाविद्यालयात प्रवेशाचे काम चालू होते. अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे माहिती देण्यासाठी मुदतवाढीची मागणी त्यांच्याकडे केली होती. माहिती सोबत आणली असून कोणतीही माहिती दडविण्याचा हेतू नाही.

अपीलकर्ता यानी विस्तृत स्वरुपात माहिती मागितली असून मुद्दा क्र. ५ मध्ये काही बाबींचे स्पष्टीकरण विचारले आहे. अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार करता येत नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केलेली कारणे लक्षात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यासाठी त्यानी मुदतवाढ मागितल्याचे स्पष्ट होते व माहिती नाकारलेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी याना शास्ती करण्याची अपीलकर्त्यांची मागणी रास्त ठरत नाही. (अपिलीय प्राधिकारी याना शास्ती लावण्याची उक्त अधिनियमात तरतूद नाही) तथापि अपीलकर्त्यांना करावा लागलेला पत्रव्यवहार आदिंवरील खर्च व मन:स्ताप लक्षात घेता नुकसान भरपाईची त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. संस्थेने अपीलकर्त्यास माहिती नि:शुल्क देऊन रु २५००/- नुकसान भरपाई ३

दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले व तसे उभय बाजूस मान्य असल्याचे लेखी निवेदन श्री. पी. एन. बाडकर, अपीलकर्ता, श्री. आर. एस. नवाळे, जन माहिती अधिकारी व डॉ. ए. जी. जोशी, अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाला सादर केले. त्यानुसार सुनावणीनंतर लगेच माहिती दिल्याचे व मिळाल्याचे माहितीच्या प्रतींसह उभय बाजूंनी आयोगाला अवगत केले. तसेच अपीलकर्त्यास दि. १२/१०/२०११ रोजी धनादेशाव्दारे नुकसान भरपाई दिल्याचे अपीलकर्त्याच्या पोहोच पावतीसह जन माहिती अधिकारी यानी दि. १७/१०/२०११ च्या पत्राव्दारे

आयोगास कळविले. अपीलकर्त्यास अधिक माहिती हवी असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन लेखी यादी सादर करुन योग्य ते शुल्क भरुन ते प्राप्त करुन घेऊ शकता.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं. ३६/२, विद्यानगर, लेन नं. ६,
वर्ल्ड वॉटर टँक, पुणे ४११ ०१५. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
हवेली तहसीलदार कार्यालय, खडकमाळ,
शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
हवेली तहसीलदार कार्यालय, खडकमाळ,
शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७२५/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अनंत देऊ गावडे
सर्व्हे नं. ३६/२, विद्यानगर, लेन नं. ६,
वर्ल्ड वॉटर टँक, पुणे ४११ ०१५.

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
हवेली तहसीलदार कार्यालय, खडकमाळ, शुक्रवार पेठ, पुणे श्री.रणजित भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

उरुळी देवाची येथील कचरा डेपोला आग लागल्याच्या संदर्भात वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या छायाचित्राच्या अनुषंगाने, 'आतापर्यंत या डेपोला लागलेल्या आगीच्या संदर्भातील पंचनाम्यांच्या प्रतींची मागणी' अपीलकर्ता यानी केली आहे. वस्तुतः अपीलकर्त्याची ही मागणी सरसकट व ढोबळ स्वरुपातील आहे. तथापि, 'कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती एका आठवडयात देण्याचे ठरले व माहिती उपलब्ध झाल्यास अपील निकाली काढण्यास अपिलार्थी याची संमती आहे', असे अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या परिपत्रकात नमूद केले आहे.

अपीलकर्त्यानी प्रत्यक्ष कार्यालयात अभिलेख अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी लेखी स्वरुपात करुन योग्य ते शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेणे योग्य होईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यानी उरुळी देवाची येथील कचरा डेपोला लागलेल्या आगींच्या संदर्भातील उपलब्ध अभिलेख अपीलकर्त्यास अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील ज्या कागदपत्रांची लेखी मागणी अपीलकर्ता करतील त्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन पुरवाव्यात. या बाबतचा अनुषंगिक अहवाल दि. १५/१२/२०११ पर्यंत आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. तानाजी नंदकुमार भोसले
राजू किराणा दुकानाजवळ, यादवनगर,
कोल्हापूर- ४१६ ००८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (I),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
वि. का. क्र. ३, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९०४/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/१०/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. तानाजी नंदकुमार भोसले
राजू किराणा दुकानाजवळ, यादवनगर, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (I),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. ओमप्रकाश दिवटे

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
वि. का. क्र. ३, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. एम.एम.निर्मळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुस्थान अभियानांतर्गत एकात्मिक गृहनिर्माण योजनेअंतर्गत झोपडपट्टी विकास योजनेतील लाभार्थ्यांबाबतची सन २००७ ते २०१० या कालावधीतील माहिती मागितली होती. ती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - संदर्भित योजनेअंतर्गत झोपडपट्टी वासियांसाठी घरे बांधलेली होती. पावसाळा तोंडावर आल्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना घरे दिली होती. परंतु कागदोपत्री ताबा दिला नाही. अपीलकर्त्यास तसे कळविले असूनही याच अनुषंगाने दि. १८/१२/२००७ ते २६/८/२०१० या कालावधीत त्यानी एकूण ६ अर्जांद्वारे माहिती मागितली होती व वेळोवेळी ती त्याना पुरविण्यात आली.अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार तयार केलेल्या अधिक माहितीबाबत कळवूनही व स्मरणपत्रे पाठवूनही त्यानी संपर्क साधला नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यांच्या ६ अर्जांवर दिलेल्या माहितीच्या प्रतीसह लेखी निवेदन आयोगास सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास वेळोवेळी माहिती दिली आहे. सबब माहिती न मिळाल्याची अपीलकर्त्याची तक्रार रास्त ठरत नाही. अतिरिक्त माहिती देऊ केली असता ती घेण्यास न जाण्याची अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही. आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती नियमानुसार शुल्क भरुन अपीलकर्ता घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश दिनकरराव गायकवाड
१३२५/२७, शिवाजी उद्यमनगर,
कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलिस अधीक्षक,
पोलिस अधीक्षक कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,
शहर विभाग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०८८/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/१०/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, शहर विभाग, कोल्हापूर श्री. महेश गणपतराव सावंत | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## **विवेचन**

श्री. रंगराव लक्ष्मण गायकवाड यानी केलेल्या तक्रार अर्जासंदर्भातील माहिती अपीलकर्ता यानी दि. २८/७/२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. संबंधित पोलिस ठाण्याकडे अर्ज वर्ग केल्यानंतर ती दि. २३/८/२०१० च्या पत्रान्वये प्राप्त झाली. दि. ९/१०/२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तरासह कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास पाठविल्या. परंतु माहिती मिळाली नसल्याचे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यानी पूरक कागदपत्रांसह केले. आपल्याला १०९ दिवसांनी अपुरी, खोटी व दिशाभूल करणारी माहिती मिळाली, अशी तक्रार अपीलकर्ता यानी लेखी निवेदनात केली आहे. तथापि माहिती खोटी वा दिशाभूल करणारी असल्याचे पुरावे त्यानी दिलेले नाहीत. जन माहिती अधिकारी यानी दिलेले मुद्देनिहाय उत्तर पाहता माहिती अपुरी असल्याचे दिसून येत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नारायण चेतनदास सुंदराणी
रा. बॅरक नं. १९, रुम नं.९, गांधीनगर,
ता. करवीर, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
तालुका आरोग्याधिकारी कार्यालय,
पंचायत समिती करवीर, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, गांधीनगर, ता. करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८२४/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/१०/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. नारायण चेतनदास सुंदराणी
रा. बॅरक नं. १९, रुम नं.९, गांधीनगर, ता. करवीर, जि. कोल्हापूर
यांचे प्रतिनिधी वकील श्री. कासीम वाय. मुल्ला

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
तालुका आरोग्याधिकारी कार्यालय, पंचायत समिती करवीर,
जि. कोल्हापूर श्री. एम. पी. सातोसे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, गांधीनगर, ता. करवीर, जि. कोल्हापूर श्री. के.बी.पाटील |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - गांधीनगर, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथील ग्रामपंचायतीने सन २००७ ते २०१० या कालावधीतील ज्या बांधकामांना परवानगी दिली त्याबाबतचे अर्ज, मोजणी नकाशे, ग्रामपंचायतीचे ठराव इ. माहिती मागितली होती. कळविलेले शुल्क भरण्यास गेलो असता भरुन घेतले नाही. शुल्क भरुन घेऊन माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले. त्यानुसार दि. ६/९/२०१० रोजी जन माहिती अधिकारी यानी शुल्क भरुन घेतले. परंतु अद्याप माहिती दिली नाही. मला माहिती न मिळाल्यामुळे माझे खूप नुकसान झाले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी -अपीलकर्त्यांनी ३ वर्षांच्या कालावधीतील अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. त्याना अपेक्षित असलेल्या बांधकामाला परवानगी देण्यास सरपंचांनी विरोध केला होता. मागितलेली माहिती विस्तृत असल्यामुळे देण्यास विलंब लागेल, असे त्याना समक्ष सांगितले होते व पत्राद्वारेही विहित मुदतीत कळविले होते. त्यानंतर माझ्या आईचे निधन झाल्यामुळे मी २ महिने रजेवर होतो. तयार असलेली माहिती देऊ केली असता अपीलकर्त्यांनी ती स्वीकारली नाही.

अपिलीय प्राधिकारी - शुल्क भरुन घेऊन माहिती देण्याचे आदेश प्रथम अपिलावर दिले होते. त्यानुसार कार्यवाही करण्याचे उभय बाजूंनी मान्य केले होते.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत कळविले आहे. अपीलकर्ता यानी शुल्क भरले असून आता त्याना विनाविलंब पूर्ण माहिती दिली गेली पाहिजे. जन माहिती अधिकाऱ्यांनी ३ दिवसांत माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशत मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी यानी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. १५/१२/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.अशोक गिरी
अंजली मेडिकल, जुन्नर रोड, नारायणगाव **अपीलकर्ता**
ता.जुन्नर, जि.पुणे

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालया जवळ, अमरावती

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा, उप अधिक्षक
भूमी अभिलेख, अचलपूर,
ता.अचलपूर, जि.अमरावती

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2856/2010/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.11/05/2011 |
| ३ | उपस्थिती<br>जन माहिती अधिकारी तथा, उप अधिक्षक<br>भूमी अभिलेख, अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती श्री.बाळासाहेब भोसले,<br><br>अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,<br>भूमी अभिलेख, अमरावती श्री.पिराजी शिवराम अंबेराव | |
| २ | मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-<br>अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.अशोक गिरी यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.11/05/2011 रोजी सुनावणी घेण्यात आली. माहितीसाठीच्या शुल्काचा भरणा करण्याबाबत अपीलकर्त्यास दि.30/06/2010 च्या पत्रान्वये कळविले होते. त्यानुसार अपीलकर्त्याने दि.8/9/2010 रोजी मनिऑडर पाठविली. तथापि, मनिऑर्डर प्राप्त झाल्याची बाब तत्कालीन सहाय़्यक जन माहिती अधिकारी श्री.जी.यु.ठाकरे यांनी जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणून न दिल्याने माहिती पुरविण्यात आलेली नव्हती. सध्याच्या जन माहिती अधिका-यांनी अपीलकर्त्यास रजिस्टर टपालाने माहिती पाठविलेली आहे, असे लेखी व तोंडी निवेदन जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, भूमी अभिलेख, अचलपूर, जि. अमरावती व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, अमरावती यांनी केले. जन माहिती अधिकारी तथा, उप अधिक्षक भूमी अभिलेख, अचलपूर, जि.अमरावती यांच्याकडून माहिती मिळाल्याने सदर अपील रदद करावे, असे अपीलकर्त्याचे लेखी निवेदन आयोगास फक्सद्वारे प्राप्त झाले आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) तत्कालीन सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, अचलपूर, जि.अमरावती श्री.जी.यु. ठाकरे यांनी अपीलकर्ता श्री.अशोक गिरी यांना भरणा केलेल्या शुल्काची रक्कम टपाल खर्चासह परत करावी. आयोगाचे हे आदेश तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, अचलपूर, जि.अमरावती यांना कळवून यानुसार पूर्तता करण्याची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख, अमरावती यांची राहिल.

**पुणे.**
**दि :- 28/11/2011**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.संपत रामचंद्र चौगुले
ब्लॉक नं.११, समाज सेवा को.ऑप हौसिंग सोसायटी, **अपीलकर्ता**
भोसलेवाडी, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (I),**
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता,**
वि.का.क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८९३/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १०.१०.२०११ |
| २ | **उपस्थिती**<br>श्री.संपत रामचंद्र चौगुले<br>ब्लॉक नं.११, समाज सेवा को.ऑप हौसिंग सोसायटी,<br>भोसलेवाडी, कोल्हापूर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता,**<br>वि.का.क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर<br>**श्री.नेत्रदीप सरनोबत**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (I),** | |

| | |
|---|---|
| | कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर<br>**श्री.ओमप्रकाश दिवटे** |
| | माहिती-मागणी - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली आहे. |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.संपत रामचंद्र चौगुले यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१०.१०.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मजला समाधान कारक माहिती मिळाली असून, मजला सदरचे अपील चालवण्याचे नाही. तरी, सदरचे अपील निकाली काढण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.चौगुले यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.११.२०११**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. तानाजी कृष्णा कापसे,
२१६/२ रा मजला, देवगिरी बिल्डिंग,
महादेवपालव मार्ग, करीरोड, मुंबई - १३. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता (१),
सहकारी संस्था, कोल्हापूर, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४२/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. तानाजी कृष्णा कापसे,
२१६/२ रा मजला, देवगिरी बिल्डिंग, महादेवपालव मार्ग, करीरोड, मुंबई - १३.

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर डॉ.अर्चना रा. आटपलवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता यानी आयोगाकडे केलेले अपील क्र. ४१०/२००९ व अपील क्र. ९०३८/२०१० या अपिलांप्रमाणेच प्रस्तुत अपिलातही मागणी केली आहे. ती दोन्हीही अपिले आयोगाने फेटाळली आहेत. शेतीला पाणी पुरवठा बंद का केला, अशी विचारणा व तो पुन्हा सुरु करण्याची मागणी अपीलकर्त्याने दोन्ही अर्जांमध्ये व अपिलांमध्ये केली असून या संदर्भातील सर्व माहिती त्याना देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे.

'अपीलकर्ता, संस्था व अपिलीय प्राधिकारी यांच्यात पुन्हा चर्चा होऊन सदर प्रकरणावर सुनावणी होऊन निर्णय घेणेत यावा, या अटीवर माहिती अधिकारातील अपील माघारी घेणेत यावे, असे चर्चेअंती ठरले. तरी अपील निकाली काढण्यात यावे, ही नम्र विनंती', असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे. मात्र शेतीला बंद केलेल्या पाणीपुरवठ्याबाबतचा विषय हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा नाही. या बाबतची बैठक, त्याचा निर्णय हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेबाहेरील विषय आहे. अपीलकर्त्याने खुलासा, स्पष्टीकरण, प्रशासकीय कार्यवाही अशा स्वरुपाची मागणी केली असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संभाजी कृष्णा कापसे,
मु. पो. नरेवाडी, ता. गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४२/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/११/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. संभाजी कृष्णा कापसे,
मु. पो. नरेवाडी, ता. गडहिंग्लज,जि. कोल्हापूर

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर डॉ.अर्चना रा. आटपलवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

श्री वनलक्ष्मी पाणी वापर सहकारी संस्था मर्यादित, मु. पो. नरेवाडी, ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर या संस्थेने आपल्या शेताचे पाणी बंद का केले, तसे करण्याचे संस्थेला अधिकार आहेत का, इ. स्वरुपाची विचारणा अपीलकर्ता यानी केली होती. त्याना विहित मुदतीत उत्तर दिले. तसेच संस्था स्तरावरील माहितीसाठी अर्ज संस्थेकडे वर्ग केला. संस्थेने अपीलकर्त्यांना माहिती देऊन त्याची पोच आमच्या कार्यालयाला सादर केली. प्रथम अपिलातील आदेशानुसार आणखी काही माहितीही देण्याचे आदेश संस्थेला दिले. त्यानंतरही पाठपुरावा केला, संस्थेने माहिती दिली आहे, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यानी सादर केले व त्याच स्वरुपाची नोंद 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या प्रपत्रात केली.

'अपीलकर्ता, संस्था व अपिलीय प्राधिकारी यांच्यात पुन्हा चर्चा होऊन सदर प्रकरणावर सुनावणी होऊन निर्णय घेणेत यावा, या अटीवर माहिती अधिकारातील अपील माघारी घेणेत यावे,असे चर्चे अंती ठरले. तरी अपील निकाली काढण्यात यावे, ही नम्र विनंती', असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे. मात्र शेतीला बंद केलेल्या पाणीपुरवठयाबाबतची बैठक, त्याचा निर्णय हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेबाहेरील विषय आहे. अपीलकर्त्याने खुलासा, स्पष्टीकरण, प्रशासकीय कार्यवाहीबाबतच्या आदेशांबाबतची कार्यवाही अशा स्वरुपाची मागणी केली असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.११.२०११**